म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २११२३
IRBK-0119923

११९२३
६१७०।८३

रंग—रम्य—अद्भुत

# वाऱ्यांत मिसळलें पाणी

[ सकस – सकच्छ – विनोदी ग्रामीण नाटक ]

# बांधणी

लेखक :

बाळ कोल्हटकर

IRBK-0119923
IRBK-0119923

ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे २

मूल्य चार रुपये

प्रकाशक :

के. वा. जोशी
२५ बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक : पुणें २

♣

प्रथमावृत्ति :
ऑगस्ट १९६६

♣

मुखपृष्ठ :
अनंत सालकर

♣

मुद्रक :

रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ : पुणें २

**महत्त्वाची जाणीव :-**

या नाटकाच्या प्रथमावृत्तीच्या प्रकाशनाव्यतिरिक्त सर्व हक्क सौ. शीला कोल्हटकर यांच स्वाधीन आहेत. ह्या नाटकाचा प्रयोग करणारांनीं आधीं परवानगी घेणें कायद्यानें आवश्यक आहे.

सौ. शीला कोल्हटकर
सिधये बंगला, खेर
सेक्शन, अंबरनाथ,
जि. ठाणें.

अर्पण

सर्व न सापडलेल्या चोरांस

# वाऱ्यांत मिसळलें पाणी--

म्हणजे काय तें कधींच कळलं नाहीं ! म्हणजेच बहुतेक वाऱ्यांत मिसळलें पाणी ! जणूं काय तें कधीं कळलंच तर अगदीं ' वाऱ्यांत मिसळलें पाणी 'च होईल असा कांहींसा अंधुक समजलेला, समजलेला पण न उमजलेला अर्थ म्हणजे कांहीं कळतंय मंडळी ? मला हें नाटक दिसलं, जसं दिसलं तसं पाह्यलं आणि जसं पाह्यलं तसं दाखवलं. आतां मला दिसलं कसं तें पहायला समर्थबुद्धी गजाननाचे कुशाग्र नेत्र आहेतच. न्यायान्यायाचा झगडा मिटवणारा अंकुश आहे ! जें मीं ऐकलं तें ज्याला ऐकवलं किंवा जे ज्यानं ऐकवलं तेच मी त्याला ऐकवलं मग तें ऐकायला सगळ्या जगाच्यीं गाऱ्हाणीं ऐकणारे गजाननाचे सुकर्ण आहेत ! गजानन हा मिस्किल बुद्धीचा माणूस आहे ! माफ करावं त्यानं मला, मी त्याला आमच्यांत आणून बसवलं ! पण मला मात्र वाटतं त्यानं आमच्याकडं यावं, आमच्यांत बसावं, मिस्किल खोड्या कराव्यात, कृष्णासारख्या लबाड माणसाला त्यानं धरला त्या ' जांबुवंती 'च्या प्रकरणांत ? गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्र बघितला तेवढं निमित्त करून ! अशा आणिक कैक असतील ! मला तर केव्हां केव्हां वाटतं लहानपणीं वाकडतोंड्या ( वक्रतुंड ), ढेरपोट्या ( तुंदिलतनु ) वगैरे कांहीं तरी म्हटलं असेन कृष्णानं--यानं काढलान् असेल काटा ! महा मिस्किल ! नाहीं तर मोदक चोरले असतील याचे गणेशचतुर्थीच्या दिवशीं ! तो बरोब्बर वस्ताद--असावा ! हा माझा तर्क हो नाहींतर कोणी दाखले मागील. आपल्याजवळ नाहींत ! अहो, वाचनच कमी ! सुचेल तें लिहितों, वाचून कधीं लिहीत नाहीं ! माझा अंदाज आहे गणपती स्वतःची आरती देखील तुमच्या आमच्याकडनं म्हणवून घेतों ! अगदीं अव्ययावत् विनोदी बुद्धीनं--सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । असं आपण म्हणतों दरवर्षीं न चुकतां, भक्तीनं ! यांत विनोद कसला ? कुणी विचारील ! शोधा म्हणजे सापडेल ! सुखकर्ता दुःखहर्ता हा गजानन, ही काय विघ्नाची वार्ता आहे ?

पुढं एका नाटकांत ' बाळू आपटे ' येणार आहे ! तो हेंच वाक्य बोलणार आहे ! तें मी इथून चोरलें असं कुणी म्हणायला नको--म्हणून

आज सांगून ठेवतों ! तर सांगायचं कारण–ही काय विघ्नाची वार्ता आहे काय ? ते ' नुरवी ' राह्यलेय–म्हणण्यापेक्षां गेलेंय पुढच्या ओळींत ' पुरवी प्रेम कृपा जयाची ' ही खरी पहिली ओळ ! त्याच्या मागें जोडलें गेलेय् ' नुरवी ' हा दुसरा विनोद. ज्याची कृपा प्रेम उरवतही नाही नि पुरवतही नाही ही काय त्याची स्तुति झाली ? पण बुद्धि देणारा तोच ना– म्हणून म्हटलं विनोदी तर त्याच्या डोक्यांत. या वेळी मला विनोदी नाटक लिहायला बसवून विनोद करायचा आलेला दिसतोय् ! नाही ! बघा ! म्हणजे ! मारुती हें ' वाऱ्यांत मिसळलें पाणी ' या नाटकांतलं आद्य दैवत आहे ! आणि हें नाटक शक्तीची महती गाणारं आहे ! आणि त्यांतला विनोदाचा भाग– तें मी लिहिलंय ! माझा शक्तीशी काय संबंध हें एखादा पहिलवान सुद्धां सांगू शकेल ! बजरंग–गजानन हीं दोन्ही गणेशाचीं रूपं मानलीं जातात ! दिल्ली–पंजाब प्रांतात–मंगळवार हा मारुतीचा वार म्हणून पूजला जातो ! असं मी ऐकलं. जें ऐकलं तें सांगितलं, खरं खोटं निवाडा करणारा तर्क तो फरशु नीती भेदु अंकुशू, वेदान्तु तो महारसु, मोदकु मिरवे, या मोदकांतला महारस कोणचा ? ज्याचा मोह भगवद्गीता सांगणाऱ्या कृष्णालाही व्हावा ! तर जगांत जन्माला आलेलीं सगळीं तीर्थं जशीं शेवटीं समुद्राला जाऊन मिळतात तसेच साहित्यांत उत्पन्न होणारे सर्व रस अमृताचा आस्वाद घेण्यासाठीं ज्या महारसांत उतरतात–तसल्या महारसांतला हा मोदक, हे वर्णन–हें ज्ञानेश्वरींतलं आहे पुढच्या नाटकासाठीं राखून ठेवूं ! बाकी साठा आहे भरपूर ! समुद्रांतून ओंजळभर पाणी आणल्यासारख्या भाराभर कल्पना आम्ही घ्याव्यात — तिथं कांहींच कमी नाहीं ! तर त्या बुद्धीनं सुचवलं आणि या शक्तीनं सामर्थ्य दिलं म्हणूनच — वाऱ्यांत मिसळलें पाणी !

एकच आहे, अगा अघटित हें घडलें, हा दृष्टिकोन नाटकाकडं प्रेक्षकांचा रहावा हा एक मानस हें नांव देतांना डोळ्यापुढं होताच ! शिवाय कविता आपोआप झाली ! तसं माझ्या या नाटकाचं खरं नांव ' विश्वास असावा चोरांचा ! '

पुढं काय झालं कुणाला ठाऊक ! आम्हांलाच नावाचा विश्वास राह्यला नसेल ! ' वाऱ्यांत मिसळलें पाणी ! ' म्हणजे तरी काय ? शेवटीं ' विश्वास

असावा चोरांचा ! ' ' वाहतो ही दुर्वांची जुडी 'सारखाच ' वाऱ्यांत मिसळलें पाणी ' हा एखादा मंत्र असावा अशी हल्लीं मला एक विनोदी शंका येऊं लागलीय ! हे नाटक लिहायला लागल्यापासून मला अलीकडं मधून मधून कांहीं तरी विनोदी होत असतं ! पण खरं सांगतों भल्या भल्या मांत्रिकांना साधत नाहींत अशा गोष्टी या नाटकाच्या बाबतींत होत गेल्या. आता महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक ! बोलावल्याबरोबर हो म्हणाले त्यात कांहीं नवल नाहीं ! नंतर नाहीं म्हणले त्यांतही कांहीं नवल नाहीं ! तीं कामाचीं माणसं–येणं म्हणजेच...मी वहिनींना बोलवतों असं म्हटल्याबरोबर ' जा सांगा ' असं म्हणाले त्यातही कांहीं विशेष नाहीं ! कारण तीं मुळीं रसिकच मंडळी आहेत ! अस्सल वऱ्हाडी ! आम्हा नाटकवाल्यांचे जुने आश्रयदाते अगदी सहकुटुंब, आम्ही त्यांच्या घरी जेव्हा त्यांच्या छोट्या चिरंजिवांचे कोणत्या नाटकाला जायचंय आई ? नाटक पहायचंय बुवा. हे शब्द ऐकले तेव्हां म्हटलं म्हणजे हल्लीं एकूण रंगभूमीला दिवस बरे दिसतात ' तेव्हां त्यात कांहीं नवल नाहीं ! पण सगळ्यांत म्हणजे आम्हांला ' सौदागर ' पावला ! हनुमंताची कृपा ! मला वाटतं मध्यंतरीं मी शिवलीलामृतांतला ११ वा अध्याय वाचला होता कांहीं सोमवारीं, म्हणून हा भोळा-शंकर मला प्रसन्न झाला ! सौदागर म्हणजे–छोटा गंधर्व–आतां छोटा या शब्दाचं बहुवचन करतां येत नाहीं म्हणून एकेरी बोलायचं ! अद्‌भुत गृहस्थ ! पूना गेस्ट हाउसच्या खाली फुटपाथवर ' आमच्या नाटकांतली गाणी म्हणाल का ? ' असं मी विचारलं तेव्हां जितक्या सहज ते हो म्हणून गेले तितक्या सहज ते गाणीं म्हणून गेले–गेले नाही राहिले–राह्यले हे वऱ्हाडी क्रियापद इथें ठीक आहे ! मी कुणाची स्तुति करावी म्हणून बोलत नाही, पण ही वऱ्हाडी भाषा बेटी मोठी प्रेमळ ! ' जाऊन राह्यले ' म्हणतात. ' पावने ' म्हणजे पाव्हणा जावा वाटत नाहीं ! नाटककार म्हणून प्रेक्षकांच्या नजरेपुढं मला प्रथम उभं केले वऱ्हाडी रसिकांनीं ! आज या नाटकाच्या निमित्तानं ' दुर्वांची जुडी ' ही संस्था सुरू करताना ऋण कबूल करण्यासाठी दोन शब्द खर्च केले तर ' आमी काय केले बाप्पा ! तुझा गूण होता तू यश घेऊन राह्यला ! ' असं म्हणतील म्हणून हळूच आधीच त्यांचे आशीर्वाद मागून ठेवतों !

शक्तीशील नाटकं रुजायला वऱ्हाडी, माती सुपीक! सकच्छ विनोदाला सकस खतपाणी तिथं हमखास! मात्र ह्ये बेनं मूळ पुणं, सातारा, कोल्हापुरी ह्ये खरं! 'हे बेनं' प्रकरण नाटकभर आहेच उगीच ऊहापोह नको! तर सांगत होतों मी ती नवलाची गोष्ट– सौदागरांनीं गाणीं म्हटलीं– म्हणजेच वाऱ्यांत मिसळलें पाणी!

त्यांनीं गाणीं चांगलीं म्हटलीं आहेत असं मी म्हणायचं म्हणजे तुमच्या रसिकतेची मला परीक्षा झाली नाहीं असं म्हटल्यागत झालं! काय आवाज आहे! नको! पुन्हा मी वहावायला लागलों!

त्यांचा आवाज गोड आहे असं मी म्हणणं म्हणजे मी त्या आवाजाशीं इतकी जवळीक करणं म्हणजे खडीसाखर गोड आहे पण ती जगाला कळावी म्हणून कडू कारल्यानं स्वतःला खडीसाखरेला घासून घेतल्यासारखं आहे! तिकडचे गुण इकडं येतील का इकडचे तिकडे जातील हें समजणें म्हणजे अगदी "वाऱ्यांत मिसळलें पाणी!" पण योगच! घरच्यासारखे रोज चार-पाच सहासहा तास– रंगभूमीवर गातात त्या आवाजांत गाणीं म्हणत बसलेली ही व्यक्ती ज्यांनीं ज्यांनीं पाह्यली त्यांचे नेत्र-कर्ण धन्य होत! 'अहो जांभाया पसरे मुख– त्यात अवचिते पडे पीयुख' असं कांहींसं झालं! त्यांचं स्वरांचं ऋण फेडण्याचं सामर्थ्य शब्दांना यावं 'हीच प्रार्थना बलभीमा– गजानना!'

किती माणसांचीं नांवं घेऊ? 'गणेशु देव भोळा!' 'वापरा संस्थेच्या नांवाबरोबर मोनोग्रॅम' म्हणून असं सुचवलं नाटककार विद्याधर गोखल्यांनीं! हा गृहस्थ नाटककार असूनही मत्सरी नाहीं हें माझं सर्टिफिकेट! अर्थात् मीही तसाच आहें! हें माझं मलाच सर्टिफिकेट! आभार मानू? माझे मीच! Thank you! गोखलेसाहेब! काय, पान घेणार का!

'लेफ्टनंट जनरल थोरात!' केवढं प्रचंड नांव आहे. लिहितांना व्यक्तित्व डोळ्यापुढं उभं राह्यलं तर अक्षरं सुचणार नाहींत या भीतीनं तीं लिहितांना मी डोळे मिटून घेतले होते! इतका मोठा माणूस आहे म्हणूनच मला वाटतं इतका लहान होऊं शकतो! नाटकाच्या मुहूर्ताला ज्या मोकळेपणानं ते वागले आणि बोलले तो पाह्यला असता तर म्हटलं असतं कुणीही 'वाऱ्यांत मिसळलें पाणी!' मी रसिकांच्या ओळखी विसरत नाहीं!

आत्ताच कळलं आपले लाडके मुख्य मंत्री पहिल्या प्रयोगाला येऊं शकत नाहींत ! हरकत नाहीं ! मीं कांहीं आतां एकदां लिहिलेलं खोडणार नाहीं ! कारण तें खरं आहे !

आज आठवण येते मात्र यशवंतरावांची ! ठीक आहे ! त्यांना नाहीं अडचणीमुळं इकडं यायला जमलं. आम्ही दिल्लीला जाऊं ! त्यांची शाबासकी पाठीवर घेऊनच या शामभटाच्या तट्टाणीला पुढं जायची जुनी सवय लागलीय त्यामुळं थोडं बुजल्या सारखं वाटतंय ! असो ! त्यांनाच एक जुनी आठवण देऊन ठेवतों. ' अंगाई ' नाटकासाठीं त्यांना बोलवायला मी गेलों तेव्हां त्यांना सातारला ही गोष्ट त्यांना ऐकवली होती. ते विसरले नसतीलच पण त्या वेळीं त्यांनीं दिलेली शाबासकी माझ्या ध्यानीं आहे ! धीरानं घ्यायचं ! आपले गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांना आवडलं नाटक. त्यांनीं पाठीवर थाप मारली, पण ती त्यांची सवय आहे ! ते नेहमींच आधार देतात ! शिवाय हें नाटक आहे ग्रामीण !

नांवं लिहायचीं झालीं तर ते औपचारिक दिसेल म्हणून श्री. बाबुराव पेंढारकर, श्री. वसंत शांताराम देसाई, त्यांतल्या त्यांत भालजी म्हणजे बाबा, या लोकांचीं नांवं मी ऋणनिर्देशाला वापरत नाहीं. श्री. बाबांचा मला काय उपयोग झाला हें नाटक पहिल्यावर त्यांना कळेल. आभार मानत नाहीं म्हणजे प्रयोगाला येतील ! या—वरील मंडळींना अकारण कौतुक करण्याची सवय आहे, निदान माझं ! ( वसंतराव मनांत म्हणतील वस्ताद आहे. मी त्याचं कौतुक करत नसताना हा जुलमाचा रामराम ! ) एक बाबा सोडून, तिथं कौतुक नाहीं असं नाहीं, पण रांगडी ! किती माणसं येतात नजरेपुढं, शास्त्रीबुवा, सुधाताई, श्री. हरिभाऊ मोटे ( या वेळीं सुटले ते या नाटकाच्या तडाक्यांतून ), ग. दि. माडगुळकर, गोष्ट ऐकल्यानंतर अतिशय उत्साहानं त्यांनीं ज्या वाक्यानं मला प्रोत्साहित केलं तें वाक्य मी जन्मांत विसरणार नाहीं ! बाळ, आपण लिहिलेलं प्रत्येक वाक्य चांगलं नाहीं असं स्वतःला वाटत रहाणं हें प्रगतीचं लक्षण आहे ! “ माझी प्रगती चालू आहे अण्णा वरील वाक्याच्या तालावर ! नमस्कार केलाय् ! आशीर्वाद द्या ! ”

श्री. भालचंद्र पेंढारकर स्वतःच्या नवीन नाटकाच्या गडबडीत आहेत ! मी ' जय जय गौरीशंकर ' या त्यांच्या नवीन नाटकाला सुयश चिंतितों आणि त्यांच्याकडून कैलासाची कृपादृष्टि मागतों !

आपलं नाटक चांगलं झालेलं आहे का नाहीं हें मी ज्या वेळीं ताडून पहातों त्या वेळीं स्टेजवरच्या गड्यापासून मोठ्यांतल्या मोठ्या टीकाकारा-पर्यंत सगळ्यांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करतों, अर्थात् नाटकानं ! त्या सर्वांचे आभार मानत बसलों तर माझं अज्ञान उघडं होईल म्हणून श्री. हंसराज कोरडे, केशव जोगळेकर वगैरे मंडळींना मी आभारांत ओढत नाहीं. त्यांचं सहकार्य असू दे ! श्री. जोगळेकर तर जणूं स्वतःच प्रयोगाचा लगाम हातीं घेऊन बसले होते ! या नाटकाला काम करणाऱ्या प्रत्येक कलावंताचं मला इतकं सहकार्य मिळालं आहे कीं तें तसंच चालू रहाणं हें ' दुर्वांच्या जुडी 'चं यश ठरेल ही उमेद मनीं उभी रहाते !

ह्या नाटकाचा प्रकार हा मला थोडा नवखा.—मला वाटतं मराठी रंगभूमिलाही नवखा असावा—असल्यामुळं कीं काय मी स्वतःच ' फॅन्टसी 'त वावरत असल्यासारखा भांबावलों होतों. अगदीं सहज सहज सांगायाचं तर येवढीशी चिमुरडी ती ' आशा काळे ' (बेबी) हिनं सुद्धां मला धीर द्यावा मग तिच्या आईवडलांनीं द्यावा यांत नवल कोणतं ? त्यांचे आभार मानत नाहीं आपुलकी दुरावेल !

नाटक सेन्सॉर व्हायला अडचण होऊं नये म्हणून मी स्वतःच सातारला जाऊन सेन्सॉरचे प्रमुख श्री. बखले यांना श्री. बापुसाहेब भागवत, डॉ. जोग, व डॉ. भाऊराव आगाशे, वगैरे मंडळींना साक्षी ठेवून मी हें नाटक वाचूनच दाखवलं ! नाहीं तर अर्धवट कळणाऱ्या टाइप केलेल्या कॉपीवर त्यांना वाचावं लागलंच असतं ! डॉ. जोग, डॉ. आगाशे, माझे थोरले बंधू ती. नारायण हरी कोल्हटकर ( नाना ) या मंडळींना माझे कान पकडण्याचा केव्हांही अधिकार आहे, या वेळीं सुटलों !

सर्वांत मोठा धक्का मला बसला श्री. ना. सी. फडके यांना कथानक आणि गाणीं ऐकून मला स्टेज-प्रॉपर्टीसाठीं भलं मोठं वाघाचं एक कातडं कायम दिलं ! जें त्यांना कोल्हापूरच्या छत्रपति शहाजीराजे यांनीं बक्षीस

दिलं होतं ! कारणाचा मी केलेला उल्लेख हे त्यांच्या मनाविरुद्ध नसावा असा अंदाज ! प्रयोग झाल्यावर तें खरं सांगतीलच. त्यांचे आभार मानले तर जवळीक बिघडेल म्हणून त्यांचे आशीर्वाद मागतों !

आतां राहिली आमची नेहमींचीं गिऱ्हाईकं ! श्री. पेंटर फडके, आमचे जोशीबुवा, चारू सरपोतदार, आतां नवीन वाढला गजानन सरपोतदार, त्यांच्या मातोश्री तर नेहमीं हातीं एक गोड घांस घेऊन उभ्या असतात ! आतां राहिले कुणी तर " सर्व देव नमस्कारं केशवं प्रतिगच्छति " या न्यायानं तर बलभीमाच्या आणि श्रीगजाननाला केलेल्या नमस्कारांत सर्व सामावलेलेच आहे ! आतां रसिकांचे आभार न मानतां

आतां येथे न्यून ते पुरते
अधिक ते सरते,
यालागि तुमते विनवितु असे ।

येवढं म्हणतों आणि थांबतों.
थांबत नाहीं ! निघालों पुढं !

नमस्कार—

पुणं, आपला,
दि. १६–८–१९६६. बाळ कोल्हटकर

* * *

या नाटकाचा पहिला प्रयोग **सांस्कृतिक-भवन** ( भरत नाट्य मंदिर ) पुणें येथें मंगळवार, दि. १६ ऑगस्ट १९६६ रोजीं रात्रौ ९-३० वाजतां '**दुर्वांची जुडी**' या संस्थेनें सादर केला.

# " वाऱ्यांत मिसळलें पाणी "

## : प्रवेशानुक्रमें पात्र-परिचय :

| | |
|---|---|
| **आंधळा पहारेकरी** | : वसंत दुदवडकर |
| **मामा** | : कमलाकर टिपणीस |
| **बजरंग घोरपडे ( चोर )** | : बाळ कोल्हटकर |
| **दवंडीवाला** | : अनंत मिराशी |
| **मंजुळा** | : कु. आशा काळे |
| **धर्मा** | : रघुनाथ लोके |
| **गुणा** | : हंसराज कोरडे |
| **दिवाणजी** | : केशव जोगळेकर |
| **धनगर** | : मा. छोटू |
| **पाटील** | : दीनानाथ टाकळकर |
| **नारायण** | : श्रीपाद जोशी |
| **मास्तर** | : काका केणी |
| **आंधळा चाचा** | : श्री. जोगळेकर |
| **बहिणाई** | : सौ. तारा दीक्षित |
| **संगीत-पार्श्वगायक** | : छोटा गंधर्व |
| **व्यवस्था** | : श्री. अवचट, श्री. अनंतराव कुलकर्णी |
| **ध्वनिसंकेत** | : गोपाळ खेर |
| **नेपथ्य { कल्पना** | : बाळ कोल्हटकर, केळकर चित्रशाळा |
| **नेपथ्य { सहाय्यक** | : श्री. अनंतराव कुलकर्णी |
| **रंगमंच-व्यवस्था** | : विश्वास चव्हाण |
| **लेखक-दिग्दर्शक-सूत्रधार** | : बाळ कोल्हटकर. |

**वाद्यवृंद** : विष्णुपंत वष्ट, वसंत थोरात, बबनराव गोखले, अनंत फाटक, छोटु गोखेल, बबन काळे, किंकर, खळदकर, पैठणकर.

म. ग्रं. स. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १००२३ नों. दि. ६।७।०।६३.
नाटक
क्र. ...............

“ जयदेवी श्री सरस्वती ”

# वाऱ्यांत मिसळलें पाणी

( पडदा उघडण्यापूर्वी– )

शारदीचिये चंद्रकळे माजि अमृतकण कोंवळे ।
जै वेंचिती मने मवाळे, चकोर तलगें ।।
तया परी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणोनिया ।।
गणेशु देव भोळा । ले व्यासोक्ती सुमनमाळा ।
परि माझिया दूर्वादळा । ना न म्हणेची ।।

तंबोऱ्याच्या स्वरांत– ह्या ओव्या ऐकूं येत असतांनाच लय वाढत वाढत घंटा, ढोल, झांज, टाळ्या, यांच्या वाढत्या गतींतून एक आरती कानावर पडूं लागते ! आणि त्याच वेळीं मोठ्या थोरल्या हिंदुस्थानच्या नकाशाच्या आकाराच्या आंत खोल मध्यावर उंच उभी बलभीमाची प्रचंड आकृति आणि तिची आरती करणारे लोक हिंदुस्थानच्याच आकारांत उभे असलेले दिसतात. आणि आरती ऐकूं येते :

जयदेवा बजरंगा बलभीमा धांवा ।
वायुसुता हनुमंता शक्तीच्या देवा ।।
भक्तसख्या बळवंता अंजनीच्या जीवा ।
आरती ओवाळितो मानुनी घ्या शेवा ।। १ ।।

एका उड्डाणांतच पाऊल लंकेला ।
कळलें नाहीं केव्हां गेला अन् आला ।।
हुंकारी ओंकार शक्तीचा ठेवा ।
तुझिया सामर्थ्याचा पारच ना ठावा ।। २ ।।

**गेली लंका गेली एकच हो टाळी ।**
**पहिल्या पावन स्पर्शें पापांची होळी ॥**
**थरथरला रावण करी असुरांचा धांवा ।**
**धडधडला अंगार पुच्छाशीं जेव्हां ॥ ३ ॥**

**पुच्छाशीं अंगार, मुखाशीं ओंकार ।**
**वायुच्या सामर्थ्यें वाढे आकार ॥**
**त्रिगुणात्मक वीरबली भक्तांच्या भावा ।**
**रुद्रा तव रूपाचा काळाला हेवा ॥ ४ ॥**

आरती विरत जाऊन पुन्हां तंबोऱ्याच्याच स्वरांत विलीन होत असतांनाच आरती करणारी सगळी ग्रामस्थ मंडळी तिथून जातांना दिसतात आणि पायरीवरून उठून– मारुतीच्या पुढें येणाऱ्या पंचा, कोपरी, बोचकीं, टोपरी, थोडी दाढी वाढलेली असा एक सत्पुरुषासारखा दिसणारा मनुष्य पुढं येऊन उपदेशात्मक असं म्हणूं लागतो.—

**मानवा मानवतेला मान ।**
**मानवतेचा मानवतेला मानूं दे अभिमान ॥ ध्रु० ॥**

**सदा तृप्तता तृप्त असूं दे ।**
**सदा मुक्तता मुक्त राहूं दे ।**
**अंतिम विजयासाठीं येवो नीतिला अवसान ।**
**मानवा मानवतेला मान ॥ १ ॥**

**रामहि गेला, गेला रावण ।**
**उरलें केवळ तें रामायण ॥**
**विश्वासाठीं मानवतेचा तो संदेश महान् ॥ २ ॥**

हें कडवं संपत असतांनाच–तंबोरा गतीनं तुणतुण्याची लय घेतो आणि हळूहळू हिंदुस्थानचा नकाशा मारुतीसकट डोळ्यासमोरून अदृश्य होत असतांनाच आंतून शब्द कानावर येतात—

ॐ नमोजि जय विघ्नेशा ।
ॐकाराच्या प्रथम स्वरा ॥
अकार चरणीं उकार उदरी मकार मस्तकी तुरा धरा ॥ १ ॥
नकोत रिद्धी नकोत सिद्धी ।
बलबुद्धी द्या धीर धरा ॥
हे बलवंता गणेशरूपा, मंगलमूर्ते शुभंकरा ॥ २ ॥
अज्ञानी मी ज्ञान सांगतों ।
मायबाप हो क्षमा करा ॥
बोल बोबडे बाळ बोलते । आई होउनि श्रवण करा ॥ ३ ॥
ॐ नमोजि...

आणि हें ऐकू येत असतांनाच ढोलकीवरील थाप शब्दांनीं वर्णन करून सांगते—

आडगांवाची अशी रसिकहो गोष्ट घालतो कानी ।
आन रामराज्याची कथा नव्हे ही वेथा नीट घ्या ध्यानी ॥
चित्त देहोनी, चित्त देहोनी, चित्त देहोनी ।
आडगांव हे गांव कुनाच्या नांवी गांवी नसल्यालं ॥
बलभीमाच्या पायाखाली अन् लंकेलागुनि वसल्यालं ।
रामराजाला रामराज्ये हे सपनामंदी दिसल्यालं ॥
आन आसं कधी घडतं का ? असल्या संका नका धिऊं मनीं ।
आनि आडगांवाची ऐका रसिकहो गोष्ट घालतो कानीं ॥
नीट घ्या ध्यानी ॥ १ ॥
या गांवचा राखनदार हाये आंधळा ।
जिमीन हाये कसदार पिकतो गहूं हान जोंधळा ।
सारख्या भागानं वाटून घेती । वाव न्हाई गोंधळा ॥ २ ॥
आनि अशा गांवामंधी शिरला कलि हो । न्हवतं ध्यानी मनीं ।
आन आडगांवाची गोष्ट रसिकहो गोष्ट घालतो कानी ।
नीट घ्या ध्यानी ॥ ३ ॥

( हें वर्णन चालू असतांनाच जो मारुती आपण प्रथम पाहिला तो ज्या डोंगराच्या माथ्यावर आहे. त्याचा पायथा दिसूं लागतो. मौजे आडगांव बुद्रुक ही म्युनिसिपालिटीच्या कंदिलापुढं लावलेली पाटी, दिसत असतांना खालीं बसलेला आंधळा पहारेकरी आणि त्याच्याच पलिकडे वर टोपी पडेल इतका वर नजर लावून बसलेला मामानामें एक मनुष्यप्राणी दिसतो. वर्णन संपल्यावर आंतून बजरंग प्रवेश करतो. म्हाताऱ्याला म्हणजे आंधळ्यास चुकवून पुढें येण्याच्या भरांत त्याची लाथ मामाला लागते. )

**मामा** : लाथंच्या जातीचं कोन रं ?

**बजरंग** : तुमचाच भाचा हाये.

**मामा** : आतां ह्यो धंदा सुरू केला का ?

**बजरंग** : ट्रायल घेतोंय. मला समदीकडं बसत्याती, आपल्याला कुठं देतां येती का न्हाई बगीतली.

**मामा** : लाथा, आन त्या का ?

**बजरंग** : ही बेकारीची कथा हाये. एका गवळ्याच्या दुकानावं होतों नोकरी गेली तवा बसल्याली लाथ–अजून वाकडी कंबर सरळ हुईना.

**मामा** : लाथ का बसली ?

**बजरंग** : गुरु भेटला.

**मामा** : कोन ?

**बजरंग** : गवळी.

**मामा** : अन ते कसं ?

**बजरंग** : अवं तेच्या दुकानांत मला दुधांत पानी मिसाळता आलं न्हाई म्हून बेकार झालों, थतं बसली पहिली लाथ. कुनी घातली आसंल म्हनता ?

**मामा** : गवळ्यानं का ?

**बजरंग** : न्हाई. तेच्या दुधामधी म्या पानी घातलं न्हाई. त्यो राग तेच्या म्हशीला आला आन तेनं घातली लाथ, सवं झालीया तिला पर, पानी घातल्याबिगार दूध दुकानांतनं गेल्यालं कधीं बगितल्यालंच न्हाई. तवाधरनं बेकार. आनि दुसरी बसली येका सायबाकडं. पट्टेवाला

हुतु. आनि येक दीस सायबाकडे भेटाया कुनीतरी आला. सायबाला भेटला. मला इचारून गेला, आंत. आन जराशानं सांगून गेला भाईर. काम झालं म्हून. आन मंग साहेब भाईर आला. मला म्हनला तो गेला तेनं तुला काय दीलं ? म्या म्हनलं का देयाचं असतंय ? तो म्हनला का दीलं ? म्या इचारतोय, का देयाचं असतंया. आन झगडा काय थांबना. आन मला काय कळंना. आन तेला काय मिळंना. अखेरीला तेनं मला विचारलं.

**मामा** : सायेबानं ?

**बजरंग** : हां. त्वां काय खाल्लं ? म्यां म्हनलं म्या काय खाल्यालं न्हाई. म्या तेला त्वांड उघडून दावलं. तवा तेनं माज्या एक लावली.

**मामा** : लावली. म्हंजी ?

**बजरंग** : कानसुलांत. पर तरी बी तेला काय खाल्यालं गावल्यालं न्हाई. काय खायाचं असतंया रं ? मामा ?

**मामा** : आरं पर भाचरा तुजं नांव सांगशील का न्हाय ?

**बजरंग** : बज्या. म्हंजी खरं हाये बजरंग. पर ह्या बेकारीच्या पान्यांत पडल्याधरनं घडल्यालं नांव हाये. बजरंग कोन म्हनत न्हाय. पर नांव हाये.

**मामा** : आरं पैकं खायाचं असत्यात. अजून रामरावनाच्या काळांत हाये जनू ? आरं खाल्यात पैकं.

**बजरंग** : खाल्यात आन ते का ?

**मामा** : खाल्यात बाबा. ते चोरीचं काम 'हाये.

**बजरंग** : तुमास्नी जमतं का ?

**मामा** : का ? हाये कुठं ?

**बजरंग** : हाये की. त्या हापिसांतनं म्या निगालो भाईर. दुसरी लाथ घिऊन ते आजकाल इकडंच हाये. लोकशेवा कंपनीत.

**मामा** : लोकशेवा कंपनी म्हंजी ? काय कळल्यालं न्हाई ?

**बजरंग** : लोकशेवा करन्यासाठनं आमाला धाडल्यालं हाये.

**मामा** : कुनी ?

**बजरंग** : आरं तेचं नांव काय चौ इन ची म्हनत व्हता. नकटा हाये पिवळा हाये. चोराचा दादा हाये. त्येच्याकडं हाये. ही असलीच कामं

असत्यात. जमत न्हाई. पर बेकार मानसाला काय ? मिळंल ती नोकरी. न्हाई जमली तर लाथा खायाची आपल्याला सवं हाये. त्याच कामासाठनं म्या वर चाल्ल्यालो हाये.

**मामा** : वर म्हंजी ?

**बजरंग** : वर बगितलं का ? त्या वरच्या डोंगराच्या टोकाला ?

**मामा** : इकल्या वर ?

**बजरंग** : येनार का ?

**मामा** : इचार हाये. पर मला जमनार न्हाई.

**बजरंग** : का ?

**मामा** : मला दमा हाये.

**बजरंग** : वर गेल्यावं बरा हुईल.

**मामा** : दमा ?

**बजरंग** : व्हय.

**मामा** : त्यो हुईल. पर वर जाईपत्तूर म्या ऱ्हानार न्हाई.

**बजरंग** : कां ?

**मामा** : मला ठावं हाये. त्यो मारुती नवसाला पावतो.

**बजरंग** : आन तुमचा कसला नवस ?

**मामा** : काय नाय आपलं असंच.

**बजरंग** : आत्तां ? अवं तुमी लाजला की ? म्हंजी काय लग्नाबिग्नाचा नवस हाये का ?

**मामा** : नवस कसला का असंना. त्यो–म्हारुती लई वर हाये. म्या तर आसं ऐकल्यालं हाये. का कुठं बी वाटत न बसता मानूस येकसारखा चालत गेला का न्हाई.

**बजरंग** : एक पौंडी !

**मामा** : व्हयं. आन थतं गेल्यावं म्हारुतीच्या पायावं;नारळ ठिवला का न्हाई, का नारळाची आपसुक दोन बकलं व्हल्यात. आन मारुती नवसाला पावतोय.

**बजरंग** : ते काय म्या ऐकल्यालं न्हाई. पर तिजोरी हाये म्हनं मारुतीच्या मागल्या अंगाला.

**मामा** : पैक्याची ?

**बजरंग** : उगडी. भरल्याली.

**मामा** : कोन पैकं नेत न्हाई ?

**बजरंग** : समदं गांवकरी नेल्यात. आडगांवातलं !

**मामा** : कुठं हाये गांव ?

**बजरंग** : आड हाये.

**मामा** : आड म्हंजी ?

**बजरंग** : डोंगराच्या. आड. उतरनीला वसल्यालं हाये. पर तो म्हारुती हाये का न्हाई ? मामा ?

**मामा** : मामा म्हारुती हाये ?

**बजरंग** : न्हाई. वर त्यो म्हारुती हाये का न्हाई ? त्यो आडगांवाचा राखनदार हाये. त्या गांवामधली मानसं कवा बी पैकं उचलत्यात. खर्ची करत्यात. उरल्यालं परत तिजोरीत ठिवत्यात. जेला मिळत्यात, ते आपलं पैकं तिजोरीत ठिवत्यात. पर थतं जर परका कोन आला तर म्हारुती तेला पाटलाच्या ताब्यांत देतो. म्या ऐकल्यालं हाये. तिथं आपल्याला चोरी कराया जायाचं हाये.

**मामा** : आपल्याला जमनार न्हाई.

**बजरंग** : चोरी तुम्हीं नगा करूं. चोराच्या दादानं ह्यो खलिता दिल्याला हाये त्यो तिक्ताच तुमी पाटलाला पोचवा. तेला खलित्यात गुतवा. म्या तिजोरीकडं जातो. खाली आल्यावं मग आपुन निम्मं निम्मं.

**मामा** : पर म्या नारोळ बरोबर आनल्याला न्हाई.

**बजरंग** : मग बरं झालं की, तुमी इकडं पाटलाला खलिता द्या जावा. आन डायरेट जाऊन मारुतीच्या पायावं डोक्सं ठिवा.

**मामा** : अहाहा. म्हंजी झाली का दोन बकलं ? आं ? म्हंजी म्या वरल्यावर बर, आन त्वां पैका घिऊन खाली. बरा हायेस का रं माज्या भाचरा.

**बजरंग** : तो म्या विनोद केला.

**मामा** : त्वां ? लोकं हसत्याल.

**बजरंग** : त्येच्यासाठनंच केला. परपचाच्या डोळ्यांतनं पानी आननाऱ्या कथा बास झाल्या आसं म्हनत्यात मानसं म्हून थोडा विनोद करावा म्हटलं. ही चोरी म्हंजी सादी गोठ न्हाई. लोकशेवा हाये.

**मामा** : लोकशेवा म्हंजी ?

**बजरंग** : म्हंजी इनोद.

**मामा** : म्हंजी चोरी ?

**बजरंग** : तर ? बाकीच्या जगांत चोरी करनं चांगलं नसंल पर आडगांवांत चोरी करणं म्हंजी लई पुण्याईचं काम हाये.

**मामा** : पुन्याईचं म्हंजी ?

**बजरंग** : अवो, जेला चोरी कळत न्हाई थितं चोरी करनं आवघड. आडानी मानसं हायती. ती सुदराया जायाचंय. ही लोकशेवा हाये.

**मामा** : म्हंजी इनोद.

**बजरंग** : तर ? वरल्या लोकास्नी पैक्याची किंमत न्हाई. दोन मानसं एकमेकामधले येव्हार मनानं करत्यात. समद्या गावाचा पैका येका ठिकानावं साठल्याला हाये. ते चूक हाये. दोन जित्या मानसांच्या मधले येव्हार जीव नसल्याला कागदा-सोन्याच्या तुकड्यानंच व्हाया होवंत असं आमच्या चोराच्या दादाचं म्हननं हाये.

**मामा** : नकऱ्या पिवळ्या ?

**बजरंग** : आधी पिवळ्या. मग नकऱ्या. पैका येका ठिकाणी सांठल्याला हाये.

**मामा** : त्यो समद्या गांवाला वाटला जावा. म्हंजी पैक्याचं इकेंद्रीकरन व्हावं ?

**बजरंग** : ते काय ठावं न्हाई. पर समता व्हावी. अशी तेची योजना हाये. आन तेच्या साठनं जिक्त बेकार मिळत्याल. तिक्तं सोदन्याचं काम चालू हाये. मग न्हानार का कामाला ?

**मामा** : पर जमनार न्हाई.

**बजरंग** : जमाया कशाला लागतंय ? काम मिळल्याशीं कारण. जमनारं काम परतेकाला मिळलं जातं तर बेकार कशाला न्हाईलो असतो ? मला का चोरीचं काम जमनार हाये का ? न्हाईतं आपल्याला सवं हायेच.

**मामा** : पर वर गेल्यावं म्हारुतीनं दिला पाटलाच्या ताब्यांत तर ?

**बजरंग** : ते वर गेल्यावं बगायचं. काय हुईल ते खरं. बजरंगाची किरपा. थतंल्या लोकास्नी चोरी व्हत्यात म्हंजी काय ते कळंल का न्हाई ? उदात्त हेतू हाये. मानसं शानी व्हत्याल.

**मामा** : आन चोरी करनं ?

**बजरंग** : ती लोकशेवा हाये.

**मामा** : म्हंजी इनोद.

**बजरंग** : मग येनार का टाकोटाक वर ?

**मामा** : त्यो बी इनोदच हाये. पर चल. येकादशीच्या घरी आली शिवरात. सारी रात थंडीत गेली वाजलं दातावं दात. अशी गत न व्हावी. वरलं समदं झाल्यावं खाली आम्हास्नी भेटा.

**बजरंग** : न्हाई तर वर भेट हायेच की. ( आतां तो आंधळा बोलूं लागतो. )

**आंधळा** : राम राम देवा.

**बजरंग** : कोन हाये ?

**आंधळा** : म्या आंधळा.

**बजरंग** : का हाये ?

**आंधळा** : येक सवाल.

**बजरंग** : बोला.

**आंधळा** : आपुन कुठं नीगाला ?

**बजरंग** : गावांत.

**मामा** : डोंगराच्या टोकाला.

**आंधळा** : काम ?

**बजरंग** : सुदारना.

**आंधळा** : कसली सुदारना ?

**बजरंग** : गावाची.

**आंधळा** : आला कुठनं ?

**बजरंग** : रामराज.

**आंधळा** : त्ये कुठं आसतंया ?

**बजरंग** : रामराज्यांत.

**आंधळा** : उद्येग काय करतां

**बजरंग** : शेवा.

**आंधळा** : ती कसली असतीया ? भजनं करतां ?

**बजरंग** : आमी लोकशेवा करतो.

**आंधळा** लोकशेवा म्हंजी ?

**मामा** : इनोद.

**आंधळा** : म्हंजी ?

**बजरंग** : जी गांवं मागासल्याली असल्यात ती पुढारलेली करतो.

**मामा** : म्हंजी जितं ग्रामराज्य असंल थतं रामराज्य करतो.

**आंधळा** : तुमीच करतां ?

**बजरंग** : आम्ही फक्स्त शेवा करतो.

**आंधळा** : शेवा म्हंजी ?

**बजरंग** : आमी मानसं सन्मार्गाला लावतो.

**आंधळा** : वाटंला लावतां ? मग ह्या गांवाचा पत्ता तुमास्नी कुनी दिला ?

**बजरंग** : आमच्या कानावं आलं की ह्यो गांव ल्यी मागासल्याला हाये.

**आंधळा** : मागासल्याला म्हंजी ?

**बजरंग** : आडानी.

**मामा** : म्हंजी जुना.

**बजरंग** : तर त्यो नवा करण्यापायीं म्हून आमी यात्रा काढल्याली हाये.

**मामा** : चालत.

**बजरंग** : तर या गांवाची अर्थयेवस्था बिगाडल्याली हाये ती सुदरावी म्हून आमी ह्या गांवामंधी जानार हावोत.

**आंधळा** : तुमी अर्थ सुदारनार का येवस्था सुदारनार ?

**बजरंग** : येवस्थेचा अर्थ सुदारनार. तवा आमाला वर जाऊं दे.

**आंधळा** : जायाचं न्हाई.

**बजरंग** : का ?

**आंधळा** : आमची विच्छा न्हाई.

**बजरंग** : का ? आपन काम काय करतां ?

**आंधळा** : संरक्षेण. गांवाच्या शीमेचं.

**बजरंग** : आंधळ्या डोळ्यानं ?

**आंधळा** : उगड्या मनानं. आंधळ्याला जग दिसतंय.

**मामा** : खरं ?

**आंधळा** : खोटं. खोट्या मानसाला वर जायाची परवानगी देतां येत न्हाई. आपल्या चेहऱ्यावरला रंग खरा न्हाई.

**बजरंग** : आपुन जरी न्हाई म्हनलांत तरी आमी आमचं व्रत सोडनार न्हाई.

**आंधळा** : व्रत म्हंजी ?

**बजरंग** : लोकशेवेचं ?

**मामा** : म्हंजी विनोद.

**आंधळा** : आमी नगं म्हनलं तरी ?

**बजरंग** : लोकशेवकाला इक्तं कोडगं बनावंच लागतं.

**मामा** : म्हंजी इनोद.

**आंधळा** : पर तुमची शेवा गांवाला नगं असली तरी ?

**बजरंग** : आमी करनार.

**आंधळा** : पर का ?

**बजरंग** : इचारूं ?

**आंधळा** : इचारा.

**बजरंग** : ह्या गांवांत म्युनिसिपालिटी हाये ?

**आंधळा** : न्हाई ?

**बजरंग** : न्हाई ? आरारारारारा ? बरं कोर्ट ?

**आंधळा** : न्हाई ?

**बजरंग** : न्हाई ? आरारारारारा. बरं पोलीस ?

**आंधळा** : न्हाई.

**बजरंग** : न्हाई ? आरारारारा. बरं झेल ?

**आंधळा** : हाये.

**बजरंग** : हाये ? थतं कोन असतंय ?

**आंधळा** : पोरं साळंतली. पोरं असत्याती.

**बजरंग** : आन चोर ?

**आंधळा** : न्हाई.

**बजरंग** : न्हाई ? म्हंजी ठावं न्हाई.

**आंधळा** : न्हाई.

**बजरंग** : म्हंजी न्हाई.

**मामा** : न्हाई ? आरारारारा.

**बजरंग** : तुमच्या गांवांत चोर न्हाई. पुलीसदुक्कीन न्हाई. म्हंजी तुमचं गांव चालतं कसं ?

**आंधळा** : गांव चालत न्हाई ते जागवंच असतंय.

**बजरंग** : तसं न्हाई पर गांवाला पैका कोन देतं ?

**आंधळा** : सरकार.

**बजरंग** : कंचं ?

**आंधळा** : ते ठावं न्हाई. वर्साला पन्नास हजार देतं.

**मामा** : लई झालं. आपल्याला पुरं झालं.

**बजरंग** : इक्तं कशापायी ?

**आंधळा** : गांवाचं रक्सान करन्यापायीं.

**बजरंग** : तुमच्या गांवांत चोर न्हाई. पोलीसदिकून न्हाई मग रक्शान कुनापासनं करतां.

**आंधळा** : वैरी गांवच्या मानसापास्नं. ( बंदुकीचा आवाज येतो. )

**बजरंग** : कुठाय गांव ?

**आंधळा** : आत्तां आवाज न्हाई आला का ? थतं हाये वैऱ्याचं गांव. पान्याच्या पल्याड. लई खराब जात वैऱ्याची. गांवातल्या पोरी पळिवल्यात. पिकं कापून नेत्यात. गुरं पळिवल्यात. त्यांच्यापास्नं गांवाचं रक्सान करावं लागतंय. म्हून परक्या मानसाला वर जायाची परवानगी देतां येत न्हाई.

**मामा** : बजरंगा.

**बजरंग** : ओ.

**मामा** : आतारं.

**बजरंग** : काय चिंता करन्याचं कारन न्हाई. बे कायदा. कुनाच्याबी मुलखांत घुसायचं आसलं तर तेच्यासाठनं रस्ता ठरल्याला हाये. चोराच्या दादाचा. दम सांगतो. ओ आंधळे बाबा. आमास्नी वर जाऊं दे.

**आंधळा** : वर जायचं न्हाई.

**बजरंग** : अहो, तुमी आमी भाऊ भाऊ.

**आंधळा** : वर जायाचं न्हाई.

**बजरंग** : तुमी आमी भाऊ भाऊ.

**मामा** : भाऊ भाऊ. (तुमी आमी भाऊ भाऊ – मामाचं नुसतं भाऊ भाऊ आन आंधळ्याचं वर नका जाऊं – या वाक्यांतील मिश्रणांतून उत्पन्न झालेला गोंगाट मास्तरांना उजवीकडून – रंगभूमीच्या – डावीकडं म्हणत आणतो. मध्यस्थाच्या भूमिकेत मास्तर सांगतात —

**सत्य अहिंसा क्षमा शांतता ।**
**हीच मानवा जीवनगाथा ।**
**शुद्ध शील हा चारित्र्याचा । एकमेव सन्मान ।**
**मानवा मानवतेला मान ।। १ ।।**

(हें गाणं संपवून आपल्याच नादांत वर निघून गेलेले मास्तर गेल्यानंतर)

**बजरंग** : दम हेला मानवता दावतो.

**मामा** : आन ती कसली ?

**बजरंग** : चोराची हाये. आंधळे बाबा, तुमी आमी भाऊ भाऊ – तुमी आमी भाऊ भाऊ – तुमी आमी भाऊ भाऊ (असं म्हणत आंधळ्याच्या डोक्यांत काठी घालतो – )

**मामा** : हे काय रं बजरंग !

**बजरंग** : मानवता हाये.

**मामा** : आन कुनी बघितलं तर ? ( आंतून दवंडीवाल्याचा टोल

ऐकू येतो. डाव्या बाजूनं मामा पळून जातो. तो ज्या बाजूनं गेला त्या बाजूनं बघत – )

**बजरंग :** आरं मामा माजा खलिता : ( असं ओरडत असतांना उजव्या बाजूनं कुणी तरी चूड घेऊन बुरखा अंगावर असलेल्या अवस्थेत जातांना दिसतं ! बजरंग लपतो. आणि ती व्यक्ति चूड घेऊन गेल्यानंतर आंधळा उठतो आणि )

**आंधळा :** चिंधी जळल्याचा वास आला. आन ते दोघं कुठं गेलं. आन माज्या डोकशांत काठी घातली. आन ह्यो वास आला ! आरं आग लागली का रं ? आरं कुठं आग लागली का रं ? ( ओरडतो आणि ओरडतच उठत जातांना चूड घेऊन गेलेली व्यक्ति ज्या दिशेनें गेली त्या दिशेकडं बघत आलेल्या दवंडीवाल्याची व त्याची धडक होते. )

**आंधळा :** आरं, आंधळा कोन हाये.

**दवंडी :** आंधळा तूच. म्या दवंडीवाला हाये. ह्या अंगानं तुला कुनी ग्येल्यालं दिसलं का ?

**आंधळा :** आंधळ्याला दिसतंय व्हयं ?

**दवंडी :** अरं मग पहारा कसला करतोयस ? ऐकूं तरी येतं का नाहीं ?

**आंधळा :** व्हयं कवा कवा येतं.

**दवंडी :** का येतं ?

**आंधळा :** कोन तरी, कुनाला तरी बोलल्यालं ऐकूं येतं. का लगीन करीन तर तुज्यासंगटच करीन.

**दवंडी :** माज्यासंगट ?

**आंधळा :** तसं न्हाई रं ? ती तेला म्हनते. आज सकाळीच म्हनली येशीवं.

**दवंडी :** कोन म्हनली ? कुनाला म्हणली ?

**आंधळा :** मंजुळा म्हनली आन शिरपतीला म्हनली. आन हकडं पाटलाचा बेत येगळाच हाये. तो आपल्या पोरींचं लगीन करून देया निगालाय वैऱ्याच्या पुढाऱ्यासंगट. वाघ माराया गेलाया तेच्या गांवांत.

**दवंडी :** आन म्होरं ?

**आंधळा** : म्होरं मला काय ठावं न्हाई.

**दवंडी** : मग असल्या अर्धवट म्हत्वाच्या बातम्या मला अदुगर सांगत जाऊं नगंस. अदुगरच माज्या नांवानं लोक वराडल्यात का ह्येलाच गांवाच्या अदुगर समद्या बातम्या कशा लागल्यात. तू आता काय म्हनला तेतलं मला काय कळल्यालं न्हाई. मला माजी कामं हाईत. तू आपली कामं कर. त्या धर्मागुणाची काय भांडनं लागल्याती. मास्तराचीं अंबू काय वैऱ्यानं पळवून नेली म्हंनं. ते आपलं काम करशील, का गांवाच्या म्हारक्या करशील ? मला माझं काम करूं दे. माज्या घशाला तरास देऊ नगंस. मला बोलन्याचा लई तरास व्हतो. मला दवंडी देयाची हाये.–[ आंधळा जातो ] ऐका हो, ऐका, समस्त गांवकरी मंडळी ऐका, ध्यान दिऊन ऐका, कान दिऊन ऐका. आज दसरा हाये. आन गांवच्या पाटलाची समद्यास्नीं अशीं इनंती हाये की जेच्या जिमिनींत या वर्साला पीक बराबर आल्यालं नसंल, धरतीमातेची किरपा झाल्याली नसंल, धनाची आडचन आसंल, धान्याची आडचन आसंल, तेच्यासाठनं गांवाचं कोठार पाटलानं उघडं करून ठिवल्यालं हाये. तवा आजच्या दसऱ्याच्या सनाला पाटलाची समद्यास्नी, अशी हात जोडून इनंती हाये. का जेला जिक्ल्या धान्याची जरूर आसंल. धनाची जरूर आसंल. तेनं तित्कं धान्य धन कोठारांतनं लुटून न्यावं हो. ( दवंडी संपल्यानंतर दवंडीवाला निघून जातो. आणि पुढलं दृश्य नाहींसं होतं. आकाशाच्या भव्यपणामुळं अधिकच उठून दिसणाऱ्या बजरंगाची प्रचंड मूर्ती डोळ्यासमोर दिसूं लागते. त्या मूर्तीच्या मागं दोन बाजूला दोन घरांची वा झोपड्यांची नुसती छपरंच दिसतात. त्यावरून हे स्थळ उंच टोकावर आहे. हे सहजी लक्षांत येतं. वेळ सकाळची असल्यामुळं आकाशांत तांबडं फुटण्याच्या वेळचे– नैसर्गिक रंग आणि हळूहळू प्रखर होणारा सूर्य-प्रकाश बलभीमाच्या उजव्या आणि डाव्या हाताला असलेले अनुक्रमे पाटील, दिवाणजी आणि बहिणाई व आणि कोणी तरी यांच्या घराची पुढची बाजू फक्त दाखवतो. ही आडगांवाची चावडी. पाटलाची जागा मारुतीच्या पायाशीं. मारुतीच्या उजव्या डाव्या बाजूला दोन उंच जुन्या समया अंगाऱ्याचं भांडं, घंटा, शिवाय मारुतीच्या पुढं खाली डाव्या उजव्या बाजूला सहज माणसं बसतील असे कांहीं वेडे-वाकडे पडलेले दगड

ज्यांचा बसण्यासाठीं उपयोग केला जातो, असे विखुरलेले दिसतात. सुरुवातीला दिसलेली बुरखाधारी व्यक्ती लपत छपत येऊन चूड विझविते, बुरखा काढते आणि कुणी बघत नाहीं याची खात्री करून घेऊन स्वतःचीच परिस्थिती स्वतःलाच समजून सांगते.— )

**माझ्या मनांत उगाच धाकधुक का ?**
**माझं गुपित कुणाला कळलयं का ?**
**वाऱ्याच्या कानांत मनांतलं गुपित जाऊन कोनतरी**
**बोललंय का ? माझं गुपित कुनाला कळलंय का ?**
**वाऱ्यानं जाऊन पाऱ्याच्या कानांत; वारं कांहींतरी**
**भरलंय का ?**
**माझं गुपित कुनाला कळलंय का ?**
**होता सूर न्हवती गानी. सबूद व्हता न्हवती वानी ।**
**व्हत्या लाटा न्हवतं पानी । तशीच मी अन न्हवतं कुनी ।**
**वाजतंय माझंच पाऊल वाटतंय ।**
**मागं मागं कुनीतरी येतंय का ?**
**माझं गुपित कुनाला कळलंय का ?**
**अभंग व्हता, न्हवती गाथा ।**
**हुरहूर व्हती, न्हवती चिंता ।**
**होतं भांडन, न्हवता तंटा ।**
**पाऱ्यावांचून ढगहि खोटा ।**
**सोत्ताच खोटा आन मलाच इचारतोय ।**
**सांग ह्यांत काय तरी खरं हाये का ?**
**माझं गुपित कुनाला कळलंय का ?**

( गाणं संपल्यावर जरा वेळानं मारुतीच्या जवळ येऊन बसते आणि— त्याच वेळीं दवंडीवाला शंकेखोर मुद्रेनं मारुतीच्या मागून तिला न्याहाळत असतांना— उजवा कौल द्यावा तशी मारुतीच्या गळ्यांतली पानांची माळ

सप् असा आवाज करून खाली येते आणि दचकलेली ती मुलगी– तिचं नांव मंजुळा म्हणूं लागते.—

**मनाचा ससा भित्रा कसा ?**
**वाजलं पडलं पान ह्याचे चालले प्रान।**
**मागंपुढं बगतोय। सारखा दचकतोय।**
**ह्येच्या मागं कुनीतरी लागलंय का ?**
**माझं गुपित कुनाला कळलंय का ?**

( हें गाणं संपल्यानंतर मागं वळून बघते तों तिथं दवंडीवाला त्याला उद्देशून– )

**मंजुळा** : तुला का कळलं का ?

**दवंडी** : व्हय. कळलं कीं. आक्का, शिरपतीसंगट आपलं लगीन होनार म्हन तू लई आनंदात हायेस न्हवं, आक्का तुज्या आनंदावं विरजण घालण्याची माझी विच्छा नाहीं, पर माज्या कानावं येक वार्ता आलीया. का पाटील तुजं लगीन वैऱ्याच्या पुढाऱ्यासंगट करून देनार हाये.

**मंजुळा** : भाऊ.

**दवंडी** : मला कळली वार्ता. माज्या डोळ्याचं पानी खळंना. तुला सांगावं कसं ह्येचाच इचार करत व्हतो. वेळीच सावध झाली न्हाईंस तर म्होरं लई आकांत गुदरंल.

**मंजुळा** : पर ह्ये तुला कळलं कवा ?

**दवंडी** : मला कळलं वैऱ्याच्या गावांतंच. पर पाटलाच्या म्होरं कुनाचं चालणार हाये का ?

**मंजुळा** : पर आबांनी ह्ये ठरवलं कशापायीं ?

**दवंडी** : वैऱ्यांत आनि आपल्या लोकांत पान्याजिमिनीवरनं चालल्यालं तंटं थांबावं म्हून. मला हे कळलं म्हून कुनाला सांगूं नगं. न्हाईतर पाटील मला पहिलं गोळी घालंल.

**मंजुळा** : भाऊ, काय व्हनार हाये रं ह्या गावाचं ? आबांच्या मनाइरुद्ध गेला मानूस तर त्यो वाचनार न्हाई. आनि आबांच्या मनापरमानं वागाया जावं तर गांव वाचनार न्हाई. कसं वागावं त्येच कळंना झालंया.

**दवंडी** : आक्का. म्या सांगू ? म्या शिरपतीच्या कानावं घालतो. गावाचं काय मत्तं हाये त्येचा अंदाज व्यतो. आन मंग करूं फळी उभी. आन तोपावत्तूर कसं वागायचं ते तुजं तू ठरीव.

**मंजुळा** : मंग बेस झालं कीं.

**दवंडी** : काय त्ये ?

**मंजुळा** : आत्तां माझं लगीन ठरलं न्हाओ कां ? वैऱ्याच्या पुडाऱ्या-संग त्ये.

**दवंडी** : म्हंजी ?

**मंजुळा** : मग त्येचं न्हाई का कल्यान झालं ? आपला—जल्मच त्येच्या-साठनं. आपलं नुकसान आन दुसऱ्याचं कल्यान.

**दवंडी** : असं उरफाटं काय बोलतीस ?

**मंजुळा** : आता असंच बोलायचं आणि असंच वागायचं. जा, ये दवंडी देऊंन. ( दवंडीवाला जातो. मुलगी मारुतीच्या पायाशीं जाते ) न्हाओ मोडलं आबांनी माझं वैऱ्यासंगं ठरविल्यालं लगिन तर गांवाचं नांव आडगांव लावणार न्हाई. दुसऱ्या कुणाच्या पायाशीं जावं घेवा ? तारनार मारनार तू हायेस. नवसाला पावनार हायेस. गांवामागं बळ तुजं हाये. बुद्धी दे. गांव वाचीव. वैऱ्याच्या हाती मला देवून गावांची राख करूं नगंस. इक्तचं मागायचं.

( खून, खून, असं म्हणत हात बांधलेल्या अवस्थेत, कुऱ्हाड हातातच अशा अवस्थेत धर्मा प्रवेश करतो. )

**मंजुळा** : का झालं रं धर्मा ?

**धर्मा** : माझा खून कराया निगालाय गुना. आन मलाच बांधून धाडल्या दिवानजीनं.

**मंजुळा** : अरं कां पर ?

**धर्मा** : अवो, कुऱ्हाड घेऊन लागलाय माझ्या मागं.

**मंजुळा** : पर बांधलेल्या हातातनं त्वा कुऱ्हाड सोडल्याली न्हाओस, का त्येच्या हातातली तिक्की कुऱ्हाड आन तुज्या हातांत हाये ती लेखनी ?

**धर्मा** : अवो पर अक्का, हात अदुगर त्येनं उगारला. ( दिवाणजी गुणाला घेऊन येतो. त्याच्याही हातात कुऱ्हाड आहे, पण तो मोकळा आहे. )

**गुणा** : रामराम करतो अक्कासाब. ( ती लक्ष देत नाहीं. ) रागावला व्हयं ?

**मंजुळा** : न्हाई. पूंजा करतो तुजी. शेंदूर लावून बसवूं का तुला मारुतीच्या जागेवं. गप उभा ऱ्हा त्या बाजूला. ( धर्माकडं पहात गुरगुरत गुना एका बाजूला उभा राहतो.) तू बी त्येतलाच व्हयं रं गुना ?

**गुणा** : त्येला गुना काय करनार ? धर्मानं कुऱ्हाड उचलली म्हून गुना उठला.

**दिवाणजी** : हें बरोबर झालें वैऱ्याच्या जातीचें बोलणें.

**मंजुळा** : म्हंजी कसं दिवानजी ?

**दिवाणजी** : कांहीं तरी निमित शोधून भांडणें काढीत बसायचें. आणि कोणी विचारलें तर यानें शस्त्र उचललें म्हणून मी आक्रमण केलें असें नुसतें म्हणायचें. म्हणजे मिळून मुळांत भांडणंच.

**मंजुळा** : दिवाणजी, तुम्हीं बांधून घातलाय ह्येला आणि खून करतोय ह्यो.

**दिवाणजी** : दोघांच्याही हातांत कुऱ्हाडी. कोण कुणाचा खून करतोय हें कळायला नको ?

**मंजुळा** : म्हंजी तुमास्नी त्यो झाल्यावंच कळायचा.

**दिवाणजी** : म्हणूनच म्हटले, एकाचे हात बांधल्यावर दुसरा आपोआप थांबेल. कुठून तरी वैर मिटवायचे.

**मंजुळा** : अदूगर सोडा त्येला.

**दिवाणजी** : अहो, पण...

**मंजुळा** : सोडा म्हणते ना ?

**दिवाणजी** : अहो, पण पुन्हा सुरू झाले कीं दोघे यायचे माझ्यावर— मध्यस्ती केलीय मी.

**मंजुळा** : नका सोडूं. गुना, हात सोड धर्माचे.

**गुणा** : व्हयं. सोडतोनां त्येला भीतो काय ? ( त्याच्याकडं जातां जातां ) कुऱ्हाड ठेवल्याली हाये. हात सोडन्याच्या अदूगर सांगतोय.

**धर्मा** : अदुगर माजी काढून ठेव. आन मंग हात सोड. (त्याचे हात सोडल्यानंतर धर्मा कुऱ्हाड उचलतो आणि गुणाच्या हातांत देतो. आणि मग आपली कुऱ्हाड घेतो. गुणा पहिल्या जागेला येऊन उभा राहतो.)

**मंजुळा** : का रे धर्मा ? बरं हाये का हे ?

**धर्मा** : पर म्या हात उचालल्यालाच न्हवता.

**मंजुळा** : आन तू रं गुना ? निस्ता उभा ? जा ना त्येच्या अंगावं.

**धर्मा** : ये की मी हाये. उभाच हाये.

**गुणा** : आक्काच्या देखत न्हाई.

**दिवाणजी** : आणि मघाशीं. माझ्यादेखत, अगदी अवसानांत आलां होतास की माळावर.

**धर्मा** : माळावर पाटलाची परवानगी लागत न्हाई.

**गुणा** : मग दिवाणजीला कोण इच्चारतो ?

**मंजुळा** : बरोबर हाये. आमच्या दिवानजीस्नी कळत न्हाई. आवं दिवानजी, आपापसांत मारामारी करावी लागतीय. आपलं बळ आपल्याच मानसांत खर्च होया पाहिजे त्येच्याशिवाय वैऱ्याचं हात बळकट व्हनार न्हाईत. आपसांत झगडून आपुन दुबळं झाल्याबिगार वैरी सबळ कसा होईल ? खरं हाये कां न्हाई दिवानजी ? हां हून जाऊं दे.

**धर्मा** : न्हाई, आपल्या देखत न्हाई. का रं गुना ?

**गुणा** : तरं ? आपुन कधी कायद्याच्या भाईर वागलोय का ?

**दिवाणजी** : काय साळसूदपणानें बोलतोय ? जसें कांहीं खूनबीन याच्या गांवचेच नाहींत.

**गुणा** : तसं म्या म्हनल्यालं न्हाई. खून तर करनार हायेच. पर त्ये कायद्यानं. जरा पाटलास्नी येऊं दे. काय न्याव करत्यात त्ये बगतो. मंग ह्येला भाईर येऊं दे. न्हाई काढला ह्येचा काटा तर कुऱ्हाडीला कुऱ्हाड म्हननार न्हाई. वारकऱ्याच्या तंबोरीगत गवसनी घालून ठिवल मारुतीच्या येवळांत न्हाई ह्येचा काटा काढला तर ?

**धर्मा** : आरं जारं काटा काढणार. जरा भाईर पड. आजची तिथ ध्येनांत ठीव आन म्होरल्या जत्रेला आठवनीनं येऊन उभा ऱ्हा. आबाळांत.

**मंजुळा** : ते कशापायीं ?

**धर्मा** : ह्येची पोरं श्राद्ध घालीत असतील न्हवं हितं ? त्ये बगाया ?

**गुणा** : आरं जारं श्राद्ध घालनार ? न्हाई, चिंता करूं नगंस. खर्च म्या करंल. गांवाला जेवन म्या घालंन. तुज्या शराद्धाचं. पर आज हुनच जाऊं दे. एक धर्माचा तर निकाल लागंल. न्हाईतर गुनाचा तरी काटा निगंल.

**मंजुळा** : दम धरा जरा. गांवातल्या मानसांची हत्यारंच काढून घ्याया सांगायाच होवीत. हातांतली सत्ता गेल्याबिगर शानपन येनार न्हाई.

**दिवाणजी** : पाटलांना.

**मंजुळा** : व्हंय. आसं येकदम इक्तं खरं बोलूं न्हाई दिवाणजी.

**दिवाणजी** : खरं आहे म्हणूनच बोलतोय. घास मोठा आहे. तोंड लहान आहे. पण वटवटीची संवय आहे. म्हणूनच विचारतोय. आपल्या लग्नासंबंधी ठरलें म्हणून कळलें.

**धर्मा** : ठरलं कां ? मग लग्नाला आमची लक्ष्मी येनार हां तयारीला.

**गुणा** : व्हय तुजी एकल्याची. माजी काय घरी बसनार हाये व्हयं काकनं भरून काढून म्हन.

**धर्मा** : काढून म्हन. काढून म्हन. त्वां गेल्यावं काकनं न्हानार व्हय तिच्या हातांत ?

**गुणा** : बिना चुड्यानं यील, पर घरांत बसंल का ?

**धर्मा** : कशी बसंल ? घरचं कार्य हाये ह्ये.

**दिवाणजी** : पाटलांच्या.

**गुणा** : म्हणजे आमच्याच. कां रं धर्मा ?

**धर्मा** : तर ? जलम पाटलानं दिला असला तरी वाढवली पोरगी गांवानं. हाय का न्हाई गुना ?

**दिवाणजी** : तुमच्या खुनाचं बारगळलं वाटतं ?

**धर्मा** : त्या भांडनांचं ह्ये कारन न्हाई. का रं गुना ?

**गुणा** : टाळी. या बाबतीत योकमत.

**धर्मा** : पाटलानं निकाल दिल्यावं ह्येचं काय वेडंवाकडं हुयाचं आसंल त्ये हूं देच.

**गुणा** : माझं न्हाई. ह्येचं.

**धर्मा** : ए, म्या जर अदुगर गेलो तर माझ्या लक्ष्मीला हितं लग्नाला आनायची विसरूं नगंस.

**गुणा** : मंग म्या गेल्यावं माझीला तूं आनशील काय ?

**धर्मा** : तर ? आक्कासाहेबांचं लगीन.

**गुणा** : म्हणजे आपल्या घरचं ?

**दिवाणजी** : ठरतेंय वैरी गांवच्या पुढाऱ्याशीं.

**धर्मा** : कोन ?

**गुणा** : काय ? वैरी गांवच्या पुढाऱ्याशीं.

**धर्मा** : हट ! आपल्याला त्वांड न्हाई बगायचं लग्नाच्या मांडवाचं.

**गुणा** : आनि माज्या घरची जर कां आल्याली दिसली का धर्मा, तर तथंनं आभाळांतनं उतरंन आणि मानगुटीला बसंल तुज्या म्होरल्या तिथीला.

**धर्मा** : येड्यावानी भलतंच काय ?

**गुणा** : आनि शिरपतीचं काय ?

**धर्मा** : म्हंजी ? मुंडावळ्या बांधनार शिरपतीला ?

**गुणा** : आन अक्षित टाका वैऱ्याच्या डोक्यावं ?

**धर्मा** : गांवाचं वाटोळ करनारं हैती व्हयं ?

**दिवाणजी** : वैर मिटविणार आहेत दोन गांवांचं. होय ना आक्का.

**मंजुळा** : तुम्हीच समदे बोलताय लगीन हुयाचं माजं. करनार हायेती आबा.

**धर्मा** : वाटोळं हुईल गांवाचं.

**गुणा** : पाटलाचं काय जातंय ?

**मंजुळा** : का करायचं, ठरवायचं आबांनी. पाटील ते, सत्ता त्येंची.

**दिवाणजी** : हातांतून गेल्यावर काय होईल ?

**मंजुळा** : पण ते आज कसं कळावं ?

**दिवाणजी** : आक्कासाहेब, आपल्या बुद्धीवर आमचा विश्वास आहे. पाटील भोळे आहेत. वैरी त्याचा फायदा घेतायत. तुम्हीं पाटलांचें मन बदला.

**मंजुळा** : साऱ्या मानसाला कुनी शिकवायचं? त्ये म्हनत्यात त्ये बरोबर हाये असं समजायचं. अवो, वैऱ्याच्या गांवांत मला दिली म्हंजी त्येचं भलं न्हाई का व्हनार!

**दिवाणजी** : आणि आपलें वाटोळें.

**मंजुळा** : होईना.

**दिवाणजी** : आं?

**मंजुळा** : असं आबा म्हनत्यात. (बाहेरून लेजिम वाजण्याचा आवाज येतो. बरोबर ढोल.) आबांना घेऊन आल्याली दिसतात मंडळी.

[बाहेरून दवंडीवाला धांवत येतो.
येतांना तो एक बावटा दाबून कण्हत आलेला आहे.]

**दवंडी** : चला, चला, मंडळी. त्ये धनगराचं बेनं कसं करतंया बगा.
(धर्मा, गुणा, त्याला थांबवण्याचा प्रयत्न करतात).

**धर्मा** : कोन काय करतंय?

**दवंडी** : ते धनगराचं बेनं कसं करतंया बगा?

**गुणा** : काय करतंय?

**दवंडी** : जाऊन बगा की स्वोत्ता. संजयावानी आपलं समदं महाभारत म्या सांगायचं आणि तुम्हीं धितराष्ट्रावानी निस्तं ऐकायचं? आमच्या गांवांत गांवकरी न्हाईतच. समदं पाटील. जावा जाऊन बगा स्वोत्ता.

(सगळेजण जातात. काय येडं बडबडतयं कांहीं कळंतच न्हाई. असं म्हणत— )

**दवंडी** : आक्का, गेलं कां समदं?

**मंजुळा** : व्हयं. का घालवलं रे त्येस्नी भाऊ?

**दवंडी** : मुद्दाम. आक्का, शिरपतीला बांधून घातलंया आबांनीं बांधावं.

**मंजुळा** : कां?

**दवंडी** : आग लावली त्येनं कुनाच्या तरी घराला. वैऱ्याच्या गांवांत. आज सांजच्याला पाटील गोळी घालनार हाये त्येला.

**मंजुळा** : वैऱ्याला?

**दवंडी** : न्हाई, शिरपतीला. कायद्याच्या भाईर वागला म्हून. आबा येकलंच येतायत.

**मंजुळा** : कंच्या अंगानं ?

**दवंडी** : वडाच्या अंगानं.

**मंजुळा** : आन शिरपती ?

**दवंडी** : पिंपळाच्या अंगाला. बांधावं.

**मंजुळा** : व्हयं ? भाऊ म्या कुटं हाये म्हून इचारलं कुनी तर ठावं न्हाई म्हून सांग.

**दवंडी** : व्हय, म्हंजी लोकास्नी कळंल कां तुम्हीं शिरपतीकडं गेल्यालं हाये.

**मंजुळा** : आतां गप बसतो कां ?

**दवंडी** : मला काय करायचंय ? वडाची साल पिंपळाला. ( ती जाते. दवंडीवाला कण्हत मारुतीच्या पायाशीं जाऊन बसतो. आणि बाहेर गेलेले गुणा, धर्मा, दिवाणजी परत येतात. )

**गुणा** : कां रं ए दवंड्या ? आं ?

**धर्मा** : कुठं हाये ?

**दवंडी** : कोन ? शिरपतीकडं गेल्याती.

**गुणा** : कुटं हाये धनगर ?

**दवंडी** : कुटं हाये.

**धर्मा** : धनगर कुठं हाये ?

**दवंडी** : म्या बघितला न्हाई.

**गुणा** : मंग आमाला कशाला भाईर काढलंस ?

**दवंडी** : त्येला बगाया.

**धर्मा** : तुला का झालं ?

**दवंडी** : कुठं काय ?

**धर्मा** : आन चेहरा असा का ?

**दवंडी** : वाघ मारला पाटलानं.

**दिवाणजी** : मग तुला काय सुतक आहे काय त्येचं ?

**दवंडी** : न्हाई वा.

**दिवाणजी** : अरे, वाघ मारला म्हणून हंसत सांगशील तर हें काय? कुणी घरचें माणूस मेल्यासारखें?

**दवंडी** : काय नाय. जरा खांद्याला रग लागलीया.

**दिवाणजी** : का?

**दवंडी** : काय नाय. जरा येशीपासनं पाटलास्नी वर घेऊन आलो.

**दिवाणजी** : खांद्यावरून?

**दवंडी** : न्हाई. म्या निस्ता एक हात आनला.

**दिवाणजी** एक हात म्हंजी?

**धनगर** : ( प्रवेशून ) दुसरा माझ्या खाद्यावं होता.

**दवंडी** : हे आलं.

**गुणा** : धनगराचं वेनं.

**दवंडी** : आम्हीं घेऊन आलो पाटलास्नी.

**धनगर** : का न्हाई, पाटील आमास्नी घेऊन आलंया म्हन.

**दिवाणजी** : अरे, सरळ बोला ना काय ते.

**धनगर** : अवो, बोलतो हेच लई हाये. पाटलांनी आमच्या खांद्यावं निस्तं दोन हात ठिवलं.

**दवंडी** : आपसूक चार पाय डोंगर चढाया लागलं.

**धनगर** : आमचं दोघांचं. म्या तर वाटंतंच बसणार होतो.

**दवंडी** : मग?

**धर्मा** : मग काय? पर येकदा बसल्यावं पुन्हां उठला असता व्हयं?

**गुणा** : त्यो ढीग उठला असतां पर पाटलानं उठू दिला असतां व्हय?

**दिवाणजी** : पण वाघ मारला नां पाटलांनी वैऱ्याच्या गावांतला. त्याचे कल्याण झाले म्हणजे तितके बरे.

**धनगर** : वाघ म्या मारला ( सगळेजण त्याच्याकडं बघून हसतात ) कारं हसतां? खरंच म्याच मारला.

**गुणा** : न्हाई कोन म्हणतो? वाघासारखा वाघ मेला आन हसतां काय? हसू नगा रं वाग त्वा मारलास? त्यो भ्येला असंल तुझ्या मेंढराला.

**धनगर** : आसंल, आसंल, त्ये म्या वाघाला इच्चारलेलं न्हाई. हातांत बंदूक आन पाटील गेल्यालं असं.

**दिवाणजी** : वैऱ्याच्या गांवात.

**धनगर** : वाघ माराया ?

**धर्मा** : त्वां कशाला गेलेला थतं ?

**धनगर** : मेंढरं चाराया.

**धर्मा** : वैऱ्याच्या गावांत.

**गुणा** : पर पाटलांनं बंदी केली न्हवं तुला ?

**धर्मा** : जवा तवा, जवा तवा बोंब मारतुयास तूं. वैऱ्यानं मेंढरं पळीवली, वैऱ्यानं मेंढरं पळिवली.

**गुणा** : आणि तुझ्या मेंढरावरनं रोजच्या रोज पाटलाचा आन वैऱ्याचा झगडा. पाटलानं बंदी ह्येच्यासाठनंच केली तुला.

**धनगर** : पर बंदी आजधरनं माफ.

**धर्मा** : कां ?

**धनगर** : कारन म्या वाघ मारला.

**गुणा** : त्यो कसा ?

**धनगर** : त्येच सांगतोय तर तुम्हीं ऐकून घीना झालाया तर आसं पाटील गेल्यालं. आणि असा जो म्होरनं एकदम वाघ आला का येकदम उडीच अंगावं.

**गुणा** : पाटलाच्या.

**धनगर** : न्हाई, माज्या. बोलाया न्हाईलो असतो व्हयं ? काय येड्या बोलतो. तर त्येनं उडी टाकली अंगावं.

**धर्मा** : आतां रं ?

**गुणा** : आनं मंग ?

**धनगर** : मग काय ? पाटलांनीं वाघाला झेलला. आल्हाद. ( मागून दवंडीवाला. )

**दवंडी** : आतां इच्या !

**धनगर** : हां. आन दोन पाय धरलं दाबून पायांत आन दोन धरलं हातात.

**दवंडी** : वाघाचं ?

**धनगर** : न्हाई, माजं, चार पाय मला हायती ?

**धर्मा** : चार पायाचं न्हाई पर गड्या तुला डोक्सं हाये.

**गुणा** : हाये. हां कानी म्होरं सांग.

**धनगर** : आरं कानी न्हाई. घडल्याली गोष्ट हाये. गेला का वाघ. दम दावतो तुला. ( दवंडीवाल्याजवळ जाऊन त्याला उठवतो. ) ( उभा करतो. ) म्यां पाटील. आन ह्यो वाघ. दोन पाय धरलं पायांत. ( दवंडीवाल्याच्या दोन पायावर पाय देतो आणि दोन खांदे दाबून धरतो. ) आणि दोघं बी आसं उभं, आस्सं.

**दवंडी** : आरं मला सोड. अदुगर माझा बावटा दुखतोय. ( त्याला सोडतो )

**धनगर** : तुमच्या ध्येनात आलं का ? ह्ये दोघं आसं उभं आणि बंदूक अशी खाली पडल्याली. म्या आपलं लांबून बघतोय इच्चार करतोय का आतां वाघराला गोळी कोन घालनार ? समदे लांबून बघल्यात आणि ह्ये दोघं उभं. तालमीवरल्या चित्रावानी. पाटलांनी मला बघितला का त्यांच्या जीवामधी जीव आला. का येक तरी आपल्यावाला हाये.

**धर्मा** : आणि हे तुला कळलं ?

**धनगर** : तर ? मला हळींच घातली त्येनी. म्या म्हनलं ह्या अंगाला मेंढरं चाराया आनली, पाटील घालतो गोळी. पर न्हाई. त्ये म्हनलं आजच्या डाव तुला माफ. तू जवळ ये आन घोडा वढ.

**धर्मा** : हे धनगराच्या बेन्या, वाघाची गोष्ट सांगतोयस आणि ह्यो घोडा कुठला आनला मंधी.

**धनगर** : बंदुकीचा. तर पाटील म्हनलं कीं ह्यो बंदुकीचा घोडा वढ. म्या तुला बक्षिसी दील.

**धर्मा** : आन त्ये दोघं तसंच उभं ?

**गुणा** : वाघ आणि पाटील !

**दवंडी** : तालमीवरल्या चित्रावानी ?

**धनगर** : तर म्या पाटलास्नी म्हनलं.

**गुणा** : आरं, ही का म्हनन्याची येळ हाये का ? इकडं पाटलाचा जीव धोक्यांत आहे. अदुगर घोडा वढ.

**धनगर** : हां, ह्येच म्हनलं पाटील. तवा म्या म्हनलं इचाराची गोष्ट हाये, तुमास्नी कळायची न्हाई. चुकीनं जर गोळी तुमास्नी लागली...

**गुणा** : येड्यावानी न्हाई तेच ? लाख मोलाचा मानूस जायाचा.

**धनगर** : हाय का न्हाई ? तर ह्येच्या परीस स्वोत्ताला गोळी घालून घ्यावी.

**धर्मा** : का न्हाई घेतलीस ? म्हंजी इक्त्या येळ तुजी चालल्याली बडबड तरी बोलून घ्यावी लागली नसती.

**गुणा** : आरं वाघाचं सांग की म्होरं. पाटील कुठं हायती ?

**धनगर** : त्ये मला काय म्हनलं ? वाघाच्या हातनं मरन्यापरीस तुज्या गोळीनं मेल्यालं लई बेस. तू घोडा वढ.

**धर्मा** : हा वढ घोडा.

**धनगर** : वढला.

**गुणा** : शाब्बास !

**धनगर** : आन थाड्दिशी—

**दवंडी** : त्यो वाघ मेला.

**धनगर** : न्हाई समोरल्या घराला आग लागली.

**दिवाणजी** : गोळीनं.

**गुणा** : आन वाघ मेला न्हाईच.

**धनगर** : गोळीनं वाघ मेला रं पर त्याचवक्ती समोरल्या घराला आग लागली.

**गुणा** : आतां या धनगराच्या आतां काय म्हणूं मी ? आरं, सुकाळीच्या ह्ये आगीचं काय काढलं आनखी नवं ?

**धर्मा** : ही आग त्वांच लावली असशील.

**धनगर** : न्हाई. ती शिरपतीनं लावली.

**गुणा** : बहिणाईच्या. आन ती कां ?

**धनगर** : मास्तरची पोरगी पळवून नेली वैऱ्यानं म्हून. ज्येनं पळवून नेली त्येच्याच घराला आग लावली आन पळाला शिरपती.

**गुणा** : शाब्बास. आन मंग ?

**धनगर** : शाब्बास काय ? जे कावलं पाटील त्येनी वाघाच्या भरांत राग फाडला.

**सर्वजण** : आं ?

**धनगर** : न्हाई, न्हाई, रागाच्या भरांत त्येनी त्यो वाघ फाडला.

**धर्मा** : फाडला ? पैरण फाडल्यात तसा ?

**धनगर** : नाहीं. भीमानं जरासंधाला फाडला तस्सा ? उभा. म्या मारल्याला.

**गुणा** : शाब्बास रे माज्या वाघ्रा.

**धनगर** : शाबासकी म्होरं हाये. तर त्यो वाघ फाडला का नाहीं वाघानं ? तसं वैऱ्याला वाटलं कां पाटील आपल्यावं कावला. मंग त्येन काय केलं आसंल ?

**धर्मा** : काय क्येलं ?

**धनगर** : नेहमी करत्यात त्ये क्येलं. आधी पाय उगारल्यात आन पाटलानं डोळं वर केलं का खाली वाकून पाटलाचं पाय धरत्यात.

**धर्मा** : म्हणजे ? मास्तरची पोरगी आली व्हयं परत ?

**धनगर** : व्हयं. पर वाघ म्या मारला. वाघाला गोळी म्या घातली.

**पाटील** : ( प्रवेशून ) मंग ती आमाला घातली तर बरं झालं नसतं व्हय ? ( धनगराच्या खांद्यावर थाप मारतात ) जय बजरंग !

**दिवाणजी** : असें भलतेंच काय बोलावें ?

**पाटील** : अवो, या येड्याला म्या म्हनलं का बक्षिसी माग.

**गुणा** : मग माग बक्षिसी.

**धनगर** : मागितली.

**धर्मा** : काय ?

**पाटील** : आमची अक्कल.

**दिवाणजी** : ती कशी देणार कोण कुणाला ?

**पाटील** : अवो, तसं न्हाई. ह्येनं धोका टाळला जीवाच्या माज्या आन बक्षिसी काय मागावी ? घोंगडीभर. जिमीन ? लई मागासल्याली मानसं गांवांतली बाबा. कसं रामराज्य व्हनार गांवाचं बजरंगा तुला ठावं. माजा

जीव वाचिवला ह्येनं आन काय मागावं तर एक घोंगडीभर जिमिन. म्हंजी काढली का न्हाई आमची अक्कल.

**धनगर** : पाटील, आपुन अक्कलेचं बोलायचं न्हाई.

**पाटील** : आं !

**धनगर** : न्हाई आपुन बोलायचं न्हाई. घोंगडीच्या लोकरीच्या सुताचा गुत्ता पाटलाला आन शेतकऱ्याला कळणार न्हाई. **तुका म्हणे तेथे पाहिजे धनगराचे । पाटील शेतकऱ्याचे काम नोहे** ॥ जागा देतां का न्हाई ? इक्तं सांगा.

**पाटील** : काय लोकांची डोक्शी म्हनावी कळंना. ए पोरा.

**दवंडी** : जी.

**पाटील** : त्या म्हातारीला आन बगू बोलावून.

**दवंडी** : व्हय आनतो.

**पाटील** : कुनाच्या आनशील ?

**दवंडी** : आत्तां सांगा की.

**पाटील** : आरं न्हाई कां आम्ही बांधून घातला त्येला बांधावं ? कायदा हातात घेतोय ? पोरगी पळिवली गेली मास्तरची. आमच्या पायावं आनून घातली कां न्हाई वैऱ्यानं. आमी पाटील हाये न्हवं गांवाचं. पर शिरंपतीला ह्यो अधिकार कुनी दिला ? ह्येनं कशापायी पेटिवलं घर त्या वैऱ्याच्या गांवातलं.

**दिवाणजी** : खरंच तें. अन्यायाची चीड कुणालाही येणें चूकच.

**पाटील** : अवो, पर न्याव देनार आम्हीं हावो कां न्हाई ? तर त्या शिरपतीच्या म्हातारीला जाऊन सांग रं पोरा. आनि दवंडी दिऊन ये गांवांत. आनि म्हनावं, कां सांजच्याला बहिनाईच्या पोराला गोळी घालणार हावोत. [ दवंडीवाला जातो. ] आम्ही वैर मिटवाया बगतोय गांवाची आन ह्यो पेटिवतोय.

**दिवाणजी** : बाकी वैर मिटविण्याचें हें उत्तम साधन. म्हणजे दुष्टावा करावयाचा त्यांनीं आणि शासन आपल्या माणसास.

**पाटील** : हाये का न्हाई ? आमाला कांहीं डोक्सं हाये म्हून आम्हांला पाटील केलेलं हाये. कायद्याचा वापर कसा करावा ह्ये समजाया डोक्सं लागतंया. न्हाईतर तुम्हीं कराया गेला लेखनी आन कापलं स्वोत्ताचं बोट. ह्या गावांत बगावा तो जो तो कायदा आपल्या हातांत घेतोय. का रं धर्मा. ए गुना, तुम्हीं काय खून करनार हाये म्हनं येकमेकाचा ?

**धर्मा** : त्यो माझा न्हाई. म्या करनार हाये त्येचा.

**गुणा** : खून म्या करनार हाये.

**पाटील** : आरं पर पाटील कोन हाये गांवाचा ?

**धर्मा** : आपुनच.

**पाटील** : मंग कायदा तुम्हीं का घेताय हातात ? शेती आमची नांगरट तुमची आसं कां ? येकमेकाचा खून करनार तुम्ही कोन ?

**धनगर** : पाटील आमच्या जिमिनीचं ?

**पाटील** : ए, गप बसतो का जरा ? दम धर. अदुगर ह्येचा निकाल लावतो. का रं धर्मा, ए, गुना, लई माजाला आलाया व्हयं ? कायदा हातांत घेताय ?

**धर्मा** : पर आमी कायद्यानं खून करणार हावो.

**पाटील** : त्ये कसं ? का खून कराया निगालाय सांगा बघूं.

**गुणा** : तुम्हीं न्याव करा पाटील. गेल्या वर्सोला माज्या शेतात पडला होता दुसकाळ. तवा ह्येनं माझी आई, भन, भाऊ, बायको समद्यास्नी संभाळलं.

**धर्मा** : ठावं हाये. म्हंजे म्या काय उपकार केल्यालं न्हाइती तुज्यावं.

**धनगर** : पाटील, आमी जावं का ?

**पाटील** : अरे, जरा दम धरतो का ?

**गुणा** : तर या वर्सोला काय झालं ? ह्येच्या शेतातलं पीक नेलं वैऱ्यानं कापून तर मी ह्येला काय म्हनलं का औंदा माझ्या शेतांतलं निम्मं धान्य तूं घे. तर त्यो ऐकना झालांया.

**पाटील** : बरं मग !

**गुणा** : तर आतां कायद्यानं इचार करून सांगा. ह्येला डोक्सं न्हायी.

मला डोक्सं न्हायी. आपनास्नी हाये. म्या ह्येचा करनार हाये तो खून कायद्यांत बसतो कां न्हाय ?

**पाटील** : कायद्याच्या दृष्टीनं इचार कराया होवा.

**धर्मा** : ( गुणा हंसतो ) कारं तुला हसाया का झालं ?

**गुणा** : कुनाला ? माझा चेहराच तसा हाये.

**पाटील** : आरं पर तू धान्य देनार, पैका घे.

**गुणा** : कोन ? काय ? पैका ? पैका तर घेनार न्हाईच धान्य तर देनारच. देनार तर फुकट. देनार आन देनार ते ह्येलाच देनार. आन जर घेतलं न्हाई तर आज सांच्याला ह्यो माघारा जात न्हाई.

**पाटील** : आतां वांदा आला हां का. आतां तुम्हीं काय म्हनतां धर्माजीराव ?

**धर्मा** : न्हाई, म्या म्हनलं पाटील, ह्येच्या म्हनन्यापरमानं म्या उपकार केल्यालं असल्याल ह्येच्यावर. पर म्या उपकाराची फेड उपकारानं का करून घेवी ? घेवी कां ?

**पाटील** : आं ? हां. कायद्याच्या दृष्टीनं तुमचंबी म्हननं खरं हाये. ( धर्मा हंसतो. )

**गुणा** : का रं ? आतां तुला बरं वाटलं आसंल.

**धर्मा** : व्हय. माजा बी चेहरा कवा कवा तसा होतो.

**गुणा** : तसा चेहरा असतांना डोळे मिटतो बग तुजं. मला जरा मोकळा होऊं दे.

**पाटील** : ( उठतो ) अवो, मोकळं व्हनार. आमाला जरा इच्चारतां कां न्हाई ? मंग तुम्हीं काय म्हनतां गुनाजीराव ? तुम्हीं पैका घ्येनार न्हाई आन धान्य तर ह्येलाच देनार.

**गुणा** : व्हय. आन ह्येनं न्हाई घ्येतलं तर सांजच्याला स्वोत्ताच्या घरीं जात न्हाई.

**पाटील** : जित्ता. आन तुम्हीं धर्माजीराव ?

**धर्मा** : उपकाराची फेड म्हणून म्या घेनार न्हाई.

**पाटील** : दिवानजी, आडगांवचा कायदा काय म्हनतोय ?

**दिवाणजी** : कायदा म्हनतो. कीं ज्याच्याजवळ धान्य जास्त असेल ते जप्त करून कोठारांत जमा करावे.——

**पाटील** : ठीक हाये. मंग आसं करा. बैलगाडी धाडून द्या जावा. आन जप्त करा धान्य गुणाच्या शेतावरलं.

**दिवाणजी** : बरें आहे.

**गुणा** : पर पाटील——

**पाटील** : कायद्याच्या भाईर जायाचं न्हाई. इकलं आसतं धान्ये ह्ये तर कितीसं पैकं मिळाले असतं तुमास्नी !

**गुणा** : आलं आसतं कीं पांच हजार.

**पाटील** : आतां इच्य्, मंग लई दांडगी रक्कम हाये कीं, पांच हजार. आनि ह्येनं पैका दिला तर तुम्हीं व्येनार न्हाई ?

**गुणा** : नाहींच.

**पाटील** : दिवानजी, सरकारी तिजोरीतनं पांच-सहा हजार रुपये काढा आन ह्येच्या घरी पोचवा. धान्याच्या मोबदल्यांत. काय गुनाजीराव ? सरकारी पैका हाये ह्यो. व्येनार कां गोळी घालू ?

**गुणा** : न्हाई. सरकारी पैका व्यावा लागतोय.

**पाटील** : आन दिवानजी, धान्य पोचवा ह्येच्या घरीं. सरकारी म्हून, तुम्हीं सरकारी धान्य घेनार हाये का——

**धर्मा** : गोळी नका घालूं. सरकारी धान्ये व्येवं लागतंया.

**पाटील** : ( दोघांना जवळ घेऊन ) दसऱ्याचा दिस हाये ह्यो. येड्याहों भांडनं कसली करतांय ? जावा हितनं आपापल्या घरी जावा. ( ते दोघे मागें जातात. मारुतीजवळील सोनं घेऊन पुढें येतात. पाटलाला सोनं देऊन नमस्कार करतात. ) येकमेकास्नी द्या. ( एकमेकांना आलिंगन व सोनं देतात. ते जाणार इतक्यांत—— )

**धनगर** : पाटील ( सोनं देतो, नमस्कार करतो. ) ते आमच्या जिमिनीचं. ये धर्मा, ये गुना, जरा दम खावा कीं, तुमच्या देखतां झालेली गोष्ट हाये ही.

**पाटील** : व्हयं बाबा व्हयं. ह्या लोकास्नीं काय डोक्शींच न्हाईत. आमाला लागलीया चिंता रामराज्याची. ह्ये बगतंया घोंगडी भर जिमिन. दिवानजी, देऊन टाका. त्यो काय म्हणतोय तो कागुद करा.

**धनगर** : ह्या दोघांच्या साक्षीनं.

**पाटील** : व्हयं बाबा व्हयं. कुठं अक्कल गेलीया तुझी केळी खाया...

**धनगर** : जिमीन दिली नां पाटील आतां केळीची कथा ऐका. म्या पहिल्यांदाच सांगितलं व्हतं. घोंगडीच्या लोकरीच्या सुत्ताचा गुत्ता पाटलाला कळायचा न्हाई.

**पाटील** : आं ?

**धनगर** : आतां केळी खाया गेल्येल्या अक्कलेची कथा ऐका. ह्यो धागा घोंगडीचा सोडला. बांधला मारुतीच्या पायाला आनि ह्यो निगाला धनगर... तुका म्हणे तेथे पाहिजे धनगराचे । पाटील शेतकऱ्याचं काम नोहे ॥ गोपाळकृष्ण—गोपाळकृष्ण......( धनगर निघून जातो. गुणा व धर्मा जरा पुढं जाऊन परत मागं येतात. पाटील बसतात. )

**धर्मा** : पाटील.

**पाटील** : का हाये आतां ? कां थांबलाय ?

**धर्मा** : न्हाई आमी ऐकलं का आक्कासाहेबाचं लगीन तुम्हीं......

**गुणा** : वैऱ्याच्या पुढाऱ्यासंगट करून देणार हाये म्हनं.

**पाटील** : व्हय, का ? तुमच्या पोरीची सोयरीक जमनार व्हती का काय त्येच्याशीं ?

**धर्मा** : तसं न्हाई पाटील, पर त्ये बरं न्हाई.

**पाटील** : का ?

**गुणा** : कारन त्ये खरं न्हाई.

**पाटील** : काय खरं न्हाई ? ए जावा, घरी जावा, स्वोत्ताच्या शेता-फळीला भार किती आला त्यो बगशील का दुसऱ्याच्या अंगणांतल्या बोरीचं कांटं मोजशील.

**धर्मा** : काटंच मोजतो. का रं गुना ?

**गुणा** : व्हयं. काटंच मोजतो.

**पाटील** : आरं पर कां ?

**गुणा** : कारन त्ये पडनार हायेत गांवाच्या वाटेवं.

**धर्मा** : माळ्यावर शिमगा करायचा झाला तर पाटलाची परवानंगी घ्यावी लागत नसंल.

**गुणा** : पर चावडीवं करायचा झाला तर पाटलाला गांवाची घ्यावी लागते.

**धर्मा** : गांवात तुमचा जावाई म्हून वैरी आला तर नुकसान होईल गांवाचं.

**गुणा** : त्यो जर जावाई म्हून आला तर वैऱ्याची राजवट आपल्या गांवात सुरू हुईल.

**पाटील** : आरं पर म्या जित्ता असतांना छाती हुईल का त्याची कांहीं येडं वाकडं करन्याची. आमच्याशीं त्यो कसा वागतोय त्ये पाहिलं न्हाई कां तुम्हीं. गांवात गेल्यावं त्या मास्तराची पोरगी आनून घातलीच कां न्हाई त्यानं आमच्या पायावं. आनली का न्हाई आमी परत ?

**मास्तर** : ( प्रवेश करून ) ती आणली नसती तरी चाललं असतं. पण स्वतःच्या मुलीच्या आयुष्याचा का विध्वंस चालवलायस तूं ?

**पाटील** : कसला विध्वंस ?

**मास्तर** : कुणाशीं लग्न करून द्यायचं ठरवलंयस तूं तिचं ?

**पाटील** : कुनाशी बी करून दील. इचारनार तुम्हीं कोन ?

**मास्तर** : मी मास्तर आहे तुझा.

**पाटील** : लई बोलायचं काम न्हाई. बाबानं जबरी केली म्हून पाटी पूजनाच्या दिशी.एक दीस साळंत ग्येल्यालो होतो. त्याच्या दुसऱ्या दिशीं पाटी फोडली ते"त्वांड न्हाई बगितलं साळंचं ? एक अक्षर लिवतां येत न्हाई, लई रुबाब करायचं काम न्हाई. माजी पोरगी म्या कुनालाबी दीन.

**बहिणाई** : ( प्रवेश करून ) पर माज्या पोराला देऊं नगंस.

**मास्तर** : हे भलतेच काय बोलतेस बहिणाई. मी जमवायला बघतोय आणि तूं बिघडवतेस काय ?

**पाटील** : आरं पर म्या ह्ये लग्नाचं बोलायच्या अदूगर गांवाला ही वातमी लागली कशी ? ( दवंडीवाला प्रवेश करून. पाठमोरा आहे )

**दवंडी** : मला काहीं ठावं न्हाई. म्या आतांच ऐकतोय. म्या निस्ता सांगावा देया गेलो व्हतो बहिनाईला.

**पाटील** : व्हयं. बहिने, आज गोळी घालणार हाये म्या तुज्या पोराला. आमचा कायदा स्वोत्ताच्या हातांत घेतोय.

**आंधळा** : सत्ता बोल. सत्ता.

**पाटील** : तूं गप बसतो का आंधळ्या.

**आंधळा** : क्यूं? परस्पर घाव लग्या क्या? लोभ है तेरेको सत्ताका और म्हणूनच तू शिरपतीकी दुष्मनी करता है करके. और वैरीको घरमें जावाई करके बुलाता है! मैं तेरेको बोलता आबा मंजुळाक्काकी शादी शिरपतीके साथच व्होनेकु हुना!

**बहिणाई** : आबा, ह्या लग्नाच्या बाबतींत म्या स्वोच्छ सांगते, माजा पोरगा कायद्याच्या भाईर वागनारा हाये. त्याच्यासंगट पाटलाच्या पोरीचं लगीन झालेलं मला चालनार न्हाई.

**मास्तर** : सगळं गांव विरुद्ध जाईल बहिणे.

**पाटील** : अरे पोरीचा बा न्हाई म्हनतो पोराची आई राजी न्हाई आणि तुम्हीं कां बोहलं सजवाया लागलाया?

**दिवाणजी** : आणि संध्याकाळी पाटलाच्या गोळीला बळी पडल्यावर कसे होईल लग्न? काय पाटील?

**बहिणाई** : त्ये गोळीचं घील बगून शिरपती स्वोत्ता. [मंजुळा येते]

**मंजुळा** : आबा, वो आबा.

**पाटील** : आन तुम्हीं कुठं गेला व्हता?

**मंजुळा** : समजूत घालाया गेले व्हते अंबूची. मास्तरांच्या घरीं. लई दुख झालं असंल तिला असं मला वाटलं. पर येडी हासतच व्हती, परत आनली म्हून.

**मास्तर** : मग काय रडायला हवं होतं काय तिनं?

**मंजुळा** : मग वैऱ्याचं नुकसान नाहीं का झालं? त्येच्या जीवाला किती दुख झालं आसंल? बिचारा.

**मास्तर** : डोकं फिरलंय तुझं.

**मंजुळा** : ते तुमच्या पोरीचं. आवं आबा, ती हंसतीया वेडी. वैऱ्यानं तिला सोडलीया म्हून हंसतीया.

**पाटील** : आक्कासाब, आमी तुमचं लगीन वैऱ्याच्या पुडाऱ्यासंगट करून द्यायाचं ठरविलं हाये. तुमचं काय मत्त हाये.

**मंजुळा** : वडील मानसाच्या शब्दाभाईर जातां येतं व्हयं ? कुनाच्या दरोजावं बळी जायाचं हे काय बकऱ्यानं ठरवायचं व्हयं ? धनी म्हनंल तसं, कंची तीथ ठरली ?

**पाटील** : ऐका मंडळी. बसा. ( सर्वजण बसतात ) ह्या आपल्या आडगांवाचं रामराज्य कराया होवं. ही माजी तळमळ हाये. आन ह्या माज्या येकल्या पोरीला ती समजल्याली हाये. काय खरं हाये कां न्हाई आक्कासाब ? ( मंजुळेला टाळी देतो. )

**मंजुळा** : आई !

**पाटील** आकासाब ? कां वं ? डोळ्यामंधी पानी कां ?

**मंजुळा** : कांहीं नाहीं माझा हात भाजला.

**पाटील** : म्हारुतीचा दिवा लावत असतांना आसंल. जावा, समईतलं तेल लावा जावा. तवा मंडळी, वैरी झाला तरी मानूस, आपुन बी मानसं ही दोन मानसं एक करावी. तंटं मिटवावं. आन थोडं शानपन त्या गांवाचं ह्या गांवांत यावं ह्यो माजा हेतू हाये.

**मास्तर** : पण या लग्नानं काय होणार आहे ?

**पाटील** : वाः, अवो या लग्नानं त्या जावयाला आपला करून घेतला का म्हंजी त्याचं शानपन आपल्या गांवाला शिकायला मिळंल. मागासल्याली मानसं सुधारल्याली व्हत्याल. कसं आक्का.

**मंजुळा** : खरं हाये. म्हंजी आपल्याकडली मानसं बी तिकडल्या पोरी पळवून आनत्याल. तिकडली पिकं कापून आपल्याकडलं धान्ये वाढवत्याल. शानी व्हत्याल. मंग गांवाचं रामराज्य हुईल. इत्तं वय झालं आबांचं, त्येरनी कांहीं डोक्सं न्हाई व्हयं ? त्येरनी कांहीं सत्तेचा लोभ नाहीं सुटलेला. का दोन्ही गांवांची मत्तं आपली करून घेन्यासाठीं स्वोत्ताची पोटची पोरगी वैऱ्याला दिऊन पाटीलकी टिकवाया. खरं हाये का न्हाई आबा ?

**पाटील** : हं. आवं, आमी त्या गांवात गेलो. लई चांगली मानसं. तुमी आमी भाऊ भाऊ म्हून वरडल्यात.

**मंजुळा** : व्हयं वरडल्यात.

**धर्मा** : त्ये ऐकलंया आमीपर.

**गुणा** : म्या पर ऐकलंया.

**पाटील** : ऐकलंया न्हवं ! तवा गुना, धर्मा, जावा तुम्हीं. त्यो वैऱ्याचा पुढारी येतोय त्याचं स्वागत करा. जावा येशीवं. जावयाला वधूनं ववाळावं लागतंय. जावा आक्कासाव, ववाळा जावा.

**मंजुळा** : मला जमनार न्हाई.

**पाटील** : ऑं ?

**मंजुळा** : म्या तुमच्या शब्दाभाईर न्हाई आबा, पर माझा हात भाजलाया.

**दिवाणजी** : पण पाटील, वर नेमस्त असला तर वधू वाग्दत्त कुठं आहे ?

**पाटील** : आरं व्हय. धर्मा, गुना, जावा. तुम्हीं जोड्यानं जावा, त्या वैऱ्याला ववाळा जावा.

**धर्मा-गुणा** : पर पाटील ? ( पाटील त्यांच्याकडं बघतो ) आमी काय-द्याच्या भाईर कधी वागलोय का ? ( आरतीचं साहित्य घेऊन जातात, त्यांच्यापाठोपाठ मंजुळा दवंडीवाल्याला जाण्याची खूण करते, तो जातो. )

**पाटील** : आपलं काय मत्त हाये दिवाणजी ?

**दिवाणजी** : आक्कासाहेबांच्या बुद्धीवर आमचा विश्वास.

**पाटील** : आणि आमच्या ?

**दिवाणजी** : तुमच्या समोर अधिक बोलणं अवघड. सत्ता हातांत आहे, बळ आहेच. बुद्धीचा उपयोगच नाहीं.

**पाटील** : तुम्हीं काय इनोदी बोलला जनूं ? वैऱ्याच्या म्हनन्यापरमानं आपुन बी आपल्या हातांतली हल्यारं काढून ठिवली म्हंजी या गावाचं रामराज्य हुईल.

**बहिणाई** : वैऱ्याच्या म्हनन्यापरमानं माकडं करून ठेव गावांतल्या मानसांची म्हंजी रामराज्य हुईल. का बुद्धी चळली का तुझी ? हल्यारं काढून माणसं नांगराला जूप.

**पाटील** : कां गं बहिने, तुझा पोरगा गुंडगिरी करतो म्हून ?

**बहिणाई** : अरं, त्येला कर ना शासन. पर गांवाला कां दुबळं बनिवतोस ?

**पाटील** : रामराज्य करनार हाये गावांचं ? का आक्का ?

**मंजुळा** : व्हयं. हत्यारं ठिवल्यावं हुईल की.

**मास्तर** : बहिणे, तू चल, इथं शिजण्याइतकी आपली डाळ हलकी नाहीं. आज याला पटणार नाहीं. पण काळ बरोबर उत्तर देईल. चल रे आंधळ्या. ( जायला लागतात. )

**पाटील** : ऐ, येड्याहो, कुठं निगालां ? आमावं रागावून ? पाटीलकी चालंल व्हयं आमची समदं गांव रागावल्यावं ? ( उठतो. ) दिवाणजी, या लग्नाच्या बाबतीत आमच्या इरुद्ध कोन कोन बोललं ?

**दिवाणजी** : मास्तर, बहिणाई, आंधळा, आणि मी सुद्धां.

**पाटील** : आनि बाजूनं कोन कोन बोललं ?

**दिवाणजी** : धर्मा आणि गुणा.

**पाटील** : म्हंजी. लोकमत्तं ह्या अंगाला हाये. मग असं करा. धर्माचं आणि गुनाचं समदं धान्य जप्ती करून घ्या आनि त्येस्नी म्हनावं होवं तर सरकारी कोठारातनं पोटापुरतं घेऊन जावा. लाचारी करत्यात. आनि ईरुद्ध जे बोललं त्या समद्यास्नी आज दसऱ्याचं खरं सोनं द्या जावा.

**दिवाणजी** : हो, देतो की.

**पाटील** : तुमी सोडून. अवं, इरोधी पक्ष लागतोय. इरोधाशिवाय राजकारण व्हतं का काय कंधी ? अवो आक्कासाब, ह्येस्नी आत घेऊन जावा, सोनं द्या जावा. आज दसरा हाये.

**आंधळा** : मैंने पहिलेच बोल्या था. ऐसा पटेल है इसलिये तो गांव चला है. बलभीमकी किरपा है करके.

**बहिणाई** : तुझा सोबावच कळत न्हाई म्हाताऱ्या.

**आंधळा** : तू क्या तरनी हुई क्या मावशे ?

**बहिणाई** : ये, तुझी हनुवटीखाली लोंबतीय ती अक्कल बघ किती पिकलीय ते मुडद्या.

**आंधळा** : भईने तेरे डोस्केपर जो बाल है वो क्या धूपसे पके है क्या ?

**वहिणाई** : अरे गप की—

**आंधळा** : मुड्या बोलकी !

**पाटील** : अरे, दसऱ्यादिशीं येकमेकास्नी शिव्या कां देतां ?

**मास्तर** : दसऱ्यासारखा दिवस आणि भांडणं कसली करतां ! शिव्या कसल्या देतां ?

**आंधळा** : एकेकको आदतच रहती है. इसका कोन्सा भी म्हनना गानेकेविगर शुरू होता नहीं और उसका कोनसा भी म्हनना शिवीके बिगर पुरा होता नहीं.

**वहिणाई** : अरं गप मुड्या. आरं दसऱ्यासारखा दीस आन भांडनं कशापायी काढतुयास ?

**तुमी एकमेकातली वैरं इसरा इसरा ।**
**नवा निरोप घेऊन आला दसरा दसरा ॥**

**मंजुळा** : **लुटा लुटा धान्य धन । द्यावा अनाथा आसरा ॥**
**हाये जिमीन सोन्याची । हात मातीत पसरा ॥**

**वहिणाई** :

**दिवाळीचा मोटा भाऊ-दसरा- भाऊ-बीजेसाटी आला.**
**सोनं पिकवी शेतांत । काळ्या मातीत थांबला ।**

**मंजुळा** : **लुटा दोन हाती सोनं ग्यान सांगतो दसरा ।**
**ऋन काढाया ग्यानाचं सन करावा साजरा ।**

**आंधळा** : आं ? मेरेको भी दे खरा सोना ।

**वहिणाई** : ( जाता जाता ) नको धान्य नको धन । साधी आपल्याची पानं । दसऱ्याच्या पुन्याईला मानसाचं होतं सोनं ॥ [ जाते ]

**पाटील** : भोळी माझी मानसं, भोळा माझा गांव, तुझी किरपा हनमंता सदा नवासाला पाव । ( बसतो ) ( मधून मधून ताना मारीत पुजाऱ्याच्या वेशांत मारुतीच्या पायाशी बसलेल्या वेड्या नारायणकडं वळून— ) तुला काय सोनं कसलं न् नानं कसलं ! येड्या अरं म्हारुतीचं पाय कसलं चेपतंय्स ? कुठं मास्तराची इद्दत्ता अन् कुठं तूं !

**मामा** : ( प्रवेश करतो बसतां बसतां पाटलाला धक्का लागतो–पाटलाला पाहून ) ये जाङ्या, पाटील कोन हायेत ?

**पाटील** : ( रागाने पाहून उभं रहाण्याची खूण करतो, मामा उभा राहतो ) काय झालं ?

**मामा** : पाटील कोन हायेत ?

**पाटील** : का रं दिसत न्हाई का तुला ?

**मामा** : न दिसाया काय झालं ? एक पौंडी चालत आलेला हाये खालनं वर. मला पाटील होवं हैती.

**पाटील** : कां ? दत्तक घेतो का ?

**मामा** : मलाच कोन दत्तक घेतोय कां बघतोय. दत्तक नगं पाटील होवंत.

**पाटील** : तुला दिसतं पर कळत न्हाई.

**मामा** : दिसन्याचा संबंध काय हाये कळन्याशीं. उघड्या डोळ्याचं आंधळं लई जगांत.

**पाटील** : लई अनुभव हाये जगाचा. आला कुनीकंडं तूं ?

( दिवाणजी येतो. )

**मामा** : पाटलासाठनं येक सरकारी खलिता घेऊन आलोय, इनिसपेटकर-कडून. वरल्या हापीसातनं आलोया.

**पाटील** : वरल्या हापीसातनं आला व्हय ? या या, बसा की, आमीच पाटील, आमी आपल्याला वळाखलं न्हाई.

**मामा** : तसंच माझं झालं असंल. ह्यो खलिता. सरकारी.

**पाटील** : सरकारी ?

**मामा** : हां सरकारीच. वाचा.

**पाटील** : वाचा. आमची झाली बंद. आरं येङ्या वाचतां येत असतं तर मास्तर नसतो का झालो ? पाटील कशाला झालो असतो ? वाच रं दिवानजी.

**दिवाणजी** : ( वाचतो ) वीरबहाद्दूर हणमंत बळीराम.पाटील—

**पाटील** : म्हंजी आमीच.

**मामा** : आसंल, आसंल.

**पाटील** : आसंल काय ? हायेच.

**दिवाणजी** : वीरबहाद्दूर हणमंत बळीराम पाटील, मौजे आडगांव बुद्रुक यांसी सरकारी पातळीवरून विचारण्यांत येते की—

**पाटील** : इचारा, इचारा.

**दिवाणजी** : या हुद्यावर आपली नेमणूक झाल्याला आज पंचवीस वर्सं झाली.

**पाटील** : व्हयं, ठावं हाये.

**दिवाणजी** : आपण आपली कामगिरी चोख बजावीत आहांत.

**पाटील** : आरं गाढवा बजवावीच लागतीया.

**दिवाणजी** : अशी आमची खात्री होती.

**पाटील** : व्हती ? व्हती ? व्हती म्हंजी ?

**दिवाणजी** : मला वाचूं दे नां.

**पाटील** : मग वाच नां, तुला कोन माराया लागलाया ? (हंसतो.)

**मामा** : काय झालं ?

**पाटील** : ह्यो आमी इनोद केला.

**मामा** : मला हासाया आलं न्हाई.

**पाटील** : तुमासाठनं केला न्हाई. हांस रं दिवानजी.

**दिवाणजी** : हांसू कां वाचूं ?

**पाटील** : बोलूं नगं वाच.

**दिवाणजी** : तर इथं वारंवार आलेल्या रिपोर्टावरून आमच्या ध्यानीं आले कीं गेल्या पंचवीस वर्षांत आपल्या गांवांत एकही चोर सांपडलेला दिसत नाहीं.

**पाटील** : काय दिसत न्हाई.

**दिवाणजी** : चोर.

**पाटील** : चोर म्हंजी ?

**दिवाणजी** : यांत लिहिले ते वाचले.

**पाटील** : आरं वाचाया चुकतोयस नीट वाच.

**मामा** : न्हाई. बरोबर हाये ते.

**पाटील** : कां वं ? कुनाचं दिवानजी ह्ये ? आपलं का आमचं ?

**मामा** : आपलंच की.

**पाटील** : मंग त्येला बराबर म्हननार तुमी कोन ?

**मामा** : चुकलं.

**पाटील** : पुन्हां चुकूं नगं. बराबर हाये. वाच रं म्होरं वाच.

**दिवाणजी** : एकही चोर सांपडलेला नाहीं. सबब आपली पाटीलकी कां रद्द करण्यांत येऊं नये.

**पाटील** : ( उठून ) आमची ? पाटीलकी ? का पर ?

**दिवाणजी** : आजपासून तीन आठवड्यांनी आपल्या गांवाची इनिस्पेक्शन आहे त्या दिवशीं जर जेलमध्ये चोर दिसले नाहींत तर आपली पाटीलकी रद्द करण्यांत येईल. ही समज देण्यांत येत आहे. कळावे.

**पाटील** : काय ? कळावं काय येड्या ? कांहीं कळलंच नाहीं ?

**दिवाणजी** : तुमची पाटीलकी रद्द करण्यांत येईल.

**पाटील** : ते कळलं रं, पर कां ?

**मामा** : तुमच्या गांवांत चोर न्हाईत.

**पाटील** : आरं पर म्हंजी काय न्हाई ? का रं दिवानजी ? आपल्या गांवांत काहीं कमी हाये ? धन हाये. धान्य हाये. मानसं हायेत. बंदुका हायेत. धनगर हायेत. मेंढर हायती. समदं हाये. ह्यो न्हाई काय म्हनतो ? उगा आपलं वरल्या मानसानं खालल्या मानसावं अधिकार गाजवायचा ? पाटीलकी रद्द कराया निगालाय ?

**मामा** : अवो, पर इनिसपेशनच्या दिशीं जेलमंधी चोर दावा म्हंजी झालं.

**पाटील** : आरं म्हंजी काय दावा. का रं दिवानजी तुला काय कळलं का ?

**दिवाणजी** : कळलं कीं.

**पाटील** : का कळलं ?

**दिवाणजी** : तुमची पाटिलकी रद्द होणार.

**पाटील** : ते झालं रं, पर म्होरं काय ?

**दिवाणजी** : पुढं काय ? हरी हरी.

**पाटील** : ए दिवानजी अजून म्या जाग्यावं हाये. इकल्यात हुरळून जाऊ नगं.

[ धर्मा गुणा येतात, मागून दवंडीवाला येतो. ]

**धर्मा** : पाटील, वैरी आलाय.

**गुणा** : एशीपाशीं उभा केलाया.

**पाटील** : मागारी जा म्हनावं. लगीन करतोय. आरं येड्याहो माझी इथं पाटीलकी जाया निघाली.

**धर्मा** : कां हो ?

**गुणा** : तुमची पाटीलकी ! आन ती कां ?

**दिवाणजी** : पाटील, ह्यांना ठाऊक असेल.

**पाटील** : काय ते ?

**दिवाणजी** : तेच. आपल्या गांवांत काय कमी हाये म्हणतात ते.

**पाटील** : आरं व्हयं. कारं पोराहो — आपल्या गांवामंधी काय चोर न्हाई म्हनं ?

**धर्मा** : काय न्हाई ?

**पाटील** : चोर.

**गुणा** : चोर म्हंजी ?

**पाटील** : तुम्हांला ठावं न्हाई ?

**गुणा–धर्मा** : न्हाई.

**पाटील** : कशाला जेवतां मंग दोन येळा ? साधं चोर ठावं न्हाई ?

**धर्मा** : कसलं असतंय ते सांगा मंग बगतो.

**पाटील** : गप. तुला रं पोरा ?

**दवंडी** : न्हाई बा, चोर म्हंजी ? कुठं उगवतं ? कसलं असतं ? खरीपाचं असतंय का गळीताचं ?

**पाटील** : जावा निगा. त्या वैऱ्याला जा म्हनावं. म्या परस्न करतोय आन मला उलटी उत्तरं करत्यात. लई आडानी मानसं बुवा. खायाला

कहार आन धरनीला भार. लई आडानी मानसं बुवा. साधं चोर म्हंजी काय ते येकाला कळत न्हाई. हाये कां न्हाई? आंधळ्या, ए आंधळ्या जरा भाईर ये बगूं? [ आंधळा येतो ] का रं आंधळ्या, तुला ठावं हाये कां? चोरं म्हंजी काय ते?

**आंधळा** : चोर? किधर हाये?

**पाटील** : आरं, तुला ठावं हाये का चोर म्हंजी काय हाये ते?

**आंधळा** : चोर अच्छा नहीं होता करके.

**पाटील** : पर असतो कसा ते सांग कीं.

**आंधळा** : वो कुछ मालूम नहीं, लेकीन अच्छा नहीं रहता.

**पाटील** : अरं पर, जे ठावंच न्हाई ते बरं आनि वंगाळ म्हनन्याचा तुला काय अधिकार? निगा समदी हतनं. वैन्याला हाकला अदुगर. जा म्हनावं मागारा.

**गुणा** : पर पाटील ववाळायचं?

**पाटील** : आतां ववाळ मलाच, जावा निगा. अदुगर ह्येचा निकाल लावतो. [ धर्मा, गुणा जातात. ]

**मामा** : कुनाचा? म्या काय केलंया?

**पाटील** : अरं तुजा म्हंजी सरकारी कागदाचा रं. ह्यो आमी इनोद केला कळला का?

**मामा** : कळला.

**पाटील** : आमास्नी न्हाई कळला. दम आनि येक ईदवान मानूस हाये. मास्तर, ए मास्तर, जरा भाईर ये बगूं. [ मास्तर प्रवेश करतो. बरोबर मंजुळा व बहिणाई आहेत. ]

**मास्तर** : आलो.

**पाटील** : दिवानजी, तो कागुद दे बगूं त्येला. ( मास्तरला कागद देतो. ) वाच रं जरा.

**मास्तर** : हां बरोबर.

**मंजुळा** : काय हे?

**मास्तर** : पाटीलकी रद्द होणार.

**मंजुळा** : ( हातांतला कागद घेते ) रद्द होणार म्हंजी ? ( मनांत वाचते )

**पाटील** : आरं त्ये मला कळलं, पर कां ?

**मास्तर** : इनिस्पेक्शनच्या दिवशीं शाळेत दिसले नाहींत तर. ( मंजुळा कागद परत देते. )

**पाटील** : ते सांग ना. इदवान मानूस हायेस तूं. ते मधलं सांग. समद्या गांवाची साळा शिकिवतोस.

**मास्तर** : मग त्यांत काय आहे ? हा शब्दच चुकलेला आहे. आपली शाळा भरते त्या इमारतीचं नांव जेल असंच आहे. येऊं दे इनिस्पेक्टर लागेल तितकी दाखवतो.

**पाटील** : काय ते ?

**मास्तर** : पोरं. हा शब्दच चुकलेला आहे. हा शब्द असायला पाहिजे पोरं.

**पाटील** : बग, म्या म्हनलं न्हाई. आमचा मास्तर इदवान हाये म्हून.

**मामा** : अवो, पोर न्हाई ते चोरच बरोबर हाये.

**पाटील** : कारं मास्तर आतां ? त्ये काय दावायचं त्ये आमी दावतो पर कसं असतंय सांग कीं चोरं !

**मास्तर** : ( बहिणाईस ) चोर म्हंजे ?

**बहिणाई** : मला न्हाई ठावं.

**मास्तर** : चोर ? चोर म्हणजे ? छे, छे, हा शब्दच मला गेलेला नाहीं.

**पाटील** : काय झालं ?

**मास्तर** : हा माझा विषयच झालेला नाहीं.

**पाटील** : आरं मग काय शिकवतोस साळंत ? तुला साधं चोर शिकिवता येत न्हाई. आमी एक आडाणी हावोत. पर तू चांगला शिकलेला हाये का न्हायी.

**मास्तर** : पण हा माझा अभ्यासच झालेला नाहीं. गेल्या तीन पिढ्यांना आम्हीं हा विषय शिकविलेला नाहीं.

**मंजुळा** : आबा, तुमीं ह्येलाच कां इचारत न्हायी ? कागुद घेऊन त्यो आलाय. धरा त्येलाच.

( पाटील मोठ्यानं हंसतो. मंजुळाच्या पाठीवर थाप मारण्यासाठीं उचलेला त्यांचा हात मंजुळानं चुकवल्यामुळं जमिनीवर आपटतो. )

**मंजुळा** : आबा, ह्यो आमी इनोद केला.

**पाटील** : ह्यो बघा. अक्काला आमच्या येळेवर सुचतं. का वं चोर म्हंजी.

**मामा** : चोर म्हंजी चोर.

**पाटील** : म्हंजी काय ?

**मामा** : म्हंजी तो चोरी करतो.

**मंजुळा** : म्हंजी काय करतो ? शेती करतो शेतकरी. वैर करतो वैरी. दूध काढतो गवळी. साळा शिकिवतो मास्तर. तसा त्यो काय करतो ? त्यो चोर ?

**मामा** : म्हंजी म्हंजी त्यो पैका नेतो.

**पाटील** : हात्तेच्या ! ( मोठ्यानं हंसतो. मागून गुणा व धर्मा हंसत येतात. सर्वजण हंसतात.) इक्तं सोपं ? आरं मंग घीवून जा की. कितीसं होवत ? दिवानजी. दिऊन टाका ह्येला काय मागतो ती रक्कम.

**मामा** : कुनाला ? मला काय करायची रक्कम ?

**पाटील** : का ? तूं आता म्हनला न्हाई का ? चोर पैका नेतो म्हून ?

**मामा** : म्या का चोर हाये कां ?

**पाटील** : मंग हो कीं त्येला काय होतंय ?

**मामा** : छे, छे, सरकारी मानूस मी.

**पाटील** : मंग त्येला काय झालं ? आमाला चालंल की सरकारी. का वो मंडळी, चालंल का न्हाई ?

**धर्मा** : चालंल की.

**गुणा** : न चालाया का झालं ?

**पाटील** : काय त्ये ?

**गुणा-धर्मा** : आत्तां तुम्हीं काय म्हनला त्ये.

**पाटील** : म्या म्हनलं सरकारी चालंल का न्हाई ?

**धर्मा** : वा सरकारी म्हंजी लई चांगला की. आं ?

**गुणा** : म्हंजी शिक्कामोर्तब झालेला.

**पाटील** : म्हंजी सरकारी चालंल. मंग हो जा की चोर.

**मामा** : अहो, तसा नाहीं होत चोर पाटील. चोर पैकं नेतो पर कुनाच्या नकळत.

**पाटील** : मंग तू नकळत ने. आमी डोळं झाकून घेतो. मंडळी डोळं झाकून घ्या. मारुतीच्या मागल्या अंगाला तिजोरी हाये. दिवाणजी, त्येस्नी तिजोरी दावा. आन थतं गेल्यावं तुमीपर डोळं झांकून घ्या जावा.

**मामा** : अवं, डोळं उगडा आधी. छ्या, छ्या, भलत्या भानगडीत मला नगा अडकवूं. हे बगा, हा लखोटा, हे तुम्हीं. ही तुमची पाटीलकी. त्यो चोर, तुमचं तुमी बगून घ्या म्या चाललो.

**पाटील** : ए चालला कुठं ? आतां गुमान चोर होतो का गोळी घालूं.

**मामा** : आतां इच्या ? अवं, गोळी काय घालूं ? छ्या बाबा कुठल्या भुताटकीच्या गांवांत इऊन घावलोया मी कळंना झालंया. अवो माच्यावानी सभ्य मानूस चोर असूं शकत न्हाई पाटील, ती जात येगळी असतीया.

**पाटील** : येगळी म्हंजी ?

**मामा** : येगळी म्हंजी ? येगळी म्हंजी ? मला कांहीं कळत नाहीं. कांहीं सुचना झालंया. माझं डोस्कं चालंना झालंया.

**मंजुळा** : काही सुचंना ? मारुतीच्या पायावं डोक्सं टीवं. तुला सुचंल.

**पाटील** : आणि आमास्नी कळंल.

**मामा** : मारुतीच्या पायावं ? डोस्कं ? म्हंजी झाली कां दोन बकलं ? पर म्या नारोळ आनल्याला न्हाई.

**पाटील** : आरं डोस्कं ठिवं म्हटलं तर नारोळ कशाला ?

**मामा** : आवं पर म्या टाकोटाक खालनं वर चालत आल्याला हाये आन नारोळ न्हाई. आन मला कळल्यालं हाये——

**पाटील** : काय ?

**मामा** : काही न्हाई. आमच्याकडं नियम हाये अदुगर नारोळ ठिवल्याशिवार मारुतीच्या पायावं डोस्कं ठिवत न्हाई. पाप लागतं. सुटलो. तुमचं तुमी सांभाळा, म्या चाललो परत.

**पाटील** : जाऊं नगा. एकडाव चोर व्हा. म्या तुज्या पाया लागतो.

**मामा** : काय गोळी काय घालतो ? पाया काय लागतो ? मला जमनार न्हाई, तुम्ही दुसरी येवस्था बगा.

**पाटील** : आरं बाबा, आमी लई आडचनीत घावल्यालं हावो म्हून इनंती करन्याची येळ आलीया. सांग बाबा, कांहीं विलाज तरी सांग.

**मंजुळा** : तुमच्या गांवांत हायती का ?

**मामा** : मायंदाळ.

**दिवाणजी** : मग द्या की पाठवून आमच्याकडं एक.

**मामा** : काय ते चोर ?

**पाटील** : व्हयं.

**मामा** : अवो. व्हयं काय ? त्ये काय जाहिरातीनं मिळणारं हायती काय ?

**पाटील** : जाहिरात काय असतंय.

**मामा** : अवो पेपरांत जाहिरात दिल्यावं होवी ती वस्तु मिळतीया.

**पाटील** : पेपर ? काय येकेक नव्या नव्या भानगडी सांगतुया ? पेपर काय असतंया ?

**मामा** : अवो. बातम्या येत्यात तेच्यात कुठं काय भानगड झाली तर.

**पाटील** : म्हंजी जेची झाली त्येला कळत न्हाई व्हयं ?

**मामा** : तसं न्हाई. येका ठिकाणी झाल्याली भानगड समद्या गावला कळावी म्हून जे जन्माला येतं त्येला म्हनत्यात पेपर.

**पाटील** : असं असतंया व्हयं ? मग त्येच्यात त्ये काय देत्यात म्हनला ते ?

**मामा** : जाहिरात.

**पाटील** : मग द्यावा की आमचं एक.

**मामा** : काय ते ? आडगांवांत चोर पाहिजे ?

**पाटील** : हां मंग येत्याल का न्हाई ?

**मामा** : मला काय ठावं न्हाई.

**पाटील** : आरं तूं म्हनला ना मगाशी स्वोत्ता होवी ती वस्तु मिळती म्हून ? इत्ता सबूद बदलावा मानसानं ? बंदूक बगितली कां ? येत्याल कां न्हाई सांग बगू गुमान.

**मामा** : येत्याल बाबा, येत्याल. या गावांत मानसं न्हाईतच. निसत्या बंदुका आन कुऱ्हाडी.

**पाटील** : येत्याल नां ? मंग दिऊन टाका जावा आमचं एक आनि एक धाडून द्या जावा.

**मामा** : समदं करतो पर मला हतनं भाईर जायाचा रस्ता दावा.

**पाटील** : अवं दसरा हाये. सोनं तर घिऊन जावा. ( गळ्यांतली चेन आणि हातांतलं कडं काढतो. )

**मामा** : मला नगं. आमच्याकडं असलं घ्येत न्हाईत. तुमी मला चोर म्हून धराल रस्ता दावा.

**पाटील** : दिवानजी, दावा त्येला रस्ता. ( दिवाणजी त्याला सज्जनगडचा रस्ता दाखवायला लागतो. ) आरं त्येला सज्जनगडचा रस्ता कशाला दावतोस. ह्ये टांगळं उतरनार हाये व्हयं खाली ? आरं शिरपतीशिवाय त्यो कडा कोन चढल्यालं हाये का ? ह्येला सरळ रस्ता दाव.

**मामा** : खालला. ( दिवाणजी त्याला पाठीमागचा रस्ता दाखवतो. तिकडून दवंडीवाला येत असतांना त्याचा धक्का लागून मामा खाली पडतो. )

**दवंडी** : पाटील, वैरी चिडलाया, सूड घीन म्हनतो गावाचा.

**पाटील** : आरं जारं सूड घेनार. पान्याच्या अल्याडला अंगाला फुंकर मारली तर पल्याडल्या अंगाला उडून जाशील. म्हनं सूड घेतोय. हितं अदुगर गांवांत चोर धावना झालाया आन लगीन कराया निगालाय—

**दवंडी** : पर आक्का, शिरपतीनं लई मारला त्येला.

**पाटील** : शिरपतीनं ? शिरपतीनं ? पर सोडविला कुनी त्येला ? आमी बांधावं बांधून घातला व्हता न्हवं त्येला ? मंग कुनी सोडविला ? कां गं भने ?

**वहिणाई** : माझा पोरगा हाये. सुटंल स्वोत्ताच्या बळावं. बाईच्या मनगटाची मदत घ्याया वैऱ्याचं बेनं न्हवं त्ये. जलम दिला तवाधरनं दूधातनं बळच पाजीत आलीया त्येला.

**मास्तर** : मी तर आत्ताच ऐकलें.

**पाटील** : तूं रं आंधळ्या ?

**आंधळा** : मेरेकू मालूमच नहीं तूने बांध्या है करके नहीं तो पहिलेच छोड्या होता.

**दवंडी** : म्या तर निसती बातमी घेऊन आल्येला हाये.

**धर्मा–गुणा** : आपुन कधी कायद्याच्या भाईर वागलोय का ?

**पाटील** : मंग कुनी सोडीवला त्येला ? कायद्याच्या भाईर वागतोय. पोटच्चं प्वार असलं तरी मागं पुढं बगनार न्हाई. आमचा कायदा मोडनाऱ्याला पहिली गोळी घालंन. कुनी सोडिवला शिरपतीला.

**मंजुळा** : म्या.

**पाटील** : ( गर्रदिशी बंदूक घेऊन तिच्या अंगावर वळतो ) आक्कासाब तुमी ? कायद्याच्या भाईर वागनाऱ्या शिरपतीला कां पाठीशीं घातला तुमी ?

**मंजुळा** : त्यो कायद्याच्या भाईर वागल्याला न्हवंता म्हून. वैऱ्याच्या गांवातली आग त्येनं लावल्येली न्हवती.

**गुणा–धर्मा** : मंग ?

**मंजुळा** : ती आग म्या लावल्याली व्हती.

**पाटील** : आक्कासाब, तुमी ? कायद्याच्या भाईर तुम्हीच वागला.

**मंजुळा** : व्हय. वैऱ्याच्या हातून गांव बळी जान्यापरीस गांवासाठनं स्वोत्ता बळी गेल्यालं लई ब्येस. घाला मला गोळी.

**दिवाणजी** : अहो, घाला गोळी काय ? पाटील अहो, ते निघाले.

**पाटील** : कोन ?

**दिवाणजी** : अहो, ती जाहिरात. ती गरजेची वस्तु, ते चोर.

**पाटील** : ( दिवाणजीच्या हातांत बंदूक देऊन—) आं. व्हय, आक्कासाब, बंदूक संभाळा. अवो त्ये आठवनीनं धाडून द्या जावा. आमी लई आडचनीत घावल्यालं हाये. त्ये चोर जर आलं न्हाई गांवांत तर आमची पाटीलकी टिकनार न्हाई. आठवनीनं धाडून द्या जावा. लई गरजेची वस्तु हाये. आठवनीनं धाडून द्या जावा.

[ असं म्हणत असतांनाच पडदा पडतो आणि म्हणूनच अंक संपतो ]

म ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
१०८०२ ... ८।१०।८२

# अंक दुसरा

(स्थळ तेंच. एक दवंडीवाला सोडून सगळीजण मारुतीची आरती करीत आहेत. झाल्या प्रसंगानंतर सात दिवसांनीं आपण पुन्हां आडगांवांत आलों आहोंत. ती संपल्यानंतर सगळेजण आपापल्या घरीं निघून जातात. दिवाणजी मारुतीच्या पायाशीं आक्का डाव्या बाजूच्या पायरीवर निराश झाल्यासारखी बसली आहे. आरती संपल्यावर पाटील मारुतीच्या पाया पडून— )

**पाटील** : जय देवा मारुतीराया, त्ये च्चोर काय हाये त्ये एकडाव गांवांत येऊ दे. जन्मोजन्मी तुझी सेवा करीन.

**आंधळा** : वो नहीं आया वोच अच्छा.

**पाटील** : का रं शुभ बोल की नाऱ्या.

**आंधळा** : सुभ क्या बोलनेका ? ये आक्काको देख. आबा मैंने सुना की तूने बोलण्याच छोड्या उसके साथ.

**पाटील** : ए आंधळ्या, पोरगी माझी हाये म्या तिचा बा हाये.

**दिवाणजी** : ( नारळ फोडून ) देवाची करणी—

**पाटील** : काय झालं ?

**दिवाणजी** : नारळांत पाणी नाहीं. नारळ खराब निघाला.

**पाटील** : म्हंजी देवानं परसाद घेतला. म्हंजी च्चोर येनार. मारुती पावनार. माजी पाटीलकी ऱ्हानार.

**आंधळा** : एक लडकी घरमें उसका ये हाल करके रख्या तो कायको देव पावेगा तेरेको. अक्काके साथका गुस्सा छोड दे.

**पाटील** : न्हाई जमनार. कायदा मोडनाऱ्याला पाठीशीं घालत्यात. आमच्या मनाविरुद्ध जानाऱ्याचं त्वांड बगण्याची आमची विच्छा न्हाई. काय करशील ?

**आंधळा** : गांव छोडके चला जाऊँगा.

**पाटील** : मंग जा.

**आंधळा** : आ, आ, आ, मेरी बेटी रोती कायको ?

**मंजुळा** : चाचा, सांगा आबास्नी. म्हनावं इक्ता राग नगा धरू माझ्यावं. मला अन्न ग्वाड लागंना. झालंया त्या दिसाधरनं.

**आंधळा** : हां, उस दिनसे.

**पाटील** : मला काय वाटत न्हाय त्याचं.

**दिवाणजी** : मग बाजूला तोंड घेऊन डोळे कां पुसावे ? तो खलिता आल्यापासून एक क्षण सुखाचा नाही. मी पण चाललोय गांव सोडून.

**आंधळा** : मेरे साथ. और आक्काको भी ले जायेंगे साथ साथ, चल बेटी, नहीं तेरा बाप मानता तेरेको. तू भी चल.

**मंजुळा** : आबास्नी सोडून ? न्हाई वो. लई खंगल्यावानी झाल्याती त्ये. त्ये चोर आल्यालं न्हाई. लई अडचणींत घावलाया न्हवं तुमी.

**आंधळा** : देख, देख, उसका कलेजा. इतना जादा गुस्सा अच्छा नहीं आबा.

**पाटील** : मला काय ऐकायचं न्हाई.

**आंधळा** : ठीक है. चल रे दिवाणजी. अभी लेके आयेंगे शिरपतीको. और कर देंगे उसकी शादी इसके साथ. मारुतीको साक्षी रखकेच करेंगे.

**पाटील** : बंदूक बगितली का ?

**दिवाणजी** : तीच दाखवत बसा जन्मभर.

**पाटील** : ए लेखनीच्या, भाईर हो, आधी परसाद वाट लोकास्नी.

**आंधळा** : तू बंदूकका डर किसको दिखाता है रे आबा, मरनेका डर वैरीको. मरनेको जो डरता है उसका जीनाच मौत है. बंदूकका डर दिखाता है. चल ले हातमें बंदूक. और चला गोली सबके ऊपर. आक्काको मरा, दिवाणजीको मार, शिरपतीको मार. मेरेको मार. और कर पाटीलकी पत्थरेंको ऊपर. और बोल मेरेको सत्ताका लोभ नहीं करके. चल, ले उठा बंदूक. किसका मूँह देखता रे ? मेरा की मारुतीका ?

**पाटील** : ( वैतागानें ) आरं, का माझा जीव घ्याया निगालाया समदं ? अदुगर म्या हैरान झालोया माज्या चिंतेनं. त्यो चोर एकडाव गांवांत येऊ दे माझी पाटीलकी न्हाऊं दे. मग बगू की लग्नाचं.

**आंधळा** : ए लडकीने क्या गुन्हा किया है तेरा ये सांग की पहिले.

**पाटील** : आरं, बाचा पोरीवरला राग काय खरा असतोय व्हयं. आमचं बी काळीज तुटत नसंल व्हयं ?

**दिवाणजी** : हत्याराशिवाय तुटणारी तेवढी एकच गोष्ट आहे जगांत.

**पाटील** : तू भाईर हो.

**दिवाणजी** : प्रसाद घ्या. बाकीच्यांना वाटून येतो. [ जातो ]

**पाटील** : आक्कासाब, अवं किती राग आला तरी त्यो वरवरला. अवं, घरांत आलं आन आक्का नदरंम्होरं दिसली न्हाई तर कुकू नसल्याल्या करंड्यागत घर उजाड वाटतंया. आक्का, वाळली माजी पोरगी. आवं आक्कासाब, अवं इत्तं जिवाला लावून घिऊं न्हाई.

**मंजुळा** : कुनी घेतलं व्हतं ?

**पाटील** : काय झालं ?

**मंजुळा** : कुनी घेतलं व्हतं ?

**पाटील** : म्हंजी ? आमी तुमासंगं बोललो न्हाई, तुमास्नी दुख झालं न्हाई ?

**मंजुळा** : न्हाई बा.

**आंधळा** : फिर खाना कायको छोड्या था ?

**मंजुळा** : आं, त्ये ? वैऱ्याच्या पुढाऱ्यासंगट माजं लगीन व्हनार न्हाई म्हून दुख झालं व्हतं मला.

**आंधळा** : झूटा बोलती है.

**पाटील** : म्हंजी ? तुम्हांला अन्न ग्वाड लागत न्हवतं त्ये आमी तुमचा राग धरला म्हून न्हाई ?

**मंजुळा** : न्हाई बा. तुमचा राग ठावं हाये आमास्नी.

**पाटील** : आं ?

**मंजुळा** : फनसावरलं काटं.

**पाटील** : काय ?

**मंजुळा** : किती रागानं तरारलं तरी फनसावरल्या काट्यानं आतली गोडी न्हाई कमती हुईत. चाचा, किती तापला सूर्ये मध्यान्हीला तरी

सांजचा आपसूक थंड होतोय. आन बरंका चाचा, या मावळतीला सूर्य जवा का बुडतो का न्हाई पान्यांत तवा उगवतीला भाईर पडतोय चंदर म्हून थंडगार.

**आंधळा** : सूर्य ? आन थंडगार ?

**मंजुळा** : सांजचा. आन चाचा, समद्या जगाला अन्न खाया घालनारा ह्यो सूर्याचा तवा हाये का न्हाई दिसाभराचा सैपाक झाल्याचं जगाची म्हातारी त्या तव्याला समुंदरांत बुडिवती. आन चर्रर्र असा आवाज येतो का न्हाई ?

**पाटील** : येतो.

**मंजुळा** : म्या तुमास्नी सांगत. येतो का न्हाई चाचा ?

**आंधळा** : आता है.

**मंजुळा** : मानसं म्हनल्यांत रातकीडं किरकिरलं. त्ये रातकिडं न्हवं.

**आंधळा** : फिर ?

**मंजुळा** : त्यो तवा. सूर्याचा. पान्यांत बुडिवल्येला. आन समदा सैपाक झाल्यावं आपली म्हातारी निखारं काढून टाकती का न्हाई भाईर, तशी आबाळातली म्हातारीबी टाकतीय. त्या चांदन्या, आबाळातल्या त्याबी आसल्यात थंडगार. तसं हाये ह्ये आबाच्या रागाचं. दुपारच्याला तापल्यालं, सांजच्याला थंडगार.

**पाटील** : आंधळ्या, कशी ज्ञानी हाये पोरगी.

**आंधळा** : मेरेकू मत पूछ.

**पाटील** : हे तुमचं कवानं झालं पर जेवान ग्वाड लागत न्हवतं म्हनाला त्ये का त्ये सांगा की.

**मंजुळा** : त्ये ? त्ये आमाला न्हाई ठावं. (ती आंत पळते. नारायण गातो. आंधळा हसतो.)

**पाटील** : आत्तां ? काय आक्रीतच हाये या पोरीचं. म्या म्हनलं का आमच्या तिच्यावरल्या रागानं तिला दुख झालं.

**आंधळा** : वो शिरपती के लिये. तेरे लिये नहींच. रोज मरता है उसके लिये कोई नहीं रोता !

**पाटील** : ए आंधळ्या, तू माज्या वाटंला जाऊं नगं.

**आंधळा** : तेरे वाटेको तेरी लडकी नहीं आती मैं कायको जाऊं ?

**पाटील** : मंग आता आंधळा पिरेम करत न्हाई आमच्यावं ?

**आंधळा** : करतो, लेकीन माया. पिरेम अलग रहता है. जबतक उमरमें नहीं आती लडकी, तो पिताका हात पकडके रहती है और जब जवान होती है की नहीं तो पिताका पैर पकडके रखती है, पतीका हात पकडनेके लियेच. पिता और पतिमें खाली येक काना और वेलांटीका फरक रहेता है। उमरकी ऐक वेलांटी आगे जाती है की नहीं तो पिताका काना पिछू रहता है. और वेलांटी आगे भागती है पतिके ऊपर. खाली एक काना और वेलांटीका फर्क. तूं मेरा सून. अभी ये बुढापा छोड दे. वो आक्का, शिरपती उनके ऊपर छोड दे अपना बुढापा. ये सत्ताका लोभ छोड.

**पाटील** : हाये कुनाला सत्तेचा लोभ. काय तोंडाला यील ते बोलतंय ? म्हनं सत्तंचा लोभ. [ घरांत जातो. ]

**आंधळा** : जरा जवान होना शुरू कर ! आएस्ता आएस्ता। ( बहिणाईचे शब्द ऐकूं येतात. )

**बहिणाई : हो वय जानारे जानारे। तारुण्यामागून वार्धक्याला घेऊन येणारे येणारे।**

**आंधळा** : हरी हरी। वो सून। अपनेमेंसे और एक जवानी आ गयी, [ काठी टेकीत टेकीत बहिणाई येते. ] आ, आ, आ, इधर आ बहिणे, आ, आ, शरमाती है क्या ?

**बहिणाई** : का रं आंधळ्या ? कां मस्करी लावलीया कुणाची ?

**आंधळा** : मैं आबा को बोलता है. जरा जवान होना शुरू कर. थोडी शांतीसे ले।

**बहिणाई** : आरं पर त्या आबाला आधी त्येच्या स्वोत्ताच्या घोरांतनं सुट्टं देशील का न्हाई ? त्ये चोर गावांत येईना झालंय. त्येची चिंता कोनच करंना झालंय. आन तूं कां आनिक डोस्कं उठवितोयस त्येचं ?

**आंधळा** : वो नहीं आयेगा योच अच्छा. गावका सत्यानाश करेगा.

**दिवाणजी** : ( प्रवेशून ) अहो बहिणाई. तुमच्या श्रीपतीचं आणि वैऱ्याचं

कांही वाजले आहे म्हणे. ते आठ-दहा जण आहेत. काल अक्कासाहेबांनीं घर पेटविले ना त्यांचे ? आणि चिडून आलेत श्रीपतीवर.

**बहिणाई** : ही पोरं, पोरं न्हवती. ताप आहे आईबाच्या डोस्क्याला. आर्धा पाटील झालाया चोरापायी हैरान.

[ बाहेरून मास्तर येतो, हातांत दोन बाडं घेऊन— ]

**मास्तर** : सापडला हो, पाटील.

**बहिणाई** : कोन रं मास्तर ?

**मास्तर** : चोर. पाटील कुठं आहेत ?

**आंधळा** : ये आया पागल. चोर मिल्या ? किधरकू मिल्या रे ?

**मास्तर** : पुराणांत मिळाला.

**आंधळा** : पागला है. पुराणमें चोर मिल्या इसको.

**मास्तर** : पाटील, अहो पाटील—[ गुणा, धर्मा येतात. ]

**गुणा-धर्मा** : पाटील, अहो, पाटील.

**मास्तर** : अहो पाटील, पाटील.

**पाटील** : आरं आलो आलो, आरं कोन हरव्या मारतोय ? का रं मास्तर कां गागतोयास ?

**बहिणाई** : चोर मिळाला म्हनं त्येला.

**मास्तर** : चोर म्हणजे– अर्थ सापडला चोराचा. पुराणांतनं शोधून काढला.

**पाटील** : आरं बस, बस. अवं आक्कासाब, भाईर या. त्ये घावलं म्हनं चोर ह्या मास्तरला.

**गुणा** : पाटील आमची गाडी ?

**धर्मा** : पाटील, आमची बैलं ?

**पाटील** : आरं जलमभर बैल-गाडीच करत बसा. अरं देवाधर्माचं बगा. मास्तरा, बस, बस. म्हारुतीच्या पायाशीं बस. आन सांग बगूं पुरान.

**गुणा** : अवं पर आमची गाडी ?

**धर्मा** : अवं पर आमची बैलं ?

**पाटील** : आरं गप. जावा टाळ घ्या, बसा. म्या म्हनलं इकतां माझा मास्तर इदवान त्येला चोर घावत न्हाई म्हंजी काय ? बोला ग्यानोबा ऽऽ.

**मास्तर** : मी कसला ज्ञानदेव ? रेडा सुद्धां नव्हे त्याचा.

**पाटील** : बोला ग्यानेश्वरमहाराजकी जय ! [ सगळे साथ देतात. ]

**दिवाणजी** : तें चोराचें काय तें सांगा, रेड्याचें नको.

**सर्वजण** : पांडुरंग हरी ! वासुदेव हरी !

**मास्तर** : चोर म्हणजे पवित्र.

**गुणा** : ( शिंकतो ) केस नाकांत गेला.

**मास्तर** : चोर म्हणजे पवित्र वस्तू. ( धर्मा शिंकतो. )

**पाटील** : सत्य हाये.

**मास्तर** : देवाच्या बरोबरीचा. पुराणांतले दाखले आहेत.

**मंजुळा** : कसलं दाखलं ?

**मास्तर** : पुराणांतले. पहिला चोर गोकुळांत होता. गोपालकृष्ण-महाराजकी—

**सर्वजण** : जय !

[ ' गोपालकृष्ण, राधाकृष्ण ', भजन सुरू होते. मास्तरला हार घालतात, सर्वांना बुक्का लावतात. ]

**मास्तर** : दुसरा चोर देवांचा देव. भगवान विष्णू.

**पाटील** : ते कसं ?

**मास्तर** : आणि ते सगळ्यांत मोठा चोर म्हणजे या जीवसृष्टीचा जन्मदाता. साक्षात परमेश्वर.

**पाटील** : काय म्हनतोयस काय तूं मास्तर ?

**मास्तर** : खरं तेंच म्हणतों. वारा हलतो. पाऊस पडतो. ऊन तापतं. कसं ?

**पाटील** : कसं म्हंजी ?

**मास्तर** : कसं ते कळतं का ?

**पाटील** : न्हाई.

**सर्वजण** : न्हाई. ( टाळ वाजवतात. )

**मास्तर** : पण वारा पाऊस, ऊन, म्हणजे काय ते कळतं.

**पाटील** : व्हय.

**सर्वजण** : व्हय.

**मास्तर** : पण कसं तें कळतं का ?

**मंजुळा** : कसं म्हंजी ? नारायणाची किरपा.

**मास्तर** : तो दिसतो का ?

**सर्वजण** : ना ऽ ही.

**मास्तर** : म्हणून म्हणतो बाबाहो, म्हणा, 'श्री नारायण जय नारायण।'

( हें भजन चालू असतांनाच दवंडीवाला मागून येतो आणि तिच्या कानांत सांगतो. मंजुळा बंदूक घेऊन जाते आणि दवंडीवाला तिच्याजागीं बसतो. )

**मास्तर** : तसंच चोराचं आहे. देवाचं जसं तसंच चोराचं आहे.

**पाटील** ; म्हंजी ?

**मास्तर** : काय करतो तें कळतं. कसं करतो ते समजत नाहीं. आणि ज्यानं केलं तो दिसत नाहीं. हा चोर. तो देव. हा चोर, तो देव. हा देव. तो चोर.

**पाटील** : हाय, हाय. मास्तर, आमचा समदा इस्वास तुमच्यावर.

**मास्तर** : नको. म्हणून म्हणतो बाबाहो, या जगात विश्वास ठेवण्याला जर कोणी पात्र असेल तो एक परमेश्वर आणि दुसरा चोर. आपण सगळी साधी माणसं. साव.

**सर्वजण** : साव.

**मास्तर** : म्हणून आपण काय करावं ? तर सर्वांनी चोराचा फक्त महिमा वर्णन करावा. भक्तिभावानं त्याचं भजन करावं आणि एकसुरानं त्याला आळवावं. म्हणून म्हणतो बाबाहो, म्हणा—

**विश्वास असावा चोरांचा । हा गांवच अवघा सावांचा ।**
**एक चोर तो यमुनातिरीं । दह्यादुधाची करतो चोरी ।**
**का भजतां मग तो कंसारि । चित्तचोर जो मथुरेचा ।।**

**सर्वजण** : **विश्वास असावा चोरांचा ।**

**मास्तर :**

**सुरासुरांचे समुद्रमंथन । नीलकंठ हालाहाल सेवन ।**
**परि असुरांचे अमृत प्राशन । कधी न व्हावे ऐसे योजून ॥**
**रूप मोहिनी घेऊन माधव । पळवी अमृत अमृतलाघव ।**
**चोर लाघवी तो परमात्मा । देवच अवघ्या देवांचा ॥**

**सर्वजण : विश्वास असावा चोरांचा ।**

**मास्तर :**

**ह्या देहाचे मोल न ठावे । जमाखर्च तो विठ्ठल नांवे ।**
**देह आमुचा नव्हे अखेरीस । देह न तुमचा अहो अखेरीस ॥**

**मास्तर :** मग कुणाचा ।

**सर्वजण :** कुणाचा ?

**मास्तर : कुण्या अनोळखी चोराचा । विश्वास असावा चोरांचा ॥**

( खूप रंगांत येऊन भजन संपतं. सगळेजण डोके टेकतात. )

**पाटील :** जिक्ता मोठा हाये म्हनता त्यो चोर ?

**मास्तर :** देवाच्या बरोबरीचा प्रत्यक्ष परमेश्वर.

( टिण् ऽ ऽ –उगीचच एक झांज वाजते. )

**पाटील :** आन इक्त्या पुन्याईचा ह्यो. त्यो गांवांत आला न्हाई तर पाटीलकी न्हानार न्हाई ? कवा कवा सरकार तर काय आडचनींत टाकंतया बगा. आतां त्यो देवाच्या योग्यतेचा चोर आमा सावांच्या विच्छेनं कसा यावा गांवांत ?

**धर्मा :** पाटील,अवो ती बैलगाडी धाडल्याली व्हती न्हवं आपुन ? ती न्हाई.

**पाटील :** न्हाई म्हंजी.

**धर्मा :** व्हती, पर न्हाई, म्हंजी गुनाच्या खळ्याकडनं निगाली पर–

**गुणा :** धर्माच्या खळ्याकडं आलेली न्हाई.

**पाटील :** गाडी न्हाई म्हंजी ?

**धर्मा :** म्हंजी काय सांगावं ?

**पाटील :** आनि बैलं ?

**गुणा** : बैलं बी न्हाईत.

**धर्मा** : चाकासकट गाडी घेऊन, बैलं न्हाईत.

**गुणा** : धान्यासकाट. म्हंजी व्हती पर न्हाई.

**पाटील** : आरं पर म्हंजी काय ?

**मास्तर** : मी सांगतों, गाडी होती.

**धर्मा** : व्हती.

**मास्तर** : आतां नाहीं.

**गुणा** : नाहीं.

**मास्तर** : म्हंजी झालं.

**पाटील** : काय झालं ?

**मास्तर** : चोर.

**पाटील** : म्हंजी.

**मास्तर** : गाडी होती. आतां नाहीं. म्हणजे काय झालं तें कळलं. कसं झालं तें कळलं नाहीं. ज्यानं केलं तो दिसला नाहीं. म्हणजे चोर.

**गुणा** : आलं.

**धर्मा** : गांवांत.

**दिवाणजी** : पाटील, मुगुट.

**पाटील** : काय झालं ?

**दिवाणजी** : मारुतीच्या डोक्यावं मुगुट नाहीं.

**पाटील** : म्हंजी व्हता पर न्हाई. म्हंजी ते आलं. दिवाणजी साखर आन, आरं चोर आल्यालं हायेत, साखर वाट गावाला. [ दिवाणजी जातो ] म्हंजी परत्येक्ष मारुतीच्या डोक्यावरला मुगुट. [ दवंडीवाला जातो ]

**मास्तर** : बघा, म्हणजे त्याला सुद्धां कळलं नाहीं.

**पाटील** : मंग आमास्नी कसं कळावं ? म्हंजी आतां ह्यो अवतार रामाचा म्हनावा का हनमंताचा ? परत्येक्ष म्हारुतीला कळलं न्हाई ?

**मास्तर** : रामाचाच म्हणावा ! बोला—श्री दशरथनंदन रघुकुलतिलक श्रीसीता-रामचंद्रमहाराजकी जय !

**गुणा** : पाटील, शिरपतीचंबी तसंच झालंय्. त्येनं लई झगडा केला त्या वैन्यासंगं.

**पाटील** : ए मने, तुज्या पोराला सांग म्हनावं मला लई ताप दिऊ नगं. माझं मला झालंया थोडं आनि येवढ्याचं घोडं माझ्या दारीं नगं.

**गुणा** : पर शिरपतीला धरून नेला वैऱ्यानं.

**पाटील** : येड्यावानी न्हाई ते बोलूं नगं. धरून नेला म्हनं. आमचा दुस्मान असला तर शिरपती तरी मनगटाचा पोरगा हाये. असा फुकाफुकी वैऱ्याच्या हातात जानाऱ्यांतला न्हाई. आमचा त्येचा झगडा हाये त्यो कायद्याचा. इचाराचा. मनगटाचा न्हाई. बळानं वाकनार न्हाई म्हून तर आमी त्येला कायद्यांत धराया बगतोय. हातांत बंदूक असल्यावं मला त्यो भारी त्यो वैऱ्याला घावनार हाये व्हयं ?

**गुणा** : बंदूक असल्यावं.

**पाटील** : म्हंजी ?

**गुणा** : अवं त्येची बंदूक घावनां. कुठं टाकली त्येनं त्येच कळंना.

**पाटील** : कांहीं तरी बोलूं नगं. पोटच्या पोरापरीस पिरेम असतंया मानसाचं हत्यारावं. बंदूक टाकली म्हनं. अशी हत्यारं भर रानांत टाकून जाया त्ये कांहीं वैऱ्याचं बेनं न्हाई.

**आंधळा** : अरे, पर उसको कोई छुडाको लायेगा क्या कोई क्या यहां झगडा करके बैठेगा. एक तो भजन करके बैठते नहीं तो झगडा करके बैठते। मैं बोलता वैरीको शांतीसे रहनेको. चल बहिने, छुडाके लायेंगे शिरपतीको.

**बहिणाई** : आरं जा तूच. भीक मागूं व्हयं पोराला सोडा म्हून ? असंल जिद्दीचा तर सुटंल की स्वोत्ताच्या बळावं. [ बहिणाई आपल्या घराकडं जाते.]

**आंधळा** : तूं इनकी माँ. जयदेवा, मारुतिराया, बचा गांवको तूच इन पगलोंसे.और मेरेको शक्ती दे. मैं लाता छुडाके श्रीपतीको. [ जातो. ]

[ दिवाणजी येतो. साखर वांटत पाटलाच्या घरांत जातो ]

**पाटील** : आरं, पर त्याच्या बंदुकीचं काय झालं ? [ दवंडीवाला येतो ]

**दवंडी** : पाटील आमच्या पायतानाचं काय झालं ?

**पाटील** : काय झालं ?

**दवंडी** : न्हाई, माझं पायतान बगितलं व्हतं का ?

**पाटील** : काय झालं ?

**दवंडी** : पायतान माझं.

**पाटील** : कारं डोक्सं फिरलंया का तुझं ?

**दवंडी** : तसं न्हवं पाटील, म्हारुतीच्या दर्सनाला आलो. पायतानं भाईर ठिवली. दर्सन झालं. भाईर गेलो. पायतान न्हाई. लई धुंडलं घावंना. म्हून तुम्हास्नी इच्चारलं.

**पाटील** : माझं बगितलं का ? आं ? कुनाला काय इच्चारावं का कळतं का न्हाई ? म्या पाटील हाये गांवाचा का राखणदार हाय पायतानाचा ?

**दवंडी** : तुमी पाटील हाये. गांवाची मालमत्ता राखणार तुमी हाये. आमचं पायतानं गेलं, आमी दाद मागावी कुनाला ?

**पाटील** : व्हयं. मलाच. काय झालं रं मास्तर याच्या पायतानाचं ?

**मास्तर** : काय ? म्हणजे बरोबर झालं. होती आणि नाहींत.

**पाटील** : पर मधीं काय ?

**मास्तर** : मध्ये चोर.

**पाटील** : म्हंजी ? इदवान डोक्शाचा मानूस तू. मधीं काय ते सांग ना.

**मास्तर** : मध्ये काय ? मध्ये काय हें मला कळलं असतं तर स्वतःच चोर नसतों का झालों ? पूर्णस्वरूप. सच्चिदानंद परमेश्वर. मध्ये काय ? म्हणजे मलाच डोकं नाहीं.

**पाटील** : म्हंजी व्हतं. पर न्हाई. मंग त्ये अदुगर शोध.

**मास्तर** : शोधतों. ( गुणाकडे बघतो )

**गुणा** : ह्ये माझं हाये.

**धर्मा** : समद्यांची फिरवली आन स्वोत्ताचं सोदतोय.

**पाटील** : काय येड्या, व्हतं पर न्हाई. व्हतं पर न्हाई. पार डोक्सं कामातनं जायाची येळ आलीया ?

**गुणा** : तुमचं बी ? [ आंतून दिवाणजी येतो. ]

**दिवाणजी** : पाटील, अक्कासाहेब घरांत नाहींत.

**पाटील** : म्हंजी ?

**दिवाणजी** : मी आतां बाहेरून आलो साखर वाटून चोराच्या नांवानें, बाहेर दिसल्या नाहींत. म्हणून घरांत बघितल्या. घरांत दिसेनात. म्हणून तुम्हांला सांगितलं.

**पाटील** : म्हंजी ? आक्का ? ( ताडदिशी उठतो आणि बंदूक बघतो. ) आरं माझी बंदूक ? काय चाललंया काय समदं ? जावा, जावा, समदं. आन त्या आक्काला आना अदुगर सोदून. [ दिवाणजी सोडून सगळे जातात. ] हे न्हाई. त्ये न्हाई. धर्माची गाडी न्हाई. म्हारुतीचा मुगुट न्हाई.

**गुणा** : ( जाता जाता ) मास्तरचं डोक्सं न्हाई.

**पाटील** : आक्का न्हाई. माझी बंदूक गेली. न्हाइलं काय गांवात ?

**दिवाणजी** : पाटीलकी.

**पाटील** : ये, का न्हाइलाया हतं ? जवा तवा डंख माराया बघतोय ? ये लेखन्या, जा पहिलं. आक्काला सोद. ( दिवाणजी गेल्यावर पाटील कळवळून मारुतीकडे वळून ) जयदेवा, बलभीमा, मारुतीराया, परमेश्वरा, चोरा, काय गांवाचं व्हनार काय कळत न्हाई. डोक्शांतनं भवरा फिराया लागलाय. तारनार मारनार तूच हायेस. आमी आडानी मानसं. डोक्सं नांवाला हाये अक्कलेला न्हाई. त्या पुन्यवान चोराचं पाऊल गांवात पडल्यालं हाये पर अद्याप डोळा दर्सन न्हाई. कसंबी वागत असंल त्यो, पर तूं स्वोत्ताच्या अनुभवानं बग. आन सांग त्येला म्हनावं येकडाव दर्सन दे सगुन स्वरूपात. आन आसं न घडल्यालं काय चाललंया गांवांत ह्ये येकडाव माज्या कानावं घाल, इक्तं ह्या आडान्याचं म्हननं ऐक, आनि ह्ये कोडं येकडाव उलगडून दे. जल्मोजल्मी तुजी शेवा करीन. ( असे म्हणून साक्षात दंडवत घालतो आणि विमनस्क अवस्थेत डोक्याला हात लावून बसतो. तोंच दरीतून घुमून यावं तसं गाणं त्याच्या कानावर पडतं. )

**कुठे न घडली, कुणी न ऐकली । असली अजब कहाणी ।**
**वाऱ्यांत मिसळलें पाणी ॥ धृ० ॥**

**बजरंगाचा विवाह झाला । सूर्यापोटीं बर्फ जन्मला ।**
**मठ्ठ अचेतनशा दगडाला । जेव्हां फुटली वाणी ॥ १ ॥**

**गजाननाची बुद्धी सरली । प्राणवायुची शुद्ध हरपली ।**
**खाणे सोडून बकासुराने । गोड गाइली गाणी ॥ २ ॥**

**महापूर मृगजळासी आला । त्यांत हिमालय वाहून गेला ।**
**सिंहासंगे झोंबे कोल्हा । ज्ञान देत अज्ञानी ॥ ३ ॥**

**वाऱ्यांत मिसळलें पाणी ॥**

( हतबुद्ध झाल्यासारखा गाणं ऐकत असतांना मधून मधून देवाचं नांव वगैरे आलं म्हणजे नमस्कार करतो. गाणं संपत असतांना हळूहळू मारुती फिरतो आणि मागं असलेल्या उघड्या तिजोरीतून पैसे काढीत असलेला पाठमोरा चोर, त्याला माठमोऱ्या पाटलाच्या दिशेला येतो. त्याच्या अंगावर बैलगाडीचा चाबूक, डोक्यावर मारुतीचा मुगुट, पायांत चपला, हातांत बंदूक, सदऱ्यांत भरलेले पैसे–नोटा, दागिने वगैरे वस्तु दिसतात. इतक्या वेळानंतर गाणे ऐकून हतबुद्ध झालेला पाटील मानेला झटका देऊन आपल्याशींच म्हणतो— )

**पाटील** : बजरंगा !

**चोर** : ( अभावितपणे दचकून ) ओ ऽ.

**पाटील** : ( कुणी ओ दिली या संभ्रमांत पुन्हा एकदां ) बजरंगा !

**चोर** : ( घाबरून ) ओ ऽ.

**पाटील** : ( नक्की खात्री करून घेण्यासाठीं ) बजरंगा ! ( असं म्हणून वळतो त्याच वेळीं ओ म्हणून पाटलाकडं वळलेल्या चोराच्या हातून सगळ्या वस्तु खाली पडतात आणि तो थरथर कापायला लागतो. ) कोन आपुन ?

**चोर** : माझी चुकी झाली. पुनांदा म्या आसं करगार न्हाई.

**पाटील** : म्हंजी ?

**चोर** : मुगुट मारुतीचा. ( मारुतीच्या डोक्यावर ठेवतो ) ह्यो बैलगाडीचा चाबूक.

**पाटील** : धर्माच्या ?

**चोर** : न्हाई. जोंधळ्याच्या.

**पाटील** : आन त्यो तुज्याकडं ?

**चोर** : गाडी म्याच आडबाजूला लावलेली हाये.

**पाटील** : आन त्ये का ?

**चोर** : धान्याच्या लोभानं. माझी चुकी झाली.

**पाटील** : अवो, चुकी कसली त्येच्यांत. पोट असल्याला मानसाला धान्याचा लोभ असनारच. आणिक लागलं तर न्या.

**चोर** : आसं उफराटं बोलून का लाजिवतां ? ही पायतानं ?

**पाटील** : दवंडीवाल्याची. म्हंजी व्हती पर न्हाई. म्हंजी ? म्हंजी ? चोर.

**चोर** : माझी चुकी झाली. पैका समदा म्या परत ठेवतो.

**पाटील** : म्हंजी ? पैका नकळत नेत व्हता ?

**चोर** : तसा माझा बेत होता.

**पाटील** : आपलं नांव ?

**चोर** : माझं नांव बजरंग. ( पाटील नमस्कार करतो. ) आपुन पाटील हाय न्हवं या गांवाचं ?

**पाटील** : पर ह्ये अंतर्ग्यान आपनास्नी कसं झालं ?

**चोर** : मला वर येतांना ह्ये अंतर्ग्यान कळल्यालं व्हतं. मारुतीच्या मागल्या अंगाला उघडी तिजोरी हाये. पर मारुती गांवाचा राखनदार हाये. तसं चोरी करूं नगं त्यो तुला पाटलाच्या हाती दील.

**पाटील** : आपुन हितं चोरी कराया आला व्हता ?

**चोर** : व्हय.

**पाटील** : आपलं नांव बजरंग ?

**चोर** : व्हय.

**पाटील** : तुला मारुतिरायानं माझ्या हाती दिला ?

**चोर** : माझी चुकी झाली येकदाव मला माफी करा. ( साष्टांग नमस्कार घालतो. )

**पाटील** : माफी आपुन मला करा. इकता येळ म्या आपुनास्नी वळखलं न्हाई. जयदेवा, मारुतिराया बजरंगा, देवा, नवसाला पावलास बाबा. तुझी पायधूळ लागली. माजं घोडं गंगेत न्हालं. ( साष्टांग नमस्कार घालतो. )

**चोर** : ( उठून ) कां पाटील थट्टा करतांय गरीबाची ? येक डाव मला सोडा.

**पाटील** : आतां तुला कसा सोडूं ? देवा भाग्य माझं आपल्यावानी इभूती माझ्या हाती लागली. आतां तुला कसा सोडूं ?

**चोर** : पाटील तुमच्या पाया लागतो.

**पाटील** : पाया ? पाया आमी आपल्या लागायचं. आपुन आमच्या डोक्शावर हात ठेवायचा. आशीर्वाद द्यायाचा. [ दवंडीवाला येतो ]

**दवंडी** : पाटील, धर्माची गाडी धावली.

**पाटील** : आरं येड्या धर्माची गाडी आतां रस्त्याला लागली. ह्ये वग वळखलं का ह्येस्नी ?

**दवंडी** : न्हाई.

**पाटील** : कसं वळखनार ? त्येला पुन्याई लागती. जा अदुगर त्याचं पाय धर. आरं ह्ये चोर.

**दवंडी** : आपुन चोर ? अहाहा ! देवा, बजरंगा, पावलास रं माज्या बाबा ! जयदेवा बजरंगा, मारुतीराया, परमेश्वरा चोरा, ( तोही चोराच्या पाया पडतो आणि चोराची अवस्था ...... दवंडीवाला उठल्यावर ) पाटील माजं पायतान ?

**पाटील** : ऱ्हाऊं दे. आरं पादुका झाल्या. पुढं मागं ह्ये गेल्यावं ह्येची आठवन म्हून पुंजाया येल्याल.

**चोर** : पुढं मागं गेल्याचं ? न्हाई तसं नगा करूं ?

**पाटील** : जा, गांवकऱ्यास्नी दवंडी दिऊन ये जा. म्हनावं हणमंताच्या किरपेनं गांव चोराच्या संकटांतनं मुटल्यालं हाये. चोराचं दर्सन घेन्यासाठनं टाकोटाक या. पुन्हां दर्सन व्हनार न्हाई.

**दवंडी** : पुन्हां दर्सन व्हनार न्हाई ? (पुन्हां एकदां नमस्कार घालतो.)

**चोर** : पुन्हां दर्सन व्हनार न्हाई ? म्हंजी ? आपुन माझं काय करनार हाये ?

**पाटील** : आरं जा. धांव मार, दवंडी दिऊन ये.

**दवंडी** : ( दवंडीचा टोल बडवीत ) ऐका हो, ऐका—समस्त गांवकरी मंडळी ऐका. ध्यान दिऊन ऐका. कान दिऊन ऐका. आज गांव संकठातनं सुटल्यालं हाये. हणमंताच्या किरपेनं आज चोरांची पायधूळ आज गांवाला लागल्येली हाये. तवा पाटलाची गांवकऱ्यास्नी हात जोडून इनंती हाये का टाकोटाक मारुतीच्या देवळांत, गांवाच्या चावडीवं चोराच्या दर्शनाला या. जो कोन येनार न्हाई त्यो मोठ्या पुन्याईला अंतरल हो ! ऽऽ ( बहिणाईच्या घराकडं जातो. त्याच्या दिशेनं आनंदानं बघत पाटील उभा असतांना चोर हळूच मारुतीच्या पायापासून खाली उतरतो आणि विरुद्ध दिशेनं पळून जावं म्हणून बघतो तो खाली खोल दरी. मागं वळून बघतो मारुती पुन्हां फिरलेला. पाटलाच्या दिशेला पाहिलं तर पहाडासारखा पाटील आपल्याशींच बडबडत पाठमोरा उभा. )

**पाटील** : तरी म्या म्हनलं आमी काय इक्तं पापानं पाय धुतल्यालं न्हाईत. एकदां तरी बजरंगाला माजी करुना यील. काय फुकाट भक्ती केल्याली न्हाई. एक ना दीस चोर आपलं दर्शन दील. आतां येऊं दे मास्तर त्येला बी चोर दावतो.

**चोर** : पाटील, तुमी समद्यास्नी कशाला बुलिवता ? तुमी माजं काय करनार त्ये एकलं करा. समद्यांच्या हातीं मला दिऊं नगा. ही बंदूक घ्या. आपल्या हातानं मला गोळी घाला.

**पाटील** : तर ? म्या इक्तां भोळा हाये व्हयं ? आपल्या पावलानं पुन्य माज्या दारी आलं आन त्येला बघून म्या याच्या दाराला आडना लावून घेऊं ? आणि बंदूक ? ही तर माज्या वळखीची हाये.

**चोर** : आपल्याच गांवाच्या वेशीवर न्हानाच्या मानसाची हाये. स्वोत्ताच्या बचावापायीं म्या घेतली. म्या ती चोरल्याली व्हती.

**पाटील** : अहाहा. काय शिद्धी हाये ? चोरली. पुन्हा येकडाव म्हना.

**चोर** : खरंच कबूल करतो. खरंच म्या चोरली.

**पाटील** : काय ग्वाड वाटतंया ऐकतांना.

**चोर** : आईच्यान पुनांदा म्या आसं करनार न्हाई.

**पाटील** : आरं कर बाबा कर. तुजा पुन्याईचा अवतार त्येच्यासाठी.

**चोर** : म्या शपथेवर सांगतो, जल्मात चोरी करनार न्हाई.

**पाटील** : आसं म्हनावं लागतंय. आरं ही शिद्धी माज्यापाशीं असती तर कशापायी पाटील झालो असतो ? आन कशापायी वाट बघत बसलो असतो इनिस्पेटरची ? ठेवा देवा बंदूक.

**चोर** : न्हाई पाटील तुमी आपल्या हातानं मना गोळी घाला.

**पाटील** : आहाहा ! आपल्या हातातली बंदूक दुसऱ्याला दिऊन मला गोळी घाला म्हननारा मानूस मानूस न्हवं. म्हात्मा. म्हा आत्मा. म्हंजी मोठा चोर ? आतां गांवकरी मंडळी येत्याल.

**चोर** : गांवकरी मंडळी.

**पाटील** : लई मागासल्याली.

**चोर** : मागासल्याली ?

**पाटील** : अवं रानटी माणसं.

**चोर** : रानटी.

**पाटील** : परत्येकाच्या हातांत बंदूक. परत्येकाच्या हातांत कुऱ्हाड.

**चोर** : हत्यार परत्येकाच्या हातात ?

**पाटील** : जो उठतो तो दुसऱ्याचा खून कराया बगतोय.

**चोर** : खून ? आपल्या मानसांच्या हातीं मला नका दिवू पाटील.

[ धर्मा, गुणा हातांत कुऱ्हाडी घेऊन येतात. ]

**धर्मा** : पाटील मंजुळाक्काचा काय पत्या नाहीं.

**गुणा** : वैऱ्यानं तर काय केलं नसंल ?

**पाटील** : जरा दम उभा गांवाची भांडनं मोठ्या मानसाम्होरं भांडूं नगं.

**धर्मा** : ह्ये कोन ?

**पाटील** : ह्ये बगा. ही दोगं आडानी. जवा बगावं तवा हातात कुराड व्हारं म्होरं.

**गुणा** : काय झालं पाटील ?

**धर्मा** : काय झालं ? ( पाटील दोघांचाहि कानांत सांगतो, दोघंही दचकतात, डोळे आश्चर्यानं विस्फारून त्यांच्याकडं बघतात तो घाबरतो. जवळ जाऊं लागतो. ) हो म्होरं.

**गुणा** : अदुगर तू हो.

**धर्मा** : परत्येक येळेला मीच का ?

**गुणा** : पुण्याईच्या कामाला तूंच जायला होवं.

**धर्मा** : गुणा, माज्या हातांत कुऱ्हाड हाये.

**गुणा** : माजं काय तुनतुनं हाये का ? हो म्होरं.

**धर्मा** : तूं हो म्होरं.

**पाटील** : झाली का सुरुवात. आरं, असल्या इभूतीच्या देखतां नगा आबरू काढू गांवाची. दोघं एकदम म्होरं व्हा.

**चोर** : काढा पाटील.

**पाटील** : लांबून दर्सन घ्या.

**गुणा** : पावला बाबा एकडाव.

**धर्मा** : संकट टळलं गांवावरलं.

**गुणा** : पर ह्ये कळलं कसं पाटील ?

**पाटील** : काय त्ये ?

**गुणा** : का त्येच ह्ये म्हून.

**पाटील** : आरं मारुतीनं आनून दिलं स्वोत्ता. सगुनरूपांत दर्शन दिलं.

**धर्मा–गुणा** : आहाहा ! जय देवा मारुतीराया. ( असं म्हणून साष्टांग नमस्कार घालण्यासाठीं कुऱ्हाडी उचलतात तेव्हां तो बाजूला होतो आणि ते पायां पडतात. )

**पाटील** : बगा, बगा. तुमाम्होरं उभं ऱ्हायाची त्येची इच्छा न्हाई. तुमी दोगं पातकी मानसं हाये.

**चोर** : उफराटं बोलून कां लाजिवतां पाटील ? माझी चुकी झाली.

**पाटील** : गांवातल्या समद्यास्नी बोलवा.

**धर्मा** : पर आमी परत येईस्तो ह्येस्नी सोडू नगा.

**पाटील** : समदं येवस्थित करा.

**गुणा** : समदी येवस्था करतो. [ दोघेही जातात. ]

**चोर** : पाटील, माझं काय करायचं ठरवलंय तुम्हीं ? तुमच्या गांवांत मारुतीच्या पायीं बळी देण्याची रीत हाये का ? स्वोच्छ सांगून टाका पर आसं थट्टेनं परान नका घेऊं.

**पाटील** : अवो, आपनावानी चोरी करन्याची शिद्धी असलेल्या साधूपुरुषाला.—

**चोर** : म्या साधू न्हाई. म्या चोर हाये. पापी हाये.

**पाटील** : साधू पुरुषाची लक्षनंच हायती. साधू हाये ह्ये कंधी त्यो कबूल करील का ?

**चोर** : अवो पाटील, माझं तुमी नीट ऐका. मला एक डाव सोडा. फिप्टी फिप्टी. माज्या मिळकतीतला निम्मा भाग देतो.

**पाटील** : छ्या, छ्या. अवो, आपल्या मिळकतीतला निम्मा भाग घ्याया आमची का पुन्याई हाये ?

**चोर** : मंग तसं सोडा.

**पाटील** : मंग माझ्या इनिसपेशनचं काय ?

**चोर** : इनिसपेशन म्हंजी ?

**आंधळा** : ( प्रवेश करून ) हाये क्या बुड्ढा इधर ?

**पाटील** : कोन रं ? आंधळ्या ? ह्ये बगितलं का कोन आलंया त्ये.

**आंधळा** : मैंने सुना की चोर मिला करके.

**पाटील** : व्हय. बाजूलाच उभं हायती तुज्या. ह्ये बग, पाया पड.

**आंधळा** : कायको ?

**पाटील** : आरं, सात जन्मांच्या पुन्याईनं आल्याती गांवांत.

**आंधळा** : काहेका पुन्याई ? मैं बोलता पहिले इसको गांवके बाहर निकाल. ऐसाच एक चोर वैरीके गांवमें आया एक दिन और जबसे वैरीकी जातच बिगडी. आडगांवका पानी भागने लगा. जिमिन भागने लगी.

**पाटील** : ये आंधळ्या, माझी आतां घडी बसाया आली आन तूं का इस्कोट कराया लागलायसं ? इनिसपेशनच्या दिशीं या जेलमंधी—न्हाईलं तर माझी पाटीलकी टिकनार हाये. आन तूं ह्येस्नी गांवाभाईर काढाया बग. आपुन धांवा. आमच्या गावांत इदवान मानूस दुसरा हाये. त्ये आलं वगा या मास्तर. दवंडी कळली कां ?

**मास्तर** : कळली, म्हणूनच पुण्य पुरुषाचं दर्शन घेण्यासाठीं आलो.

**आंधळा** : मास्तर, ये चोर अच्छा रहता है क्या ? तूच सांग आबाको.

**मास्तर** : सांगायचं असं वेगळं काय आहे त्यामध्ये? चोर म्हणजे परमेश्वर.

**चोर** : काय झालं?

**मास्तर** : काय झालं ते कळलं, कसं झालं ते समजलं नाही. आणि ज्यानं केलं तो दिसलेला न्हाई. करून सवरून नामानिराळा. म्हणजे प्रत्यक्ष स्थितप्रज्ञ. म्हणजेच परमेश्वर. म्हणजेच आपण. ( हार घालतो. )

**चोर** : अवो, म्या देव न्हाई. म्या चोर.

**आंधळा** : ए मास्तर, उसका ऐक. शाना आदमी हाये. गावको बिघाड मत.

**पाटील** : ए आंधळ्या, भाईर हो. पाटील म्या हाये गांवचा. गांवची आडचन तुज्यापरीस मला लई कळतीया.

**आंधळा** : मैं बहिनाई कोच जाके बोलता।

**चोर** : ह्ये म्हणत्यात त्ये खरं हाये. माज्या नादी लागला तर सारा गांव चोरं बनंल, पाटील.

**पाटील** : त्ये ऐकडाव जल्दीनं करा. माझी कायमची आडचन जाईल. कवाच माझी पाटीलकी जानार न्हाई. आपुन आमचं गांव सुधारा.

**चोर** : सुधरा म्हंजी.

**मास्तर** : म्हणजे इथल्या माणसांचं हृदयपरिवर्तन करा.

**चोर** : म्या काय डाक्टर नाई. म्या चोर हाय.

**पाटील** : म्हंजी?

**चोर** : अवो, म्या चोर हाये चोर.

**पाटील** : त्ये झालंच. आनि एक आक्षी खरी गोष्ट सांगतो. बजरंग साक्षी हाये. त्येला इचारा. आमी लई निष्ठेनं भक्ती करनारी मानसं हावोत. लई आडचनीत हावो म्हून विनंती करन्याची येळ आलीया.

**चोर** : कसली विनंती?

**पाटील** : अपुन जेलमंधी न्हावा.

**चोर** : जेल? छ्या, छ्या. तसं नगा करूं. पाटील तसं नगा करूं.

**पाटील** : समदी पोरं भाईर काढतो. अवं आसं नगा करूं. इनिस-पेशनच्या दिशीं जर आपुन न्हाईला न्हाई जेलमंदी तर माझी पाटीलकी न्हानार न्हाई.

**चोर** : आसं ?

**मास्तर** : होय, ह्या गांवाचं कल्याण करणं केवळ आपल्या हाती आहे.

**चोर** : कल्यान ? आतां माझ्या ध्यानीं आलं. कल्यान म्हंजी लोकशेवा. ती करन्यासाठनंच म्या हतं आलेल्या हाये. कल्यान करतो म्या पर मला येळ न्हाई.

**मास्तर** : का ?

**पाटील** : ए मास्तर, असं इच्चारू न्हाई. आपल्यावानी आनिक बी आडल्याली मानसं आसत्याल. समद्यांच्या धांवन्या धावाव्या लागतात. आमचा असा अव्हेर नगा करूं.

**चोर** : पर मला येळ न्हाई. अपाइंट हाये.

**पाटील** : म्हंजी !

**चोर** : रुळावरल्या फिश्प्लेठ काडायच्या हायती. चार घरं लुटायची हायती. एक बॅंक फोडायची हाये. आनि खजिन्याच्या गाडीवर दरोडा घालायचा हाये. संप चालल्यालं हायती तोवर आमाला हात धून घ्याया होवं.

**पाटील** : का म्हनलं रं ह्ये मास्तर ?

**मास्तर** : वेद. हे वेद असतील त्यांचे.

**पाटील** : असत्याल बाबा असत्याल. ते आमच्या मुखी तिक्तं बोलवा. आपुन आमाला सुधरा.

**चोर** : अवो, सुधरा म्हंजी ? लोकशेवा करायची म्हंजी अदुगर गांवाला चोरी शिकावी लागंल.

**पाटील** : अवो, त्येच आमी म्हनलं.

**चोर** : पर त्येला कंत्राट कराया लागंल. मिळकतीचं नक्की ठराया होवं.

**पाटील** : म्हंजी पैका ? त्ये घ्या आपुन होवं तिक्तं. ( मारुती फिरतो ) पर पाटीलकी टिकन्यापुरती तिक्ती आमची गरज भागवा. समदा गांव चोराच्या ताब्यांत द्यावा लागला तरी चालंल.

**चोर** : म्हंजी सत्ता.

**पाटील** : व्हयं.

**चोर** : महाग पडंल.

**पाटील** : का ?

**चोर** : अवं, लई दांडगी इद्या हाये. अदुगर आमाला गांवाला चोरी शिकवावी लागंल. नंतर गांवाला चोरी करावी लागंल. नंतर आमाला एकांदी लहानशी चोरी करून हतनं जावं लागंल.

**पाटील** : जावं लागंल. म्हंजी ?

**चोर** : त्ये तुमास्नी इकल्यात कळनार न्हाई. चोरीचं काम हाये.

**पाटील** : म्हंजी म्हत्वाचं.

**चोर** : लई म्हेनतीचं काम हाये.

**मास्तर** : प्रत्यक्ष बजरंगाला मेहनतीचं काय ? डाव्या हातावर द्रोणागिरी उचलणारी आपली शक्ती नुसत्या अंगठ्याच्या सामर्थ्यावर आम्हांला मोक्षाप्रत नेणार नाही काय ?

**चोर** : मास्तर, आपुन जरा भाईर जावा. आमचं ह्येंचं जरा कंत्राट हाये.

**मास्तर** : मला या उपदेशाला का अंतरतां ?

**चोर** : पाटील आपुन ह्येना सांगा.

**पाटील** : मास्तर, जरा खाली जावा. आमचं जरा चोरीचं काम हाये.

**मास्तर** : अधिकाराचं काम असेल तर आम्हीं मध्ये हस्तक्षेप न करावा. पांडुरंग हरी ! वासुदेव हरी ! [ मास्तर जातो. ]

**चोर** : ह्ये आसं का करल्यात व्हा ?

**पाटील** : लई ईदवान मानूस हाये.

**चोर** : मला त्यांचं बोलनं कळत न्हाई. तवा त्ये ईदवान ह्ये तर खरंच पर त्येंचं काय हाये तुमास्नी चोर जसा थोर वाटतो का न्हाई त्येस्नी म्या ईदवान म्हनतो.

**पाटील** : ह्यो आपला वेदांत खरा हाये. पर काय कळत न्हाई. आपुन आमी अडानी हाये ह्ये वळखून सांगा.

**चोर** : ह्यो, पाटील या जगाच्या जेलखान्यामंदी—

**पाटील** : म्हंजी साळंत ?

**चोर** : व्हय, समद चोरच. समदं चोरून, पर जो त्यो दुसऱ्याची हुडकन्यांत गुतल्याला. तसं बघाया ग्येलं तर दुर्लौकिकानं म्या जरा चोर हाये तसं लौकिकांत आपुन बी चोरच हाये.

**पाटील** : ( हात जोडून ) छ्या, छ्या, आपली कुटं तिक्ती लायकी हाये का ? ज्येची योग्यता त्येच्याबरोबर.

**चोर** : ह्ये खरं. जशी ज्येची जागा तशी त्येची योग्यता. खरं जगायचं तर आपुन पाटील. आमी चोर. पर आपुन पाटील का झाला ?

**पाटील** : का म्हंजी ?

**चोर** : आमी चोर झालो म्हून. आमी हावो म्हून तुमी हाये. तुमी हाये म्हून आमी हावो.

**पाटील** : चोर ?

**चोर** : तर ? तुमास्नी, आमची गरज म्हून तुमी आमचं हात धरायचं. चोरी करतांना आणि आमाला तुमची गरज म्हून आमी तुमचं पाय धरायच चोरी सापडल्यावं. पर हाये समदे चोरच.

**पाटील** : म्हजी ?

**चोर** : तीच इद्या हाये. तवा तुमास्नी जर तुमची पाटीलकी टिकवायची आसंल तर अदुगर मला गांवाला चोरी शिकावावी लागंल.

**पाटील** : शिकवा.

**चोर** : आन त्येच्यासाठनं कायदं करावं लागत्याल. साळा काढावी लागंल.

**पाटील** : कायदं ? साळंचं कायदं ?

**चोर** : तर ! कायदं चोर घडविण्यासाठनंच केल्यालं असल्यात. कायद्यानं जर चोर घडवतां आलं न्हाई तर पाटीलकी ऱ्हाईल कशी ? जशी जेची सत्ता तसा तेचा कायदा. सत्ता टिकंल कशीं ? कायदा काढायचा – एक पळवाट ठिवायची–पळवाटीच्या दरोज्यानं आपुन मागून उभं ऱ्हायाचं आन पळनारा घावला का जेलला गिऱ्हाईक झालं. इनिसपेक्शनच्या दिशीं जेलमंधी चोर दिसाया होवत का न्हाई ? त्येच्याशिवाय पाटीलकी ऱ्हाईल कां ? मग उंद्या पहिला कायदा काढा समद्या गावाला लागू. दूध बंद.

**पाटील** : दूध बंद म्हंजी ?

**चोर** : म्हंजी दूध बंद. लई माजल्यागत लोक फिरल्यात गांवातून दूध पिऊन. ह्यो कायदा काढायचा आन दुदाचा वास घेत मानसं सोडायची गांवभर. ज्येच्या तोंडाला वास यील त्येला तुरुंगांत नेऊन टाकायचा. आपल्याला जेलला गिऱ्हाईक पायजे का न्हाई ?

**पाटील** : ह्ये नवंच हाये हां काय तरी. म्या म्हनत'व्हतो माज्या गांवात काय कमी हाये त्ये हायेच असनार. आसलं कायदं असल्यात व्हय चोरीचं ? तरी म्हनलं जेल रिकामं कसं ?

**चोर** : इक्त्यानं भागत न्हाई. चोरीच्या धंद्याला उत्तेजन द्यावं लागतंय.

**पाटील** : म्हंजी व्यापार उदीम वाढवावा लागतोय.

**चोर** : उद्यांधरनं सरकारी फर्मान काढा. पावशेर दुदांत शेरभर पानी सरकारी दूध.

**पाटील** : दुदांत पानी ?

**चोर** : दूद बी पवित्र हाये. गंगा बी पुन्यायीची हाये. पुन्याईत पवित्र मिसाळलं काय बिगाडलं ! एका हंड्याचं चार हंडं व्हल्याल.

**पाटील** : खरं हाये. आमच्या हतली मानसं लई मागासल्याली. जिक्तं पिकतं तिक्तंच इकल्यात.

**चोर** : सरकारी फर्मान काढायचं. पावशेर दुदांत शेरभर पानी. सरकारी दूध. मंग का हुईल. रोज चांगलं दूध पिन्याची संवं झालेला मानुस सकाळच्या पारी न्हाई तरं सांजच्यापारी सांपडल. कुठं ? अड्डयावं. दूद पेताना कंच.

**पाटील** : कंच ?

**चोर** : पहिल्या धारंचं. आतां पहिल्या धारंचं इकनारा आन पिनारा भेटला का आपल्याला जेलला गिऱ्हाईक झालं का न्हाई ? डब्बल !

[ धर्मा गुणा येतात ]

**पाटील** : धर्मा, ए गुणा उद्याधरनं दूध बंद.

**धर्मा–गुणा** : दूध बंद ? म्हंजी ?

**पाटील** : नवा कायदा हाये. चोराचा कायदा हाये. आजधरनं एक महिनाभर सत्ता ह्येच्या ताब्यांत दिलेली हाये. ( गळ्यांतील पट्टा काढून चोराच्या गळ्यांत घालूं लागतो. )

**गुणा** : गांवकऱ्यांस्नी इच्चारल्याबिगार.

**धर्मा** : आक्कासाहेबास्नी तरी इच्चाराल का न्हाई ?

**चोर** : आन पाटील, आमचं जर गांवच्या लोकांनी ऐकलं न्हाई तर–

**धर्मा** : छ्या, छ्या आपलं न ऐकून कसं भागंल ?

**गुणा** : आमच्या गांवाचं एवढं कल्यान करा आन मंग जावा.

**चोर** : ह्ये काय धंदा करत्यात.

**पाटील** : भांडनं करत्यात, आन शेती.

**चोर** : शेती, म्हंजी बांध आलाच. आन बांध आला की भांडनं आलीच. हाये त्येलाबी कायदा हाये. म्हंजी ह्येचा मूळ पोटापाण्याचा धंदा शेतीचा म्हंजी अन्नाधान्याचा म्हंजी मातीचा.

**पाटील** : मातीचा म्हंजी ?

**चोर** : आपुन समदी मानसं म्हंजी एका मातीची लेकरं. त्यो आंधळा, त्यो मास्तर, ह्ये पाटील. मानसामानसात का फेर हाये का ?

**पाटील** : न्हाई.

**चोर** : मंग अन्नाधान्यांत का ?

**पाटील** : म्हंजी ?

**चोर** : ज्या मातीतनं जोंधळा पिकतो त्या मातीतनं खडं पिकत्यात. समजा, मग तांदूळ तिक्तं खायाचं आन खडं तिक्तं न्हाई. आसं का ? तवा उद्याधरनं नियेम. जिक्तं तांदूळ तिक्तं खडं. समजा, पोत्यांत खडं नसलं का पुन्हा भेसळीचा कायदा करायचा. ह्ये शिकवावं लागतंया. व्यापार उमीद वाढवावा लागतोय.

**पाटील** : बगा, काय इदवत्ता हाये, न्हाई तर तुमी आडानी जिक्तं पिकतं तिक्तंच इकतां. व्यापार उदीम वाढवावा लागतोय.

**चोर** : आतां ह्यो नियेम झाल्यावं निसता तांदूळ इकनारा भेटला का आपल्याला जेलला गिऱ्हाईक पायजे का न्हाय ? तर आतां ह्येच्यावर आनिक एक चालबाजी हाये. ह्या इकनारावर एक नदर ठिवनारा ठिवायचा आपला मानूस. आन ह्या इकनाराला त्येनं धरलं का तर ह्येनं का म्हनाचं का म्या तुला जेलमंधी बसवीत न्हाई तू मला खायाला काय देतो ?

**पाटील** : खायाला म्हंजी ?

**चोर** : पैकं ?

**पाटील** : पैकं खाल्यात ?

**चोर** : आसं म्हनत्यात. मला त्ये जमल्यालं न्हाई म्हून तर बेकार न्हाइलोय, खाली. म्हून आलोय वर. तर त्यो नदर ठेवणारा हाये का न्हाई त्येनं पैकं ध्यायाचं, ध्यायाचं म्हंजी खायाचं. म्हंजी त्येला लांच म्हनत्यात.

**पाटील** : ( नमस्कार करून ) हाय इच्चेचा मार्ग हाये.

**चोर** : तर या पैलं खानाऱ्यावं नदर ठिवनारा येक ठिवायचा. त्यो खानाराच. म्हंजी आतां कसं झालं ? नदर ठिवनारा खानारा. खानारावं नदर ठिवनारा. नदर ठिवनारा खानारा. नदर ठिवनारा खानारा. नदर ठिवनारावं खानारा. असं ह्ये येडतांक वर पत्तुर पोचलं का न्हाई.

**पाटील** : पाक.

**चोर** : पाक पर पवतूर पोचलं का न्हाई का राज्य सुदारतंय. म्या त्यासाठनंच आल्याला हाये. पिवळ्या नकऱ्या दादाचा सांगावा घिवून, म्या त्येच्या कडंच कामाला हाये. आतां बेकारीत कुठंच नोकरी घावनां म्हून त्येची धरावी लागली या. त्यानं सांगितल्याली लोकशेवा हाये, सम्ता.

**मास्तर** : ( प्रवेश करून ) उपदेश पूर्ण झाला या समजुतीनं. मी एकदम प्रवेश केला. कांहीं चुकलं असेल.

**चोर** : गानं बंद. मास्तर आपुन काय शिकिवतां ?

**मास्तर** : भगवत्‌गीतेत सांगितलेल्या धर्मापासून सामान्य मानवाच्या अधर्मापर्यंत जे सुचेल ते शिकिवतो.

**चोर** : चोर म्हंजी ?

**मास्तर** : चोर म्हंजे प्रत्यक्ष परमेश्वर.

**चोर** : अनफिट. तुम्हांला काय येत न्हाई, तुमाला साधं चोर कळत न्हाई. मास्तर, उद्याधरनं तुम्ही नदीवं जावा आनि मासं मारीत जावा.

**मास्तर** : पण मी अजून कोळ्याचं जाळं सुद्धा बघितलेलं नाहीं.

**चोर** : लई आवाज करायचा न्हाई. म्या राज सुदराया आलोय. ज्येला ज्ये येत न्हाई त्येच त्येला करावं लागंल. समता करावी लागंल. पाटील,

मास्तराला म्हनावं उद्याधरनं तूं नदींवं जाऊन मासं मारीत जा. आन कोळ्याला म्हनावं पोरं हाक. येत न्हाई म्हंजी काय ...

**धर्मा** : त्येनं काय व्हनार ?

**चोर** : सुधारना.

**गुणा** : अवं पर, मास्तराचं शिकिवन्याचं काम कोळ्याला कसं करतां येनार ?

**चोर** : पाटील, आमी निगालो.

**पाटील** : म्हंजी ?

**चोर** : मग ह्ये आमास्नी उलटंमुलटं परस्न काय इचारत्यात ? येकडाव कायदा झाला म्हंजी झाला. कायदा सर्वांनी मानला पायजे. कायदा कुनाला माननार न्हाई. आन या चोराच्या कायद्याला जर कोन आडवं ...

**पाटील** : न्हाई न्हाई, आसं न्हाई व्हनार. का रं धर्मा ? का रं गुना ? काय ठरलं ?

**धर्मा** : दूध बंद.

**गुणा** : भेसळ.

**मास्तर** : मासे मारायचे.

**चोर** : अवो तुमच्याच कल्यानाचा धंदा हाये. म्या राज सुदारायला आलेलो हाये. [ दिवाणजी येतो. ]

**दिवाणजी** : आक्कासाहेबांचा अजून पत्ता नाहीं. शोधून शोधून थकलों. मला वाटतं तुम्हांला आतां बंदूक उचलून जावं लागणार वैऱ्याच्या गांवांत.

**चोर** : बंदूक.

**पाटील** : आला का पुना माज त्या वैऱ्याला ? आपुन या वैऱ्यावं काय तरी तोडगा काढा वं ?

**चोर** : बंदूक खाली ठिवा. मला बंदुकीचं भ्या वाटतंया. भांडनानं भांडनं वाढत्यात. वैरी काय करतो म्हनतां ?

**धर्मा** : पोरी पळिवतो.

**गुणा** : पिकं कापुन नेतो.

**चोर** : आन तुमी काय करतां ?

**पाटील** : एकडाव बंदूक हातात घेऊन जातो का बास.

**चोर** : म्हंजी तुमी त्येला धाक दावता ? त्ये चूक हाये. एकानं कुनी तरी हत्यारं ठिवल्याशिवाय भांडनं थांबनार न्हाईत.

**दिवाणजी** : वैऱ्यानें ठेवली नाहीं तरी ?

**चोर** : आपुन ठिवायची. एका बाजूला शांती झाली का दुसऱ्या बाजूला आपसुक व्हती.

**दिवाणजी** : हत्याराशिवाय न नमणारी जात. सामर्थ्यानें दुबळे पण स्वभावानें हलकट.

**चोर** : आपुन कोन दिवानजी हाये का ?

**दिवाणजी** : आपण कोण ?

**पाटील** : अरे ह्ये चोर.

**दिवाणजी** : असं का ?

**चोर** : व्हय आसंच. उफराटं इचारायचं न्हाई.

**दिवाणजी** : (पुढून मागून चोराला पाहून घेतो.) मी विचारलें नाहींच, फक्त खात्री करून घेतली.

**चोर** : मग झाली का ?

**दिवाणजी** : स्वरूप दिसलें पण रूपाची ओळख नाहीं झाली.

**चोर** : करून देतो. आजधरनं गांवाचा कायदा आमच्या हातामंधी आलेला हाये.

**पाटील** : इनिसपेक्शनच्या दिसापत्तूर. ह्यांच्या म्हनन्यापरमानं समद्या गांवानं वागाया होवं.

**चोर** : समद्या गांवाला चोरी शिकवायचं आमी कंत्राट घेतल्यालं हाये.

**दिवाणजी** : कराल तेवढें थोडें आहे.

**चोर** : तुमी दिवानजी हाये का ? तुमी आसं करा—तुमी—बिडी हाये का ?

**दिवाणजी** : काय झालें ?

**चोर** : बिडी, बिडी, जाऊं दे. तुमास्नी कळनार न्हाई.

**पाटील** : आसंल, इद्येचा भाग असंल.

**चोर** : तुमी आसं करा. उद्याधरनं तुमी वैऱ्याच्या शीमेवं जावा.

**दिवाणजी** : सीमेवर आणि मी कशाला ?

**चोर** : पहाऱ्यावं.

**दिवाणजी** : सीमेवर मी काय पहारा करणार ? हातात लेखणी धरली तरी हात कापतो माझा. बंदूक घेऊन मी तिथें काय करणार आहे सीमेवर ?

**चोर** : सीमेवर पहाऱ्याला बंदूक कशाला लागतीय ? तिथं लेखनीचंच काम.

**दिवाणजी** : लेखणी घेऊन पहाऱ्याला उभं रहायचं ?

**चोर** : आवाज करायचा न्हाई. कायदा पाळायचा.

**दिवाणजी** : अहो, पण वैऱ्यानें मध्येच हल्ला केला तर ?

**चोर** : का करील, जो पावतर आपुन कुनावर आक्रमण केलेलं न्हाई– तो पावतर आपल्यावं कोनबी आक्रमण करणार न्हाई.

**दिवाणजी** : अहो, पण वैऱ्याला तशी संवय आहे. आपण निधास्त राहिलो आणि जातीवर जाऊन त्यानें हल्ला केलाच तर त्याला उत्तर द्यायला बंदूक नको.

**चोर** : का करायची बंदूक, वैऱ्याचा हल्ला आला र आला का एका हातांत लेखनी आन दुसऱ्या हातांत कागुद बास. लढाईला का बंदूक लागतीया काय ? रामरावणाच्या युद्धाचा मागासल्याला काळ न्हाईल्याला न्हाई. सुदारल्याला काळ हाये. हल्लीच्या काळाला बंदुकीला उत्तर लेखनीनं द्यावं लागतंय.

**पाटील** : काय इदवत्ता हाये.

**मास्तर** : दैवी हाये.

**पाटील** : दिवाणजी, ऐकलं का न्हाई ? आजधरनं यांचं कायदं समद्या गांवाला पाळाया सांगा. [ दवंडीवाला येतो ]

**दिवाणजी** : लिहून देतों, म्हंजे हा दवंडी देऊन येईल.

**दवंडी** : आतां आनि कसली दवंडी. खालनं वर वरनं खाली करून करून पायाचं टाक निगायची वेळ आलीया. या दिवानजीला काय होतंय ? जागच्या जागीं बसून नुस्तं लिवायचं ? माज्यावानी दवंडीवाला हून वग येकडाव.

**चोर** : दवंडीवालं, उद्याधरनं तुमी आमचं दिवानजी.

**दवंडी** : छ्या, छ्या, आवं त्याला मी आपलं सहज थट्टेनं बोललो. दिवानजी होन्याची काय आपली लायकी हाये का ?

**चोर** : चोराच्या कायद्यानं काय लागंल त्ये व्हतंय. समता हाये. एकडाव आमी कायदा केला म्हंजी केला. उद्याधरनं तुमी आमचं दिवानजी.

**दवंडी** : अवं पर, मला लिवता येत न्हाई.

**चोर** : मला कुठं येतंय.

**दवंडी** : मंग वाचन्याचं कसं ?

**चोर** : का वाचायचं ?

**दवंडी** : कांहीं सरकारी कागुद आला तर ?

**चोर** : तुज्या मनाला ईल त्यो मजकूर वाच. आमाला पास पडला तर आमी अंगटा करणार. लिवन्या-वाचन्याचा संबंद काय ? आंगठ्याचं राज्य हाये. लई आवाज करायचा नाहीं. चोराचा कायदा हाये.

**दिवाणजी** : इतके दिवस नुसते बळच होते आतां बुद्धि जोडीला आली. योग्य जागीं योग्य नेमणूक.

**पाटील** : हाये का न्हाई ? अवं ह्येला भाग्य लागतंय.

**दिवाणजी** : सगळ्यांना नियम झालं , पाटलांना नाहीं वाटतं कांहीं.

**चोर** : हाये तर ? हईंसा.

**पाटील** : काय झालं ? हईंसा.

**चोर** : हईंसा.

**पाटील** : काय झालं ? काही कळलं न्हाई.

**चोर** : पाटील, उद्याधरनं तुमच्यासकट समद्या लोकांची हत्यारं काढून घ्या आन शमी वृक्षाच्या मागल्या अंगाला पूजेला लावा.

**पाटील** : हत्यारं आन पूजेला ? मानसं काय म्हणत्याल ?

**धर्मा** : आवाज करायचा न्हाई.

**गुणा** : चोराचा कायदा हाये.

**चोर** : हईंसा. [ बहिणाईसह आंधळा येतो. ]

**आंधळा** : मैंने तेरेको पहिलेच बोल्या था बहिने. ये चोरने वैरीका गाँव बिगाड्या और वो आपने गांवमें आया करके.

**बहिणाई** : काय रं आबा, आं ? तुज्या लहरीला लागंल तवा गांवाची सत्ता दुसऱ्याच्या हातांत द्यायां गांव काय वाऱ्यावं पडला हाये व्हय ?

**मास्तर** : कुणाही पूज्य पुरुषाबद्दल वेडंवाकडं बोलून एकाद्या महान विभूतीचा अपमान करणं वयाला शोभत नाहीं वहिणे.

**बहिणाई** : गानं बंद कर.

**चोर** : कोन ही म्हातारी ?

**बहिणाई** : तुजी आई. आं ? म्हनं ही कोन ? पिकल्या केसांची तरी जरा इज्जत राख.

**दिवाणजी** : इज्जत केसास नाहीं बहिणाई. इज्जत आहे कायद्यास.

**चोर** : पाटील आमी कोन हाये हे एकडाव ह्येस्नी समजून सांगा.

**दिवाणजी** : अहो, ते त्यांनाच कळलेले नाहीं ते त्यांना काय सांगणार ?

**पाटील** : कुनाला कळल्यालं नाही ? मला ? म्या पाटील हाये गांवाचा. मला न कळण्यासारखी वस्तु एक तरी हाये का जगांत. ह्ये चोर हायेत. गांवाला चोराची गरज हाये आनि म्हून आजधरनं ह्यांचं कायदं गांवानं पाळायचं आसं आमी ठरविल्यालं हाये.

**आंधळा** : कौन पाळेगा वो कायदा ? चल बहिने.

**बहिणाई** : या म्हाताऱ्याला लागलाया चळ.

**चोर** : आमच्या इरुद्ध जात्यात मानसं पाटील.

**पाटील** : कोन कायदा पाळनार न्हाई त्येला गोळी घालंल. जारं दवंडीवाल्या दवंडी दिऊन ये गांवाला. आजधरनं या गांवामंदी चोराची राजवट हाये. चोराचा जो कायदा पाळनार न्हाई. त्येला मानवतेच्या रक्सनासाठनं गोळी घातली जाईल.

**चोर** : गोळी न्हाई. हईसा. [ दवंडीवाला जातो ] कायदा काय झाल्याला हाये ?

**पाटील** : न्हाई पर आपल्या इदवत्तेम्होरं आमाला काय बोलायचं न्हाई. पर हत्यारं काढून ठिवल्यावं हईसा कशी होते ते काय कळल्यालं न्हाई.

**चोर** : त्येला इदवत्ता लागते. आपुन आता बलभीमाला नमस्कार करतो का न्हाई ?

**पाटील** : व्हय् करतो कीं.

**चोर** : मंग त्यो नमस्कार आपुन मारुतीला करतो का त्येच्या हातातल्या गदेला करतो ?

**पाटील** : मारुतीला.

**चोर** : आन गदा काढून घेतली त्येच्या हातांतली तर ?

**पाटील** : छ्या, छ्या, बळाशिवाय बलभीम होतोय व्हय ?

**चोर** : अवं, बळभीमातलं बळ काढून घेतल्यावं न्हाईलं काय ?

**पाटील** : भीम.

**चोर** : कंचा ?

**पाटील** : कंचा म्हंजी ?

**चोर** : दुःशासनानं हात घातला द्रौपदीच्या वस्त्राला तवा मान खाली घालून बसल्याला. बळ काढून घेतल्यावं काय न्हाईलं ?

**पाटील** : काय नाहीं ?

**चोर** : मग आता भीम खरा का त्येची गदा खरी ?

**पाटील** : गदा.

**चोर** : मग मारुती खरा का गदा खरी ?

**धर्मा** : गदा.

**चोर** : मग नमस्कार मारुतीला करतां का गदंला ?

**गुणा** : गदंला.

**चोर** : मग गदा कशासाठनं हाये ?

**पाटील** : नमस्कार करण्यासाठनं.

**गुणा–धर्मा** : म्हंजी पूंजा.

**चोर** : म्हंजी पूंजा. तवा हत्यारं पूजेसाठनं असत्यात. चालवन्यासाठनं न्हाई. पांच पांडवातलं बळ गेल्यानं न्हाईलं काय ? धरम. त्यो आपला धरम हाये, नवा हाये. हइंसा. भगवतगीतेत सांगितल्यालं हाये.

**आंधळा** : बहिने, चूपचाप सुनती क्या तू ? उसको बोल ना थोडा ग्यानेस्वरीमें अहिंसा कैसी बोली करके.

**बहिणाई** : हत्यारं काढून ठिव आन हइंसा कर. आन वैऱ्यानं पोरी पळवून नेल्या तर ?

**चोर** : हत्यारं खाली ठिवायची आन मान खाली घालून बसायचं. ज्ञानेश्वरीमधेच सांगितलेलं हाये, जो जे वांछिल तो ते लाहो ।

**आंधळा** : जो निकालेगा वैसा अर्थ निकलेगा उसमेंसे. आता चोरच ग्यानेश्वरी बोलनेको लगा तो ग्यानेश्वरको चोर होकेच बैठनेको होना.

**पाटील** : आपुन ह्या आडानी लोकांचं बोलनं नका मनावं घीवूं. ह्यांची विदवत्ता कुठं ? काय झालं तरी आपुन चोर.

**चोर** : मंग काय ठरलं ?

**पाटील** : हइंसा.

**चोर** : ठरलं ?

**पाटील** : आमी निष्ठेनं भक्ती करणारी मानसं हावोत. एकडाव सबूद दिला म्हंजी दिला. मान तुटून पडंल तर सबूद मोडनार न्हाई.

[ मंजुळा येते. ]

**मंजुळा** : आबा, वैऱ्याचं आन पान्याच्या काठावरल्या मानसांचं लई भांडान चाललंया.

**पाटील** : आन तुमी कशाला गेल्याला थतं ?

**मंजुळा** : शिरपतीला बंदूक देया.

**पाटील** : का ?

**मंजुळा** : अवो, त्यो येकला व्हता. बंदूक नव्हती. पर आबा जवा का बंदूक दिली —

**पाटील** : कुनाची ?

**मंजुळा** : तुमचीच की—म्या न्हेल्याली व्हती.

**पाटील** : तुम्ही न्हेल्याली व्हती व्हयं ? म्या म्हनलं......

**चोर** : चोरानं नेली.

**पाटील** : चोरानं न्हेली म्हंजी ?

**चोर** : म्या.

**पाटील** : हां, म्हंजी द्येवानं नेली ?

**चोर** : दैवानं म्हना.

**पाटील** : व्हयं दैवच.

**चोर** : त्ये तुम्हांला कळणार न्हाई.

**पाटील** : त्ये कुनालाच न्हाई कळल्यालं. पर बंदूक तेला का दिली ?

**मंजुळा** : का म्हंजी ? वैऱ्याजवळ व्हती, मग दोगं सारख्या बळाचं असाया नगंत ?

**पाटील** : पर आतां तो बेकायदा वागाया लागंल तेचं काय ? तेच्या-साठनंच ह्या म्हात्म्यानं काढून घेतल्याली व्हती.

**मंजुळा** : म्या तेला सांगितलं का तू बेकायदा वागूं नगं, आबास्नी राग यील.

**पाटील** : बंदूक हातांत असल्याव तो ऐकणार हाये व्हयं ?

**मंजुळा** : त्येनं ऐकलं पर वैरी ऐकना. बदूक टाकून पळाया लागला. म्हंजी बगा आता आबा, बंदूक विऊन मला धर मला धर म्हून बिच्चारा शिरपती धांवतोया वैऱ्याच्या मागं आन बंदूक टाकून मला सोड मला सोड म्हून वैरी धांवतोया म्होर म्होरं. तेनं लई सांगितलं पर वैरी ऐकनां. इकत्यात वैऱ्याच्या म्होरं गोपालकिस्न उभा.

**गुणा** : धनगराचं बेनं ?

**धर्मा** : आन त्ये काय करत व्हतं थतं ?

**मंजुळा** : हातांत एक घोंगडीचा धागा आन् मेंढरं चारत चारत म्होरनं आला.

**धर्मा** : बेकायदा वागला.

**गुणा** : आपुन कधी कायद्याच्या भाईर वागतोय का ?

**धर्मा** : वागतोय का ?

**मंजुळा** : पर त्यो म्हनतो पाटलानं मला जिमिन बक्षिस दिल्याली हाये.

**गुणा** : व्हय, दिल्याली हाये.

**धर्मा** : आमच्या साक्षीनं दिल्याली हाये.

**गुणा** : पान्याच्या अल्याड का पल्याड ?

**मंजुळा** : अल्याड.

**धर्मा** : म्हंजी इक्तदी पानीच मागत व्हता.

**गुणा** : आतां जिमीन बी मागाया लागला व्हयं वैरी? त्या जागंवं वैऱ्याचा काय संबंध?

**मंजुळा** : न्हाईंना?

**धर्मा** : अजाबात न्हाई.

**मंजुळा** : मंग शिरपतीनं केलं ते बराबर केलं.

**पाटील** : काय केलं?

**मंजुळा** : त्यो वैऱ्याला म्हनतो पानी बी तुमचं न्हाई आन जिमिन बी. तुमची न्हाई. बंदूक घेतली आन वैरी पार पाकटून लावला शीमेपार, पर त्येनं काय केलं त्ये चांगलं क्येलं का न्हाई?

**पाटील** : चांगलं आसंल वाईट आसंल पर करनार त्यो कोन? पाटील कोन हाये. माझ्या ध्येनांत आलंया. अशी बंडाळी माजवून आमची पाटीलकी घ्याया बगतोय. आपुनच सांगावं. या पोरास्नी जरा सुदरा.

**चोर** : ह्या कोन?

**पाटील** : ही ल्येक आमची.

**चोर** : चांगली हाये.

**आंधळा** : फेरसे बोल. शिरपतीको समजा ना तो बंदूक चलायेगा.

**चोर** : त्येच्यासाठनंच कायदा हाये. जरा दमा.

**मंजुळा** : कोन हाये वं ह्यो?

**पाटील** : आसं बोलू न्हाई.

**चोर** : बोलू द्यात. बरं वाटतंय. एक तरी वळखनारं भेटलं. अवं ही आमची वळखीची भाषा. कुनी लाथ घातल्याबिगार पाय बगितल्यालंच न्हाईंत कुनाचं. बज्या म्हनल्याशिवाय ओ म्हनन्याची मला संवंच न्हाई. आतां तुमी आमचा बजरंग करून ठिवलाय. नशीब अकलंचं. सदा नदर खिशाकडं न्हाइतं नदरेकडं.

**गुणा** : खिसा म्हंजी?

**चोर** : ठावं न्हाई? कप्पा. आंत आनी योक चोरकप्पा असतुय.

**धर्मा** : अग बया बया बया, इक्तं मोठं आमाकडं कुठनं असाया.

**चोर** : ही शिकवन.

**पाटील** : बगा तुमावर परसन्न हायती. तेंचं पाय धरा. हिला जरा ग्यान सांगावं. धरा पाय.

**मंजुळा** : ह्या माकडाचं.

**पाटील** : असं बोलूं न्हाई. ह्ये असंच करती. कुनाला पर काय पर बोलती.

**चोर** : बरोबर, त्यास्नी लाज न्हाई.

**पाटील** : लाज न्हाई म्हंजी ?

**चोर** : ती वाटन्याच्या अदुगर या वयांत असं होतंय. तुमी कंदी चोरून पिरेम केल्यालं हाये का ?

**पाटील** : म्या ?

**चोर** : न्हाई वो म्या ह्येस्नी म्हनलं.

**मंजुळा** : चोरून म्हंजी ?

**चोर** : म्हंजी ठावं न्हाई ?

**पाटील** : आडानी हाये.

**चोर** : म्या शिकिवतो म्हंजी आपसुक मान खाली जाईल लाजेनं आन् एकदा लाज आली कां शबुद आपसुक फुटंना व्हतोय. मंग एकांदं माकड बी मदन वाटाया लागलं.

**धर्मा** : म्हंजी वैरी ?

**गुणा** : हीः हीः माकाड ?

**चोर** : तेला नदर बदलावी लागती.

**पाटील** : ल्ये, काय ल्ये येकडाव करा बगा.

**चोर** : समद्यांच्या नदरेम्होरं न्हाई. तुमी जावा समदी मंडळी.

**पाटील** : पर हिला शिकविता न्हवं चोरीचं ?

**चोर** : समद्यास्नी शिकिवतो. सुरुवात ह्येंच्यापासून. [ दवंडीवाला येतो. ]

**दवंडी** : पाटील, शिरपतीनं वैऱ्याच्या अंगच्या घरनाची भींत फोडली.

**पाटील** : कां ?

**दवंडी** : वैरी म्हनला घरनाचं पानी आम्हास्नीच मिळाया होवं. तुमची जिमिन उपाशी मेली तरी चालंल.

**गुणा** : आज काल लई माजाला आलाया वैरी.

**धर्मा** : आरं, मोठ्यानं बोलूं नगं पाटलास्नी राग यील.

**दवंडी** : तवा शिरपती त्येला म्हनला प्ये पानी. जिमिन बी तुमची न्हाई. पानी बी तुमचं न्हाई. आतां जिमिन घे छातीवं. आतां प्ये पानी. पोरं जमिवली आन पार फोडलं धरान. पार जिमीन वाहून जाया लागलीया.

**गुणा** : शाब्बास रं माज्या वाघ्रा !

**धर्मा** : पानी मागतोया.

**पाटील** : पर का अश्रापाच्या मागं लागलाया शिरपती. आपलं शेजारी हायेत.

**आंधळा** : पर वैरीने झूटा तंटा कायको निकाला पहिले ?

**पाटील** : त्वां त्वांड बंद कर. माज्या ध्येनांत आलंया. आपलीच मानसं आपली न्हायल्याली न्हाईत. माझी पाटीलकी मिळविण्यासाठनं त्येनं ही बंडाळी चालवलीया. जा जाऊन सांग वैऱ्याला म्हनावं चिंता करूं नगं. म्या माझी निम्मी जिमीन तुला दीन.

**मंजुळा** : तसं नगं आबा, सगळं गांवच वैऱ्याला दिऊन टाका.

**पाटील** : व्हय तसंच करनार हाये. शिरपतीसंगट कट करून ही वानर-शेना तुमीच उभी केल्याली हाये. ऐकून ठिवा अक्कासाब आमचा सत्तेनाश झाला तरी चालंल. म्या वैऱ्याचं भलं करनार हाये. आन तू बी ऐकून ठीव भईने, आज तुझा पोरगा मेला. लई अपराध पोटांत घातंल. आज न्हाई ऐकनार कुनाचं. आज माझ्या गोळीचा पहिला बळी शिरपती.

**आंधळा** : भहिने, तू क्या सुनती है ?

**बहिणाई** : समदं ऐकतीया. जवा वगावं तवा इथं आनतुया. बेकायदा वागतुया.

**आंधळा** : पर बंदूक लेके जाता है पाटील.

**बहिणाई** : त्येचं त्यो घील बघून. घालूं दे गुळी.

**चोर** : आमी निगालो.

**पाटील** : म्हंजी ?

**चोर** : आमी तुमास्नी पहिलंच सांगितल्यालं व्हतं का आमाला बंदुकीचं भ्या वाटतंय. त्याच्याशिवाय दुसरी भाषा तुमी करत न्हाई. आ

त्यासाठनंच म्या हईसेचा कायदा काढल्याला हाये. तुमी स्वोत्तांच कायदा मोडल्यावं गाव काय पाळणार हाये.

**मंजुळा** : न्हाई आबा, तुमी ह्येचं काय ऐकूं नगा. उचला बंदूक.

**धर्मा** : आक्का.

**आंधळा** : मंजू.

**गुणा** : आक्कासाब ?

**मंजुळा** : धरान फोडतोय ? बेकायदा वागतोय ? गाडाव– असं आबा म्हनल्यात. उचला बंदूक.

**दिवाणजी** : पण चोराची गरज विसरूं नका.

**चोर** : म्या चाललो मला गरज न्हाई.

**पाटील** : तुमी जाऊं नगा. तुमाला हार घालतो. तुमचं कायदं पाळतो. का मंडळी ?

**गुणा** : आतां रं धर्मा ? ह्यो पेच आला. बंदूक ठिवली का शिरपती मालनार.

**धर्मा** : हातांत घेतली का पाटीलकी जानार.

**गुणा** : पाटील लई आवगड जागेला घांवला.

**पाटील** : इनिसपेशनच्या दिसापोतूर ह्येंचा कायदा.

**गुणा** : व्हय, आपुन कधी कायद्याच्या भाईर वागलोय का ?

**धर्मा** : कंधी वागलोय का ?

**चोर** : न्हाई तर म्या चाललो ? मला गरज न्हाई.

**पाटील** : बाबा मला हाये. ठिवतो बंदूक.

**चोर** : सत्ता माझ्या हातांत ?

**पाटील** : व्हयं दिली.

**चोर** : कंचं कायदं ठरलं ?

**धर्मा** : दूद बंद.

**गुणा** : धान्यांत भेसाळ.

**मास्तर** : मासे मारायचे.

**दवंडी** : दिवानजी.

**दिवाणजी** : लेखणी घेऊन पहाऱ्यावर.

**पाटील** : बंदूक ठिवायची !

**चोर** : पुन्हां हात लावायचा न्हाई.

**पाटील** : व्हय, न्हाई लावायचा.

**चोर** : मारुतीची आन ?

**पाटील** : व्हयं आन ( आंधळा हंसतो ) का हंसतो रं——— ?

**आंधळा** : रक्खी क्या रे बंदूक पटेलने ? कैसा दिखता है रे पटेल ? दिखता होगा मूंछ निकले हुये शेरके जैसा. सत्ता गयी ना ? अभी आयेगा उसको शानपन.

**पाटील** : हांस बाबा, हांस. ( बंदूक कपाळी लावून ) आई मला माफी कर. ही इक्ती इनिसपेशन हूंदे. म्या तुजाच पोरगा हाये. जलमभर तुझी शेवा करीन. तुला दूर करावं लागतंया पर माझा काय विलाज चालंना. चोराचा कायदा हाये. येकानं कुनी तरी हत्यारं ठिवल्याशिवार शांतता व्हनार न्हाई. तंटं थांबनार न्हाईत. हत्यारं खाली ठिवतांना मर्दाला काय दुख व्हतं ह्ये तोडगा काडनाराला काय कळावं ?

**चोर** : तुमास्नी दुख व्हतंय ?

**पाटील** : न्हाई बाबा, आनंद वाटतोय. ठिवली बंदूक.

**चोर** : समदी हत्यारं ठिवली ?

**सगळे** : व्हय.

**चोर** : हत्यारावर फुलं टाका.

**सगळे** : टाकली.

**चोर** : मंग तुमच्याच कल्यानाचाच धंदा हाये. ही लोकशेवा हाये. अवो मला जे करता यीना म्हून बेकार न्हाईलो तेच शिकवायची वेळ आलीया माझ्यावं ? मग येकमुखानं म्हना – काय कायदा ठरला ?

**सगळे** : हईसा !

( सगळेजण हत्यारं खाली ठेवून टाळ हातांत घेऊन ' विश्वास असावा चोरांचा –' हे भजन म्हणत असतांनाच पडदा पडतो आणि म्हणूनच दुसराही अंक संपतो. )

# अंक तिसरा

**मानवा हो ढोंगी सैतान ।**
**मित्र म्हणून जा जवळ कुणाच्या**
**काप तयाची मान ।**
**मानवा हो ढोंगी सैतान ।।**
**रामही गेला कुठला रावण ।**
**तसेच विसरा ते रामायण ।।**
**विश्वापुढती मूर्खपणाचा तो संदेश लहान ।**
**मानवा हो ढोंगी सैतान ।।**
**असो मुक्तता सदा बांधली ।**
**सदा तृप्तता असो भुकेली ।।**
**ऐन जयाचे वेळीं जावो नीतीचे अवसान ।**
**मानवा हो ढोंगी सैतान ।।**
**असत्य हिंसा जळो शांतता ।**
**हीच जगाची चरित्रगाथा ।।**
**शुद्ध शील तर चारित्र्याचा एकमेव अपमान ।**
**मानवा हो ढोंगी सैतान ।।**

[ तिसऱ्या अंकाचा पडदा उघडण्यापूर्वी विचित्र वाटलं तरी हें गाणं ऐकूं येतं. दिवाणजी मारुतीच्या पायाशीं बसलेला. ]

**दिवाणजी** : जयदेवा मारुतिराया सोडीव. मला पहाऱ्यावर बसवलेंय. वेड्यासारखें म्हणत नाहीं. चोराच्या राज्यांत गुन्हा ठरायचा. म्हणून चोरासारखें म्हणतों. मला पहाऱ्यावर बसवलेंय चोरानें. पण माझ्या पहाऱ्याला कोणी नाहीं. म्हणून मी भिऊन इथें आलोंय. चोरून चोरून म्हणतात तें हेंच तर नसेल. तूंच तार. मी तिथून पळून आलोंय. मला जर कांहीं शिक्षा होणारच असली तर ती चोराला सद्बुद्धि दे.

**दवंडी** : दिवाणजी, एक काम करा की.

**दिवाणजी** : काय रे ?

**दवंडी** : हे काय वाचा बघू. तुमास्नी वाचाया येतंया का त्ये बगूं.

**दिवाणजी** : मला ?

**दवंडी** : व्हयं. काय सरकारी कामाचा कागुद हाये.

**दिवाणजी** : काही कळत नाही. कुठली भाषा आहे कुणास ठाऊक. आता मास्तरांना विचारल्याशिवाय मी तरी काय सांगूं.

( पुढं मनांतल्या मनांत वाचतो. त्याच्या वाचण्याबरोबर याच्याहि मुद्रा फिरत असतात. वाचून संपल्यावर घडी करून कागद त्याला देतो. )

**दवंडी** : काय हाये ?

**दिवाणजी** : मला काय ठाऊक ?

**दवंडी** : मंग त्ये काय हाये त्ये सांगा कागदांत ?

**दिवाणजी** : मी का सांगेन ? मी का दिवाणजी आहे ?

**दवंडी** : आवं पर, त्येनं मला इचारलं तर ?

**दिवाणजी** : सांग की तुझ्या मनाला येईल तो मजकूर.

**दवंडी** : आवं पर, तुमी इक्ती मदत करा की. दिवानजी, आडचनीत हाये म्हून—म्या येळ कवा तरी तुमची बी निभवन...

**दिवाणजी** : हा तुला मिळाला कुठं ?

**दवंडी** : घावला पाटलाच्या गादीवं. पाटलाच्या म्हंजी चोराच्या—म्हंजी आत्ताच्या.

**दिवाणजी** : सांगू मजकूर ?

**दवंडी** : व्हय सांगा.

**दिवाणजी** : आपण एक पाजी आणि विश्वासघातकी गृहस्थ आहात. एखाद्या गावाचें वाटोळें करावयाचें झालें तर तो आपल्या हातचा मळ आहे. झाडावर उलट टांगून तुम्हांला मिरच्याची धुरी दिली खालून.

**दवंडी** : ह्ये असं वाचायचं ?

**दिवाणजी** : मजकूर सांगायचा.

**दवंडी** : ह्यो असा ?

**दिवाणजी** : मग त्याला काय. ते त्यांचे वेद असतील.

**दवंडी** : चोरांचे.

**दिवाणजी** : मग ?

**दवंडी** : असल्याल बाबा असल्याल. [ चोर येतो. ]

**चोर** : आरं माजं काय खत घावलं का ?

**दवंडी** : खत ? कसलं व्हं दिवानजी ?

**दिवाणजी** : काय कुणास ठाऊक ? पुरून घेत असतील स्वतःला, मग घालायचं असेल. म्हणजे आणखी उगवत असतील चोर.

**चोर** : आरं काय आलंया का ?

**दवंडी** : खत न्हाई. पेरनीला येळ हाये.

**चोर** : सरकारी कागुद न्हाई ?

**दवंडी** : सरकारी कामाचा कागुद आल्येला हाये की. पर त्यो आमाकडं खताला घालत न्हाईत.

**चोर** : काय त्ये ?

**दवंडी** : सरकारी कागुद.

**चोर** : आल्याला हाय ना ? मग वाच बघू.

**दवंडी** : म्येलो.

**दिवाणजी** : मरूं नकोस वाच. मघाशीं सांगितले ते.

**दवंडी** : हां, हां, त्ये व्हयं ? त्ये वाचतो—

आपून एक पाजी आन विश्वासघातकी मानूस हाये. येकांद्या गांवाचं वाटुळ करायचं झालं तर त्ये आपल्या हातचा मळ हाये. झाडावं तुमास्नी उलटं टांगून धुरी दिली मिरच्याची—

**चोर** : ह्ये आसं हाये कागदात ?

**दवंडी** : असं हे म्हनल्यात.

**चोर** : पर दिवानजी हे हायती का तुमी ?

**दवंडी** : पर मला वाचता येत न्हाई.

**चोर** : मनाला मजकूर यील त्यो सांगायचा.

**दवंडी** : ह्येनी सांगितलेला मजकूरच माझ्या मनाला आल्याला व्हंता.

( चोर रागानं कागद काढून वाचतो. )

**दिवाणजी** : तुम्हांला वाचायला येते ?

**चोर** : न्हाई. वरल्या मानसाला येत नसलं तरी खाल्ल्याला येतं आसं दावाया लागतंया. आपुन हे वाचलं जनुं.

**दिवाणजी** : कसं वाचूं ? मी काय दिवाणजी आहे ?

**चोर** : आरं ह्ये बग. ह्ये आपला तूं त्या हेला बलावून आन. ( दोघेहि स्तब्ध उभे राहतात ) का रं कळलं न्हाई का ?

**दवंडी** : न्हाई.

**चोर** : कसा दिवानजी क्येला तुला ?

**दवंडी** : त्येबी मला कळल्यालं न्हाई.

**चोर** : त्येला डोक्सं लागतं.

**दवंडी** : खरं हाये— ( म्हणून दिवाणजीच्या डोक्याकडं बोट करतो )

**दिवाणजी** : पण मलासुद्धां कळलेलं नाहींच. कुणाला बोलवायचं तें ?

**चोर** : त्येच ब्येस झालं. तुम्हीं चला आतां जेलांत.

**दिवाणजी** : चला. ( उठतो ) जेलांत म्हणजे ( बसतो ) नको.

**चोर** : लई आवाज करायचा न्हाई. चोराचा कायदा हाये. जा रं तूं. आपल्या त्या हेला बलावून आन.

**दवंडी** : व्हय आनतो. [ जाऊं लागतो ]

**चोर** : कुनाला आननार ?

**दवंडी** : हेला.

**चोर** : अरं हेला म्हंजी पाटलाला.

**दवंडी** : व्हयं, हेला म्हंजी पाटलास्नी. [ जातो ]

**चोर** : दिवानजी, तुम्हास्नी काय काय सांगितल्यालं हाये.

**दिवाणजी** : सीमेवर पहाऱ्याचं.

**चोर** : मग त्ये सोडून ह्यो वाचन्याचा गुन्हा का क्येला ?

**दिवाणजी** : का म्हणजे ? संरक्षण जमेना आणि वाचल्याशिवाय गमेना.

**चोर** : म हेच्यासाठनं तुमास्नी जेल.

**दिवाणजी** : लवकर पोचवा. इथनं सुटेन.

**चोर** : का कटाळा आला का ?

**दिवाणजी** : कंटाळा ? वात !

**चोर** : का ?

**दिवाणजी** : का काय ? पहाऱ्यावर बसणें हें काय माझें काम आहे ? शत्रु कोणता हें कळायला तर हवें ?

**चोर** : त्यो तुमास्नी कळत न्हाई ?

**दिवाणजी** : अहो, मित्र समजत नाहींत तिथं शत्रु काय समजावेत ? त्या सीमेवरच्या पहारेकऱ्यालाही अजून दिसले नाहींत.

**चोर** : व्हयं, आंधळाच हाये त्यो. आन तुमी पर. शत्रु कळाया पाहिजे कराया नगं शत्रू. पर कळाया होवा. तुमी चोरी करत न्हाई, करूं नगा पर कळाया होवी.

**दिवाणजी** : नाहीं कळत, नशीब.

**चोर** : आन म्हून तुमी पाऱ्यावरनं पळून आलां ?

**दिवाणजी** : लपून.

**चोर** : म्हंजी तुमी ही चोरी केली.

**दिवाणजी** : कोणती ?

**चोर** : तुमास्नी कळली न्हाई ती. पळून लपून आला ती. झाली नकळत पर झाली चोरी. ती अशीच नकळतच व्हत आस्ती. म्हंजी जगन्या-साठनं आपुन हवा आंत घीतू आन भाईर सोडतू का न्हाई ? नकळत तशी चोरी व्हत आस्ती. त्यो सोभाव. अवं, बराबर आतां बारा वर्सं— एक तप झालं. कदी रातचा डोळ्याला डोळा न्हाई.

( मास्तर येतो. त्याच्या खांद्यावर जाळे आहे. )

**मास्तर** : ( प्रवेश करून ) तपश्चर्याच. सिद्धपुरुषाचं लक्षण. भगवद्-गीतेत सांगितलंय.

**चोर** : काय सांगितलंय ?

**मास्तर** : एक तप रात्रीचा डोळ्याला डोळा नाहीं. म्हणजे अहाहा ! अहो, हे स्थितप्रज्ञाचं लक्षण. प्रत्यक्ष भगवंतांनीच सांगितलंय—

**या निशा सर्व भूतानां यस्यां जागर्ति संयमि ।**
**तस्यां जाग्रति भूतानी सा निशा पश्यतो मुनेः ।।**

**चोर** : काय म्हनला ?

**मास्तर** : सर्व भूतमात्र जाग्रत असतांना जे झोपलेले असतात, किंवा सगळे झोपतात तेव्हां जे जागे असतात ते संयमी, ते स्थितप्रज्ञ. ते आपण. ( नमस्कार करतो. )

**चोर** : उठा, उठा, पाया पडन्याचं कारन न्हाई. माज्या पायाला चिखली झालीया. खान्या पान्याचा हात चालत न्हाई. किती मासं आनलं ?

**मास्तर** : एकही नाहीं.

**चोर** : कां ?

**मास्तर** : अहो, का म्हणजे काय ? रात्रभर जाळं टाकून बसलो होतो पाण्यांत, पण वाळू जाळ्यांत आणि पाणी पाण्यांत जसं कांहीं वारं मिसळलं पाण्यांत. सकाळी उठून बघतो तर जाळं वाळूंत आणि पाणी आंत.

**चोर** : ह्यो आज तुमचा गुन्हा झालेला हाये.

**मास्तर** : पण मी असलं काम अद्याप केलेलं नाहीं.

**चोर** : करावं लागलं. जेला जे येत न्हाई तेलाच त्ये करावं लागलं. बरं का दिवानजी, येका दवंडीवाल्याचा बा माज्याकडं वशिला लावाया आल्याला व्हता.

**दिवाणजी** : वशिला म्हणजे ?

**चोर** : त्ये असतंया. नोकरीसाठी अर्जाला जोडावा लागतुया. तर त्येला क्येला दिवानजी. आतां ते काम त्येला जमंना. न जमना. काम करंल दवंडीवाल्याचं पर न्हानार दिवानजीच. तसं हाये. जेला जे येत न्हाई तेच तेला करावं लागंल. जावा, तुम्हीं जेलमधी जावा.

**मास्तर** : पण माझी पोरगी पळवण्याच्या हेतूनं वैऱ्याची माणसं—

**चोर** : लई आवाज करायचा न्हाई. चोराचा कायदा हाये.

**मास्तर** : मान्य आहे. जेलमध्यें जाऊन बसतों. पण आपली कृपा पाहिजे.

**चोर** : अहो, ती हाये. तुमी जावा बगूं. आमचं हेच्यासंगट जरा म्हत्त्वाचं काम हाये. [ मास्तर जातो. ]

**दिवाणजी** : म्हणजे चोरीचं ?

**चोर** : तेच कळावं लागतं. चोरी करू नका पर कळावी लागती.

**दिवाणजी** : म्हणजे — म्हणजे मी पळून लपून आलो ही चोरी झाली कां ?

**चोर** : हां, येकडाव कळाया होवं. बास. तसं तुम्हास्नी शत्रु कळाया पाहिजे.

**दिवाणजी** : हां, म्हणजे मी लेखणी घेऊन पहाऱ्यावर बसायचें शिवाय शत्रुमित्र कोण हें न कळल्यानं शत्रूनें आंत बेधडक घुसायचें.

[ दवंडीवाला येतो ]

( आंतून मंजुळा दारांत उभी आहे. पूजा करून आरतीची तयारी करून. )

**दवंडी** : पाटलांची आन वैऱ्याची लई बोलाचाली चाललीया. तेच्या— वैऱ्याच्या हातांत हत्यारं हाईत. पर आपलं गांवकरी आन पाटील निसतंच हुबं हाईत.

**चोर** : वाटाघाटी चालू ठिवा म्हनावं म्या येतुया म्हून सांग.

**दवंडी** : अवं, मास्तरची पोरगी पळवाया आल्याती त्ये.

**चोर** : ती गेल्यानंतर बगू. पाटलाची पोरगी कुठं हाये. तेंचं शिक्षन अजून पुरं हुयाच हाये !

**दवंडी** : न्हाई तेस्नी अद्याप ही वार्ता म्या सांगितल्याली न्हाई. मलाच अद्याप नीट कळल्याली न्हाई. ( आक्का चुपचाप बंदूक उचलते. दवंडीवाला तिला जायची खूण करतो. ) नुसतं हमरीतुमरीवर आल्याती. ( न्यायची नाही अशी खूण करतो. ) हत्याराला हात लावायचा न्हाई.

**मंजुळा** : कां ?

**दवंडी** : कायदा हाये. हइंसा.

**चोर** : काय झालें ?

**दवंडी** : बंदूक उचलू शकत न्हाईत. [ बंदूक ठेवून जाते. ] कायदा हाये हइंसा.

**चोर** : सक्य तो हेच्यानं मिटवा. आन म्या इस्तवर भांडनं चालू ठिवा. माझं हकडं चोरीचं काम आहे. जावा. [ दवंडी जातो. ] तवा दिवानजी, आमी ह्या आडगांवांत चोरी करन्यापायी आलो.

**दिवाणजी** : उपकार झाले आपले.

**चोर** : त्ये आमी मान्य केल्यालं हाये.

**दिवाणजी** : हेही उपकारच.

**चोर** : पर तसं मला कोन वळखत न्हाई.

**दिवाणजी** : वा ! आम्ही ओळखतोंना.

**चोर** : न्हाई. हात नगा जोडूं. तर त्ये आमी तुमास्नी शिकिवनार हाये. अरं, आपल्याला हतं चोरी करतां येत न्हाई. म्हारुती पाटलाच्या ताब्यांत देतुया. तवा तुमच्या तिजोरीतल्या पैक्यानं तुमच्या हातान सोत्ता पैक्याला हात न लावतां सोत्ताचा खिसा भरावा अशी माझी योज्ना हाये.

**दिवाणजी** : म्हणजे तुम्हीं माझ्याकडनं चोरी......

**चोर** : करून घिनार. शिकिवनार. लोकशेवेचं शिबीर हाये.

**दिवाणजी** : शिकवा. आलिया भोगासी...

**चोर** : तर तुमी असं कोन बगत न्हाई असं बगा.

**दिवाणजी** : आजूबाजूला ?

**चोर** : हां.

**दिवाणजी** : कोणी नाही.

**चोर** : त्या तिजोरीतली थैली काढा.

**दिवाणजी** : पैशाची ?

**चोर** : हां. ( दिवाणजी काढतो. ) खिशामंदी ठिवा.

**दिवाणजी** : खिसा म्हणजे ?

**चोर** : म्हणजे कपड्याला खिसा न्हाई ?

**दिवाणजी** : नाहीं. खिसा म्हणजे ?

**चोर** : म्हंजी कप्पा.

**दिवाणजी** : कप्पा, नाही. आमच्याकडं ते नाही.

**चोर** : समदा खुला कारभार. दाराला दारं न्हाईत. निसत्या चौकटी. तिजोरी उगडी ह्येच चूक हाये. पैक्याची किंमत तुमास्नी कळत न्हाई.

**दिवाणजी** : शिकवा.

**चोर** : त्येच चाललंया. तवा किंमत पैक्याची वाडाया होवी. मानसापरीस. तवा ती कळंल.

**दिवाणजी** : म्हणजे ?

**चोर** : म्हंजी तुमाकडली मानसं आपसांतलं येव्हार मानुसकीनं चालवत्यात. दोन मानसांचे एव्हार पैक्यानं व्हाया लागलं म्हंजी पैक्याची किंमत वाढंल. पैक्यापरीस मानुसकीची किंमत कमी करावी लागंल. म्हंजी मानुसकीचं अ व मू ल्य न झाल्याबिगार पैक्याची किंमत कळनार न्हाई.

**दिवाणजी** : कांहीं कळलं नाहीं.

**चोर** : अवमूल्यनाच्या येळी असं व्हतं. तर ते पैकं तुमी कमरंला खोचून ठिवा.

**दिवाणजी** : कां ?

**चोर** : अवं चोरी शिकायची हाये का न्हाई ?

**दिवाणजी** : आं ? हो. ( खोचतो ) झालं.

**चोर** : कुनाला बगूं द्यायाचं न्हाई. कुनी न बगतां झालं का, का झाली चोरी.

**दिवाणजी** : असं.

**चोर** : तर म्या आतां वडाच्या अंगाला जातो. तुमी ह्ये दुसऱ्याला शिकवा आन रक्कम तुमच्या हातनं मला द्या वडाच्या झाडाखाली. योजना. कारन म्या हात लावला तर मारुती मला पाटलाच्या ताब्यांत दील.

**दिवाणजी** : आणि पाटलांना कळलं तर ?

**चोर** : बोलायचं न्हाई. ते शिकवन्यासाठनंच आलेय म्या गांवांत. अवं त्येच्यासाठनं मला कबूल केल्याली न्हाई का रक्कम ?

**दिवाणजी** : मिळकत ?

**चोर** : मंग ?

**दिवाणजी** : पण ह्या मिळकतीनें माझ्या पोटाला भाजायला लागलंय. पोटांत पीळ पडतात.

**चोर** : असं हुतं सुरवातीला. सवं नसली म्हंजी तसं व्हतं.

**दिवाणजी** : मला काटा आल्यासारखं वाटतय.

**चोर** : जरा येळानं ताप यील.

**दिवाणजी** : असं कां ?

**चोर** : तर ? चोरी म्हंजी न्हानसान इद्या हाये का ? तपच्चर्या करावी लागती.

**दिवाणजी** : म्हणजे ही तपश्चर्या ? [ बहिणाई येते. ऐकते. ]

**चोर** : व्हयं, आन जरा येळानं थंडी भरून आली का, का मला रक्कम आनून देयाची वडाच्या झाडाखाली.

**दिवाणजी** : हो देतो.

**चोर** : पर अदुगर दुसऱ्याला शिकवायची.

**दिवाणजी** : आणि पैसे तुम्हांला आणून द्यायचे.

**चोर** : म्हंजी मग म्या जानार.

**दिवाणजी** : जाणार म्हणजे ?

**चोर** : जेलांत. उद्या इनिस्पेशन न्हाई का ? मंग माझा ठराव हाये. कान्ट्रॅट. ती रक्कम मला मिळाया होवी. जाऊं.

**दिवाणजी** : पण मला फार त्रास व्हायला लागलाय.

**चोर** : जरा सन करायचा.

[ जातो. तो गेलेला बघतो. कोणी बघत नाहीं असें बघतो आणि दिवाणजी कमरेचे पैसे काढतो. परत तिजोरीत ठेवतो. आणि सुस्कारा सोडून मारुतीच्या पायाशीं बसतो. धर्मा येतो. ]

**धर्मा** : कां दिवानजी, आज खूस ?

**दिवाणजी** : आतां खुशाल आहे.

**धर्मा** : का ?

**दिवाणजी** : चोरी शिकलो.

**धर्मा** : खरं ? ( जवळ बसून )

**दिवाणजी** : अवघड विद्या आहे. हे बघ कुणी बघत नाहीं असं बघ.

**धर्मा** : आपनाकडं ?

**दिवाणजी** : हो. आणि तिजोरीतली रक्कम काढ.

**धर्मा** : पर मला आतां नगं हाये.

**दिवाणजी** : तरी काढायची. ती कमरेला खोच.

**धर्मा** : कमरेला ?

**दिवाणजी** : कमरेला खोच. खिसा नाही, कमरेला खोच. जरा वेळानं तिथं भाजायला लागेल, मग काटा येईल. मग ताप भरेल. मग मी इथनं जातो. मग मी गेल्यावर थंडी भरून' आली की तू ही रक्कम परत तिजोरीत ठेव. हें यातलं महत्त्वाचं, कोणी बघत नाहीं, असं बघून. त्याला चोरी म्हणतात.

**धर्मा** : मंग ह्येच्यांत नवं का हाये ? आपुन रोजच पैकं घेतो आन ते परत ठिवतो.

**दिवाणजी** : परत ठेवतो ? हां परत ठेवणं ही माझी सोय झाली. ते ठेवायचे नाहींत.

**धर्मा** : मंग ?

**दिवाणजी** : नेऊन द्यायचे चोरांना.

**धर्मा** : आन न्हाई निवून दिले तर ?

**दिवाणजी** : जेलमध्यें बसावें लागेल.

**धर्मा** : चालंल.

**दिवाणजी** : पण चोराच्या परवानगीवाचून परत उठता येणार नाहीं तिथून.

**धर्मा** : का ?

**दिवाणजी** : कायदा आहे.

**धर्मा** : पण गावांचं पैसं चोराला का द्येयाचं ?

**दिवाणजी** : माणुसकीचं अवमूल्यन केल्याशिवाय पैशाची किंमत वाढणार नाहीं.

**धर्मा** : ते काय मला कळलं गाहीं.

**दिवाणजी** : तें काय मलाही कळलं नाहीं. पण ती चोराची भाषा आहे.

**धर्मा** : मंग, तुमी काय करणार ?

**दिवाणजी** : मी जेलमध्यें जाणार.

**धर्मा** : का ?

**दिवाणजी** : का म्हणजे गांवाचा पैसा चोराला द्यावा असं मला नाहीं वाटत.

**धर्मा** : मग मलाबी न्हाई वाटत. (पैसे परत ठेवतो)

**दिवाणजी** : जेलमध्यें जावं लागंल.

**धर्मा** : जाईन. गांवाचा पैका चोराला देन्यापरीस सोता जेलमधी बसन.

**दिवाणजी** : तिथं काय करणार ?

**धर्मा** : रामायन म्हनत बसनार. आपलं रामराज्यं व्हावं म्हून. पाटलानीच सांगितलंय. पहिल्यांदा.

**बहिणाई** : समदं जाऊन जेलमंधी बसा. आन रामायन म्हना. आन गांवाच्या आयाभनी जाऊन बसूं देत वैऱ्याच्या घरांत.

**धर्मा** : जवळ हत्यार न्हाई, काय करावं सांगा. जेलमधी जायचं नसलं तर धन चोराची करायची असं व्हतं आन न्हाई म्हनलं तर कन्या परक्याची व्हती.

**दिवाणजी** : म्हणजे वैऱ्याची. मारतरची मुलगी.

**मंजुळा** : ती हुनार न्हाई. आन जेलमधी बी न्हायाचं न्हाई. आन पैका चोराला देयाचा तो आबा तेला जिम्मदार तेच ते बगून घेत्याल. तेला धन देन्याची काळजी तुमास्नी करन्याचं काम न्हाई.

**धर्मा** : म्हणजे हे पाटलाचं धन झालं.

**दिवाणजी** : म्हणजे हें गांवाचें धन नाहीं.

**मंजुळा** : गांवाचं धन हाये समदं आमी. त्ये धन जाऊ दे आई. हे धन न्हायलं तर ते धन यील. गाव न्हाऊ दे. गांव चाललंया वैऱ्याच्या ताब्यांत. हितं धनाचं मोल हाये कुनाला ?

**बहिणाई** : काय बोलतीयास पोरी ?

**मंजुळा** : म्या पाटलाची पोरगी बोलतीया. मला पर कायदा कळतोय. मानसापरीस धन मोठं न्हाई. मातीपरास मानूस मोठी न्हाई. इज्जतीशिवाय मातीला मोल न्हाई. मातीची इज्जत चाललीया आई वैरी घुसलाया गांवांत. धनाच्या काय गोटी ? मातीतून मानूस जल्माला येतो. जल्मभर मातीचंच धन करतो. आन आखरीला सोत्ता मातीचं धन होतो. धनाच्या काय गोटी.

**बहिणाई** : इक्तं ग्यान तुला कवा अलं गं पोरी—टेंबलाई.

**मंजुळा** : इक्तंदी तुमीच गांवांत नव्हतां म्हनत वव्वा ? आता आजी-बाई म्हटलं तर राग यील ?

**बहिणाई** : त्या वव्वा ?

**मंजुळा** : ते धन चोराला नीऊ दे. पर पहिलं गांवाचं धन राखू. मातीचं धन राखू. अदुगर समदं वैऱ्यावं चला. ए धर्मा.

**बहिणाई** : शानी हायेस पोरी.

**दिवाणजी** : चलायचें खरें. पण हत्यारें ? (हत्यारं हत्यारं अशी कुजबूज. सगळेजण हत्याऱ्याचं कडं बघतात. आणि दोन दोन फुलं वहातात.)

**बहिणाई** : आत्तारं, आज बलिप्रतिपदा हाये न्हवं ?

**दिवाणजी** : आज नाहीं हत्यारे उचलायची.

**मंजुळा** : का ?

**दिवाणजी** : इनिस्पेशन उद्या आहे.

**बहिणाई** : त्येच म्हनलं मी, तंवर कायदा हाये. चोर जेलांत न्हाईलं तर पाटीलकी न्हानार तुज्या बाची. मग आतां ग पोरी ?

**मंजुळा** : म्हून म्या म्हनलं आई तुमी शिरपतीला सांगा.

**बहिणाई** : म्या सांगनार न्हाई. इक्ता कौतिकाचा आसंल तर जा जाऊन सांग सोत्ता. मोठी आली कौतिकाची कमळी !

**मंजुळा** : न्हाई. माज्यासंगट तो बोलत न्हाई. रागावल्याला हाये माज्यावं.

**बहिणाई** : का भांडाया झालं ?

**मंजुळा** : कुणाला ठावं ? म्या चोरून पिरेम कराया शिकले का न्हाई त्या चोरावं.

**बहिणाई** : चोरून पिरेम म्हंजी ?

**मंजुळा** : तर म्या त्येला सांगितलं. का आसं आसं म्या करती पिरेम. चोरावं, चोरून, म्हून. तवाधरनं बोलत न्हाई. म्हून म्हनलं. तुम्ही सांगा शिरपतीला. त्येच्या हातांत बंदूक हाये.

**बहिणाई** : म्या सांगनार न्हाई. आसली पाटलाला गरज तर दील आवातनं सोत्ता.

( पाटील, बाजूला, गुणा, एका बाजूला दवंडीवाला
पाठोपाठ आंधळा– येतात. )

**पाटील** : म्हंजी ? गरज मला येकल्यालाच हाये म्हना की गावाची.

**वहिणाई** : का झालं रं आबा ?

**पाटील** : जो येतुया तो मलाच म्होरं घालतुया.

**आंधळा** : आर पर आज मारुतीकी आरतीबिरती कुछ करनेका हाये क्या नहीं.

**पाटील** : माजी कर.

**आंधळा** : ऐसा क्या बोलता है रे देवादीक बारेमें.

**पाटील** : आरं हणमंताचं वळ गेलंय हरवून, आनि आरती कसली करतोया तेची ? आंधळ्या, आरं तुला गांवांतली काय वार्ता हाये का न्हाई ?

**गुणा** : पाटील, आमच्या पैक्याचं ?

**पाटील** : आरं गप, बाईच कळ काढ की, उद्यां इक्ता इनिस्पेशन हूं दे. मग आपलंच हाये.

**आंधळा** : सत्ता.

**पाटील** : तू गप रं.

**गुणा** : पर मला आज चोरास्नी पैकं नेऊन द्याया होवं.

**पाटील** : का ?

**गुणा** : तेनी मला तसं शिकिवलंया.

**पाटील** : म्हंजी ?

**गुणा** : माज्या वाट्याचं पैकं हाये का न्हाई ? त्ये म्या तेला द्यायाचं, चोराला. आन बरं का धर्मा, तुज्या वाटंचं धान्य हाये का न्हाई ते त्वां निऊन द्यायाचं चोरास्नी.

**धर्मा** : का ?

**गुणा** : म ते पैक्याच कसं ?

**धर्मा** : म माझी गाडी धान्याची ?

**गुणा** : ( हंसतो ) वैऱ्यानं नेली.

**मंजुळा** : म आबा, ह्येस्नी कोठारांतलं धान्य द्या.

**पाटील** : कोठारांत धान्य न्हाई.

**धर्मा** : न्हाई ?

**दिवाणजी** : म्हणजे ?

**बहिणाई** : न्हाई म्हंजी ?

**मंजुळा** : धान्य न्हाई कोठारांत ?

**पाटील** : अवो, ती वैऱ्याची पोरं तीस-चाळीस मानसांचं टोळकं आल्यालं व्हतं. काठ्या घिवून. का दुष्काळ पडला का काय त्येच्या गांवांत कळंना. पण मागून घ्यावं. पर काठ्या न फरशा कशापायीं आनाव्या ?

**गुणा** : येका दोघाजवळ बंदुका बी व्हत्या म्हनं.

**पाटील** : आन माझा बी विलाज चालंना. बंदूक हातांत घिता यीना. कायदा झालाया. म्हून म्हनलं खायाची वस्तु हाये घ्या म्हनलं.

**मंजुळा** : आन उंद्या आपल्या लोकास्नी खाया न्हाईलं न्हाई तं ?

**पाटील** : इक्ती इनिसपेशन हूं दे. जेलमंदी चोर न्हाईला का म्या पाटील झालोच, मग आनतो धान्ये.

**आंधळा** : लेकिन इतने वक्त तक गांवमें कुछ रहेगा तो नां ? आबा, अब ये सत्ताका लोभ छोड.

**पाटील** : आरं लोभ न्हाई आंधळ्या, तेच कायद्यानं जरूरी हाये.

[ बहिणाई जाते. ]

**मंजुळा** : पण आबा, तुमी मास्तराच्या घराकडं गेला व्हता न्हाई ?

**पाटील** : का ? काय झालंय ?

**मंजुळा** : कारं भाऊ ? ( दवंडीवाल्याला )

**दवंडी** : न्हाई. मघाशीं म्या सांगितलं तवा मला कळल्यालं नव्हतं.

**मंजुळा** : मास्तराच्या घरावं टोळकं आल्यालं.

**दवंडी** : त्ये न्हवं. पाटील ग्येल्यालं.

**मंजुळा** : म त्वां तसं का सांगितलं ?

**दवंडी** : मला ह्येस्नी बगितल्यागत वाटलं. पर छ्या, छ्या ह्ये ते नसनार. हातात बंदूक नव्हती. वैऱ्यानं पोरीचं—म्हणजे मास्तरांचं घर पेटिवन्याची

तयारी केली तवा कोन तरी डोळं पुसत. आल्यागत म्या पाहिलं पर ह्ये ते नसनार. पाटील रडत्याल कसं ? म्हून म्हनलं. मला वाटलं पर ह्ये ते नसनार.

**मंजुळा** : म्हंजी, आबा, घर पेटिवलं मास्तराचं ? ( जायला निघते. )

**पाटील** : तुमी कुठं निगालाय आक्का ?

**मंजुळा** : आक्षित उधळून येतो अंबूच्या डोक्शावं. आज थंडी लई हाये. बलिप्रतिपदा हाये बळ गेल्या हातातलं. हात दुबळ झाल्याती. जरा शेकून येतो. मास्तराचं घर पेटल्यालं आसंल न्हवं ?

**आंधळा** : अरे पर, वो मास्तर किदरको हाये ?

**दिवाणजी** : जेलमध्ये आलेत.

**आंधळा** : मास्तरके घरको आग लगी और मास्तर जेलमेंच. सब पागल हुये क्या ? मैं छोड देता उसको.

**दिवाणजी** : सोडवून कशाला आणायला हवें ? आपल्या मनानेंच आलेंत.

**आंधळा** : मनकीच कैद. और मनच कैदी. फिकीर नहीं करनेकी ( मागं वळून ) मारुतीके पिछू कौन है रे ?

**बहिणाई** : मी हाये. दम रं आंधळ्या, मला बी घिवून चल संगट. देशकाल बरा न्हाई. मला जरा शीमेपावतूर सोड, कापडं हायती शिरपतीची. म्हाताऱ्या काटीला आंधळ्याचा आधार. ( जातात. )

**धर्मा** : धान्याचं कोठार गेलं. मास्तराची पोरगी—

**गुणा** : जाया, न्हाइं पायजे पाटील. कुऱ्हाड घ्यावी का ?

**पाटील** : येक विलाज हाये. ए पोरा, येक काम कर, त्या शिरपतीला सांग, तो आनंल त्या पोरीला परत. नेली आसली तर. माजा सांगावा हाये म्हून सांगूं नगं. माजाला यील. तर तेनं काय हातांतली बंदूक टाकल्याली न्हाईं. त्यो काय या आडगांवच्या कायद्यात न्हाई. म्हंजी कायदा पर पाळला आन पोरगी पर सुटली. मनगटाचा बळकट येकाला भारी हाये. वैऱ्याच्या पुऱ्या पिढीला. जावा, जाऊन तेला सांगावा सांग. माजा सांगावा हाये म्हून सांगूं नगं. ( दिवाणजीकडं बघत ) म्या आसं शोधतोय. जावाई पारखावा लागतोय. आरं दिवानजी. माझं येक काम कर. कोन बगत न्हाई आसं बग. आन पानी न घातल्यालं येक पावशेर घिऊन ये माज्यासाटनं, दूध.

**दिवाणजी** : आणि वास आला तोंडाला तर ?

**पाटील** : आरं न्हाई येत. ह्येच्या अदुगर कुठं येत व्हता ?

**दिवाणजी** : पण आतां कायद्यानें येतो. परंतु त्याला गोठ्यात निघणाऱ्या दुधाचा वास त्याला अंगणांत येतो.

**पाटील** : मग भाईरल्या अंगाला शेणसडा ठाक. म्हंजी दुधाचा वास मरंल, जा. [ जातो. ]

**धर्मा–गुणा** : उद्यां इनिसपेशन हाये. त्या चोराला परसन्न ठेवाया होवं. द्या नेऊन पैकं. तिजोरीतलं.

[ दोघेही तिजोरीशीं जातात. ]

**पाटील** : कारं दिवानजी ? हे म्हंजी– चोराच्या न कळतां झालं कां ? म. आतां हे कसं झालं ? म्हंजी चोरी झाली. म्हंजी जेलमंधी जाऊन बसावं लागलं का ?

**दिवाणजी** : तुम्ही कुठेही बसा मी दूध घेऊन येतो !

**गुणा** : ( तिजोरीशीं गेल्यावर ) पाटील, आंत काय न्हाय.

**पाटील** : काय न्हाय म्हंजी ?

**धर्मा** : आंत पैकं न्हाईत.

**पाटील** : न्हाईत म्हंजी ? छ्या, छ्या, आसं कसं हुईल ? ( पाटील मागं जाऊन बघतो. )

**ह्याच्या आधी लांब कुठं तरी एक तिजोरी गांवासाठीं ।**
**समद्या गांवाची सत्ता ।।**
**पैक्यावरती समद्यांची अन कुना न्हाई**
**एकाची सत्ता ।**
**अन्नाधान्याची पोटापान्याची न्हवती कुनाला चिंता**
**पर भलं कुनाचं जगा बघवलं ? अनुभवलं का कुनी**
**आन आडगांवाची ऐका रसिकहो, गोष्ट घालतो कानी**
**नीट ध्या कानी । चित्त देहोनी । चित्त देहोनी । चित्त देहोनी ।।**

( कुठं तरी लांब कानावर रेंगाळत असतं– बॅक ग्राउंड म्युझिकसारखं ! )

**पाटील** : म्हंजी पैकं काय झालं रं धर्मा ?

**धर्मा** : मला काय ठावं ?

**पाटील** : आन त्वारं गुना ?

**गुणा** : आमी दोगं संगतीनंच हाये, अक्कासाब.

**धर्मा** : मंजुळाक्का ?

**पाटील** : मंजू, मंजे, का झालं पोरी ?

**मंजुळा** : आबा, मास्तराची अबू नेली.

**पाटील** : आं ?

**मंजुळा** : वैऱ्यानं नेली. फरफटत नेली. खाटकानं गाय न्यावी का न्हाई तशी न्हेली. वरडत होती. समदी मानसं निस्ती लांबनं बघत्यात. ज्येच्या नांवानं साद घालावी तिनं—तिची आन तिची नदरानदर झालीच तर बगनारानं लाजंनं सोत्ताच्या पायाकडं नदर लावावी पर तिला सोडवाया जाऊं न्हाई. अशी न्हेली. मास्तराची अंबू न्हेली आबा. अंबू माझी भन व्हती. ती वगा. ती बगा वराडतीया. मला कोन तरी सोडवा. वैऱ्याच्या हातनं मला कोनतरी सोडवा म्हून वरडतीया. बघितलं म्या, भरल्या डोळ्यांनी वघितल, रडून रडून डोळ्यांतलं पानी वाळलं. वाळलं न्हाई जळलं. मानसा-सारखी मानसं डोळं उगडं ठिऊन बगत्यात. आन वैऱ्याची मानसं पोरी पळवून नेल्यात. का रं धर्मा ? ए गुणा, ए धर्मा, आरं कुऱ्हाडी उचला. मास्तराची पोरगी घिऊन चाललीया वैऱ्याची जात आन आजून आग पेटत न्हाई तुमच्या काळजांत.

**गुणा** : हत्यार घिऊ दे.

**धर्मा** : पाटलास्नी हां म्हनू दे.

**पाटील** : व्हय्. ते तुमचं धंदं ठावं हायती आमास्नी, आन तेच्या-साठनंच ह्यो हत्याराचा कायदा क्येलेला हाये. ही तुमची फळी उबी करन्याची वार्ता आमाला आल्याली हाये. हत्याराला हात लावायचा न्हाई.

**मंजुळा** : म आबा तुमी बंदूक उचला.

**पाटील** : आमास्नी उचलता येत न्हाई.

**मंजुळा** : का व्हील ? पाटीलकी जाईल. कसली पाटिलकी आबा सोडा. ही येका जल्माची पाटीलकी जाईल. पर मास्तरची पोरगी सोडवून आनली तर म्होरल्या सा जल्माची पाटीलकी येईल.

**पाटील** : न्हाई आमास्नी येव्हार कळल्यात. म्या या गांवाचा पाटील हाये. मला पाटिलकी टिकवावी लागंल गावाच्या कल्यानासाठनं.

**मंजुळा** : तुमास्नी सत्तेचा लोब सुटला आबा.

**पाटील** : कुनाम्होरं बोलतीयास ?

**मंजुळा** : बा म्होरं ल्येक. न्हाई म्हना.

**पाटील** : मला लोब हाये गांवाचा.

**मंजुळा** : मग गाव वाचवा. बंदूक उचला.

**पाटील** : कायद्यानं हात लावतां येत न्हाई. आता ह्या येड्या पोरीची कशी समजूत घालावी. आवं आक्कासाब, तुमच्या म्हनन्या परमानं आम्ही उडी घेतली वैऱ्याच्या अंगावं आन् आमचं कांही काय येडं वाकडं झालं ! ( मंजुळा हंसते ) अवो, तुमाला हंसण्यासाठनं म्या बोलल्यालो न्हाई. दुख व्हावं म्हून बोललो.

**धर्मा** : का हुईल ?

**गुणा** : आमी न्हाय मागं ? तुमी बंदूक उचलल्यावं आमी कुऱ्हाड ठिवनार हाये व्हयं ?

**धर्मा** : कोन ठिवनार ?

**पाटील** : ह्ये आलं जातीवं.

**मंजुळा** : आन आबा तुमी मरनाला डरतां ?

**पाटील** : आरं हूंः ! पर समजा झालं. माज्यानंतर कोन ? ( धर्मा व गुणा हसतात. )

**मंजुळा** : ते तवाचं गांव बघून घील. पर आता तुमी हाये. हे गांव खाईत का घालतां ? तुमी राखनदार हाये न्हवं ? बंदूक उचला.

( पाटील थंड उभा राहतो. )

**मंजुळा** : मग अंबूला सोडविनारं कोन न्हाई ?

**पाटील** : जरा दम धरा. माझं डोक्सं चालंना झालंय. परथम त्या चोरांचा सल्ला घिऊ. जारं तेस्नी जरा बुलावून आन. तेस्नी इनंती कर. का आमी आडचनीत हाये. आन वाटाघाटीची विच्छा हाये.

**गुणा** : व्हय. चोरास्नी इनंती करतो. ( गुणा जातो. )

**मंजुळा :** मग तुमी आमचं म्हननं न्हाई ऐकतं आबा ? समदा गांव तुमच्याकडं आशेनं बगतोय. तुमी जर पाखर घालायची न्हाई तर अंबूनं इचारायचं कुनाला ?

**दिवाणजी :** (पालथा रिकामा गलास घेऊन किंवा लोटी ! प्रवेश करतो.) चोराला.

**पाटील :** काय ते ?

**दिवाणजी :** दुधांत पाणी का घालायचें तें ? पाण्याशिवाय थेंबभर दूध मिळेल तर शपथ ! सगळीं घरें फिरलों पण दूध बंद.

**पाटील :** का ?

**दिवाणजी :** पाण्याशिवाय दूध विकायची बंदी आहे. आणि नियमाप्रमाणें बघायचें तर कांहींजणांनीं धाराच काढायच्या सोडल्या, दुधांत पाण्याची सक्ती झाल्यापासून.

**पाटील :** लई कायद्याच्या भाईर वागत्यात. (बॅकग्राऊंडला लहान आवाजांत– **विश्वास असावा चोरांचा– हा गांवच अवघा सावांचा ।**)

**मंजुळा :** पोरगी वैऱ्याच्या ताब्यांत आन् बा जेलांत. हे तेच्या कायद्यात बसतं आबा ?

**पाटील :** तेच्या बसतं.

**मंजुळा :** कंच्या ?

**पाटील :** सम्ता. खालला वरला भेद न्हाई.

**दिवाणजी :** बरोबर. मास्तरला म्हसे मारतां येत नाहींत हा गुन्हाच. तो आंधळाहि गेला जेलांत. पहारेकरी. सीमेचा. नेहमीच्या संवयीनं सांगत गेला शत्रू आला शस्त्रे उचला. गेला जेलांत. कायदा मोडला गेला मध्यान्हीच्या भावांत गेला.

**पाटील :** म्हंजी ?

**दिवाणजी :** मध्यान्हीचा आंत नाहीं. बसा जेलांत. दुपारची भाकरी मध्यरात्रीची झोप यावर बंधन नाहीं. पण तिजोरीचा संबंध संपला. ती चोराच्या मालकीची. [ गुणा प्रवेश करतो. ]

**गुणा :** जोपावतर माझी मिळकत मला मिळत न्हाई, म्या काय कुनाचा बांधल्याला न्हाई. असं म्हनत्यांत त्ये चोर.

**धर्मा :** म्हंजी ते येत न्हाई. म्हनत्यात ?

**गुणा :** येत न्हाईत.

**धर्मा :** म आमच्या धान्याचं ?

**गुणा :** आमचं पैकं ?

**मंजुळा :** अंबूला नेऊं दे वैरी ? आबा.

**पाटील :** हतं लक्ष्मी हरविली हाये गांवाची तिचं रक्सन करता ईना.

**मंजुळा :** गदा काढून ठिवा मारुतीच्या हातांतली—चांगलं रक्सन हुईल.

**पाटील :** पोरासोरांनो या बाबतीत डोक्सं घालायचं काय कारन न्हाई ! आपल्या आकलंबाहेरची झेप घिऊं न्हाई मानसानं. पाटीलकी तुमच्या सुपूर्त केल्याली न्हाई गांवाची. मला कायदा कळतोय कौतिक कळत न्हाई. गांवानं डोक्शावं बशिवली आसंल माझ्या डोक्शावं जागा न्हाई.

**मंजुळा :** ( हुंदके देते )

**आंधळा :** ( प्रवेश करतो ) उधर कैसे होती— उधर बैठी सत्ता.

**मंजुळा :** अंबू गेली, मास्तरांची अंबू वैऱ्यानं नेली. म्या लई सांगितलं. पर आबा तिला परत न्हाई आनत.

**आंधळा :** उगी, उगी रहनेका बेटी. लई रोनेको नहीं. पूस, आंख पूस. क्या चला है रे आबा.

**पाटील :** आं ? काय न्हाय ? मला काय ठावं न्हाई. अवं, अवं, आक्कासाब रडाया काय झालं ? काय डोळ्याला पानी आनन्याचं कारन न्हाई. आसला काय आवगाड परसंग घडल्याला न्हाई.

**मंजुळा :** अंबू गेली तरी अवघड परसंग न्हाई घडल्याल तुमास्नी कुणाबद्दलच पिरेम न्हाई आबा, गांवाचं न्हाई. बहिणाईचं न्हाई. पाटिलकीशिवाय कोनाचं न्हाई. सोत्ताच्या पोरीचं सुदीक न्हाई.

**पाटील :** व्हयं न्हाई. तुमच्यावं आमचं पिरेम न्हाई. म्हूनच आमी शिरपतीला सांगावा धाडलाया का तू आमच्यासाठनं हत्यार उचल.

**मंजुळा** : तुमी धाडलाया निरुप ? तुमी शिरपतीला ? आबा ? तुमी आबा ?

**पाटील** : व्हयं. म्या आबाच, बाच तुझा. मला काळीज न्हाई. पिरेम न्हाई. आरं मला कुनी समजून घ्या. जरा इत्ती इनिसपेशन हूं दे. [ दवंडीवाला येतो ] का म्हनला रं शिरपती ?

**दवंडी** : ( प्रवेश करतो ) न्हाई म्हनला.

**पाटील** : काय न्हाई म्हनला ?

**दवंडी** : गांवाचा माझा काय संबंध न्हाय म्हनला. पाटलाची पोरगी चोरून पिरेम करती चोरावं. आसं तिनंच सांगितल्यालं हाये. तवा चोराला सांगा. आडगांवासाठनं माझं हत्यारं मला उचलन्याचं कांहींच कारन न्हाई. असं म्हनत एकलाच बसलाय बांधावं. दाढी वाढवून.

**पाटील** : आसं म्हनला शिरपती ?

**दवंडी** : व्हयं, ह्ये म्या ऐकल्यालं हाये सोत्ता.

**मंजुळा** : तेला जाऊन माझा सांगावा सांग, माज्याम्होरं तुला गांवाची किंमत नसंल तर गांवाम्होरं मला तुजी न्हाई. पहिलं गांव, मंग शिरपती. बस म्हनावं माज्या नांवाची जपमाळ घिऊन.

**बहिणाई** : तेला माझाबी सांगावा सांग. म्हनावं आईला लाज आनलीस, बहिनाईचा पोरगा आजधरनं तिला मेला. पाटलाची पोरगी आज म्या माझा पोरगा न्हून मांडीवं घेतली.

**पाटील** : मने, तो तुझा ल्येक हाये. जन्मदात्रीला भोवला तेला नेक म्हनू न्हाई ! धरित्रिला इसरला तेला लेक म्हनू न्हाई !

**मंजुळा** : आई तुमी रागावला न्हाई.

**बहिणाई** : बहिनाईचा पोरगा आजधरनं त्येला मेला, पाटलाची पोरगी गांवची लक्ष्मी म्हून आजधरन म्या मांडीवर घेतली. घे आई ही बंदूक आन सोडवून आन मास्तरची पोरगी.

**मंजुळा** : आई, पाटील.

**पाटील** : बंदुकीला हात लावायचा न्हाई.

( पाटील पुढे येऊन खाली खोल वाकून बघतो. )

**आंधळा** : आबा, है किधरकू ? ( त्याच्याजवळ येऊन ).

**पाटील** : काय झालं रं ह्ये ? समदं गांव उरफाटं जाया लागलंय.

**आंधळा** : फिकर नहीं करनेकी, बोल्या नहीं क्या ?

**पाटील** : आरं माझी आक्का जावी बंदूक घिऊन ? आन माझी मर्दाची दातखीळ बसली न्हावी ? मला मर्दाला त्या भईनाईनं काकनं भर म्हून सांगावी ? कोठारांत धान्ये न्हाई. तिजोरीत पैका उरल्याला न्हाई. डोळ्याला डोळा देत नव्हता वैरी. तो तोंडाला तोंड देऊन बोलाया लागलाय बंदूक ठिवल्याधरनं. तुला काय सांगू आंधळ्या. दिवसा ढवळ्या येकांच्या मुंगसागत त्वांड खुपसून बसावं वाटतंय येकांच्या वावरांत. हातातली हत्यारं काढून ठिवल्याधरनं मनगटाची चिपाडं झाल्याती. थूः थूः पाटला, तुज्या असल्या नामर्दाच्या जिनगानीचं ? ( तोंडांत मारून घेतो. )

**आंधळा** : ए पागलपन क्या चला है आबा, आंख पूछ.

**पाटील** : तुला न्हाई कळनार.

**आंधळा** : इतने दिन साथ साथ हंसते खेलते बीते. पुढापेमें रोना आया तो एकमेकके आंसू बी नहीं पूछनेके क्या ? मैं जाता. और जाके बोलता हूँ वैरीको. आपनेच है वो. आपनेच बच्चे. जरा थोडा चोरने बिगाडा है. नहीं तो वो अच्छेच. मैं जाके बोलता हूँ उनको शांतीसे रहनेको. तेरी पाटीलकी आते वक्त तक, वापशीमे. फिर चलने दो हमेशाका झगडा. गुणाका और धर्माका.

**दिवाणजी** : शांतीचा संदेश द्यायला जा पण परत या.

**आंधळा** : आरे वो वैरी क्या करता है रे आपनेको ? डरपोककी अवलाद. मंजुळा गयी है ना ? आपनी बुद्धी गयी है ना ? बहिनी ? उसकी काठी काफी उनको. इतने तक माग भी गये होंगे.

**पाटील** : तुजंच गांव हाये ना रं त्ये ?

**आंधळा** : हां ग्यानेश्वरीका मतलब चोर एक बोलता. बहिणी एक बोलती. बलभीम किसको कैसी बुद्धी देता कुछ बोलनेको आतां है क्या ?

**मंजुळा** : तुमी धाडलाया निरुप ? तुमी शिरपतीला ? आबा ? तुमी आबा ?

**पाटील** : व्हयं. म्या आबाच, बाच तुझा. मला काळीज न्हाई. पिरेम न्हाई. आरं मला कुनी समजून घ्या. जरा इक्ती इनिसपेशन हूं दे. [ दवंडीवाला येतो ] का म्हनला रं शिरपती ?

**दवंडी** : ( प्रवेश करतो ) न्हाई म्हनला.

**पाटील** : काय न्हाई म्हनला ?

**दवंडी** : गांवाचा माझा काय संबंध न्हाय म्हनला. पाटलाची पोरगी चोरून पिरेम करती चोरावं. आसं तिनंच सांगितल्यालं हाये. तवा चोराला सांगा. आडगांवासाठनं माझं हत्यारं मला उचलन्याचं कांहींच कारन न्हाई. असं म्हनत एकलाच बसलाय बांधावं. दाढी वाढवून.

**पाटील** : आसं म्हनला शिरपती ?

**दवंडी** : व्हयं, ह्ये म्या ऐकल्यालं हाये सोत्ता.

**मंजुळा** : तेला जाऊन माझा सांगावा सांग, माज्याम्होरं तुला गांवाची किंमत नसंल तर गांवाम्होरं मला तुजी न्हाई. पहिलं गांव, मंग शिरपती. बस म्हनावं माज्या नांवाची जपमाळ घिऊन.

**बहिणाई** : तेला माझाबी सांगावा सांग. म्हनावं आईला लाज आनलीस, बहिनाईचा पोरगा आजधरनं तिला मेला. पाटलाची पोरगी आज म्या माझा पोरगा न्हून मांडीवं घेतली.

**पाटील** : मने, तो तुझा ल्येक हाये. जन्मदात्रीला भोवला तेला नेक म्हनू न्हाई ! धरित्रिला इसरला तेला लेक म्हनू न्हाई !

**मंजुळा** : आई तुमी रागावला न्हाई.

**बहिणाई** : बहिनाईचा पोरगा आजधरनं त्येला मेला, पाटलाची पोरगी गांवची लक्ष्मी म्हून आजधरन म्या मांडीवर घेतली. घे आई ही बंदूक आन सोडवून आन मास्तरची पोरगी.

**मंजुळा** : आई, पाटील.

**पाटील** : बंदुकीला हात लावायचा न्हाई.

( पाटील पुढे येऊन खाली खोल वाकून बघतो. )

**आंधळा** : आबा, है किधरकू ? ( त्याच्याजवळ येऊन ).

**पाटील** : काय झालं रं ह्ये ? समदं गांव उरफाटं जाया लागलंय.

**आंधळा** : फिकर नहीं करनेकी, बोल्या नहीं क्या ?

**पाटील** : आरं माझी आक्का जावी बंदूक घिऊन ? आन माझी मर्दांची दातखीळ बसली ऱ्हावी ? मला मर्दाला त्या भईनाईनं काकनं भर म्हून सांगावी ? कोठारांत धान्ये ऱ्हाई. तिजोरीत पैका उरल्याला ऱ्हाई. डोळ्याला डोळा देत नव्हता वैरी. तो तोंडाला तोंड देऊन बोलाया लागलाय बंदूक ठिवल्याधरनं. तुला काय सांगूं आंधळ्या. दिवसा ढवळ्या येकांद्या मुंगसागत त्वांड खुपसून बसावं वाटतंय येकांद्या वावरांत. हातातली हत्यारं काढून ठिवल्याधरनं मनगटाची चिपाडं झाल्याती. थूः थूः पाटला, तुज्या असल्या नामर्दाच्या जिनगानीचं ? ( तोंडांत मारून घेतो. )

**आंधळा** : ए पागलपन क्या चला है आबा, आंख पूछ.

**पाटील** : तुला ऱ्हाई कळनार.

**आंधळा** : इतने दिन साथ साथ हंसते खेलते बीते. पुढापेमें रोना आया तो एकमेकके आंसू बी नहीं पूछनेके क्या ? मैं जाता. और जाके बोलता हूँ वैरीको. आपनेच है वो. आपनेच बच्चे. जरा थोडा चोरने बिगाडा है. नहीं तो वो अच्छेच. मैं जाके बोलता हूं उनको शांतीसे रहनेको. तेरी पाटीलकी आते वक्त तक, वापशीमे. फिर चलने दो हमेशाका झगडा. गुणाका और धर्माका.

**दिवाणजी** : शांतीचा संदेश द्यायला जा पण परत या.

**आंधळा** : आरे वो वैरी क्या करता है रे आपनेको ? डरपोककी अवलाद. मंजुळा गयी है ना ? आपनी बुद्धी गयी है ना ? बहिनी ? उसकी काठी काफी उनको. इतने तक माग भी गये होंगे.

**पाटील** : तुजंच गांव हाये ना रं त्ये ?

**आंधळा** : हां ग्यानेश्वरीका मतलब चोर एक बोलता. बहिणी एक बोलती. बलभीम किसको कैसी बुद्धी देता कुछ बोलनेको आतां है क्या ?

(बॅक ग्राऊंडला 'मानवा हो ढोंगी सैतान–' हे मास्तरांचे शब्द कानावर येतात) ये देख उसकी हालत. पहिलेसे पूजा करते आया. और चोर कायदेमें फस गया. उसके मानवताका रूपच बदल गया करके.

('मानवा हो ढोंगी सैतान' असं म्हणत मास्तर प्रवेश करतो.)

**मास्तर** : मानवा हो ढोंगी सैतान।
मित्र म्हणून जा जवळ कुणाच्या काप त्याची मान।
मानवा हो ढोंगी सैतान।

(मध्येच आंधळा उठतो, निघून जातो. त्याच्या मागोमाग जात जात—)

असत्य हिंसा, जळो शांतता
हीच असावी जीवनगाथा।
शुद्ध शील तर चारित्र्याचा एकमेव अपमान।
मानवा हो ढोंगी सैतान।

(असं म्हणत म्हणत आंधळ्याच्या मागोमाग निघून जातो.).

**पाटील** : अरे पण ह्या मास्तरंला बाहेर कुणी सोडला?

**धर्मा** : (प्रवेश करून) आमी.

**गुणा** : व्हय, आमी.

**पाटील** : कां?

**धर्मा** : कोन थतं बसनार?

**गुणा** : पहिलं तुमी बसा जेलमंधी.

**पाटील** : जेलांत?

**गुणा** : व्हयं?

**पाटील** : का?

**गुणा** : तुमी राखनदार हाये न्हवं गांवाचं?

**धर्मा** : म पैका कुठं हाये?

**गुणा** : पोरगी कुठं हाये मास्तराची?

**धर्मा** : बसा जेलमंदी.

**पाटील** : आरं तुजी घोंगडीभर जिमिन काय नाकाला सूत लावाया ठिवायची हाये ? माजा सबूद हाये ! चोराला दिल्याला मोडल्याला न्हाई. तेचा तर इस्वास धर. हे काय न्हाई म्हननार हाये ती व्हयं ?

**धनगर** : पाटील, आमी त्या दिशीं तुमास्नी सांगितल्यालं व्हतं, का धनगराच्या घोंगडीच्या लोकरीच्या सुताचा गुत्ता पाटलाला आन शेतकऱ्याला कळणार न्हाई. गोपालकिस्न म्हणे तेथे पाहिजे धनगराचे, पाटील शेतकऱ्याचे काम नोहे. त्या दिवशीं भ्या घोंगडीच्या लोकरीचा धागा इथं मारुतीच्या पायाला बांधून गेलो का आज आलुया परत समद्या गांवाला एका घोंगडीचा लोकरीचा धागा गुद्दालून. एका घोंगडीचा. मला घोंगडीभर जिमिन दिली का न्हाई.

**पाटील** : व्हयं दिली.

**धनगर** : मंग हे गांव कुनाचं ?

**धर्मा** : तुजंच की.

**धनगर** : म पाटील कोन व्हनार ?

**गुणा** : हो की तूच.

**धनगर** : परत्येक धनगराचा होळकर होतोय असं न्हाई. म मेंढरं कोन पाळणार ? ती वैऱ्याच्या गांवात कोन सोडणार ? वैऱ्यानं मेंढरं पळविली म्हून पाटलाकडं बोंब मारत कोन येनार ? त्याच्याशिवाय पाटलाची आन वैऱ्याची कशी जुपनार ? आन ती मजा कोन बगनार ?

**गुणा** : म्हंजी ? तू व्हयं रं त्यो ? कळीचा ?

**धनगर** : तर ? आपला धंदाच हाये, म्या कोन हाये ? म्हा धनगर न्हाई

**गुणा** : मग ?

**धनगर** : गोपालकिस्नाचा अवतार हाये. तू मला वळखल्यालं न्हाई. आपला धंदा हाये गोपालकिस्नाचा. कौरव-पांडवांत युध लावून द्यायचं आन आपुन गीता सांगत उबं न्हायाचं.

**गुणा** : अरं, मंग गोपालकिस्ना शेळ्या का पाळतोयस ?

**धर्मा** : मेंढरं ? बकरी ?

(बॅकग्राऊंडला 'मानवा हो ढोंगी सैतान–' हे मास्तरांचे शब्द कानावर येतात) ये देख उसकी हालत. पहिलेसे पूजा करते आया. और चोर कायदेमें फस गया. उसके मानवताका रूपच बदल गया करके.

('मानवा हो ढोंगी सैतान' असं म्हणत मास्तर प्रवेश करतो.)

**मास्तर** : मानवा हो ढोंगी सैतान।
मित्र म्हणून जा जवळ कुणाच्या काप त्याची मान।
मानवा हो ढोंगी सैतान।

(मध्येच आंधळा उठतो, निघून जातो. त्याच्या मागोमाग जात जात—)

असत्य हिंसा, जळो शांतता
हीच्च असावी जीवनगाथा।
शुद्ध शील तर चारित्र्याचा एकमेव अपमान।
मानवा हो ढोंगी सैतान।

(असं म्हणत म्हणत आंधळ्याच्या मागोमाग निघून जातो.).

**पाटील** : अरे पण ह्या मास्तरंला बाहेर कुणी सोडला?

**धर्मा** : (प्रवेश करून) आमी.

**गुणा** : व्हय, आमी.

**पाटील** : कां?

**धर्मा** : कोन थतं बसनार?

**गुणा** : पहिलं तुमी बसा जेलमंधी.

**पाटील** : जेलांत?

**गुणा** : व्हयं?

**पाटील** : का?

**गुणा** : तुमी राखनदार हाये न्हवं गांवाचं?

**धर्मा** : म पैका कुठं हाये?

**गुणा** : पोरगी कुठं हाये मास्तराची?

**धर्मा** : बसा जेलमंदी.

**पाटील :** आरं तुजी घोंगडीभर जिमिन काय नाकाला सूत लावाया ठिवायची हाये ? माजा सबूद हाये ! चोराला दिल्याला मोडल्याला न्हाई. तेचा तर इस्वास धर. हे काय न्हाई म्हननार हाये ती व्हयं ?

**धनगर :** पाटील, आमी त्या दिशीं तुमास्नी सांगितल्यालं व्हतं, का धनगराच्या घोंगडीच्या लोकरीच्या सुताचा गुत्ता पाटलाला आन शेतकऱ्याला कळणार न्हाई. गोपालकिस्न म्हणे तेथे पाहिजे धनगराचे, पाटील शेतकऱ्याचे काम नोहे. त्या दिवशीं म्या घोंगडीच्या लोकरीचा धागा इथं मारुतीच्या पायाला बांधून गेलो का आज आलुया परत समद्या गांवाला एका घोंगडीचा लोकरीचा धागा गुट्टाळून. एका घोंगडीचा. मला घोंगडीभर जिमिन दिली का न्हाई.

**पाटील :** व्हयं दिली.

**धनगर :** मंग हे गांव कुनाचं ?

**धर्मा :** तुजंच की.

**धनगर :** म पाटील कोन व्हनार ?

**गुणा :** हो की तूच.

**धनगर :** परत्येक धनगराचा होळकर होतोय असं न्हाई. म मेंढरं कोन पाळणार ? ती वैऱ्याच्या गांवात कोन सोडणार ? वैऱ्यानं मेंढरं पळविली म्हून पाटलाकडं बोंब मारत कोन येनार ? त्याच्याशिवाय पाटलाची आन वैऱ्याची कशी जुपनार ? आन ती मजा कोन बगनार ?

**गुणा :** म्हंजी ? तू व्हयं रं त्यो ? कळीचा ?

**धनगर :** तर ? आपला धंदाच हाये, म्या कोन हाये ? म्हा धनगर न्हाई

**गुणा :** मग ?

**धनगर :** गोपालकिस्नाचा अवतार हाये. तू मला वळखल्यालं न्हाई. आपला धंदा हाये गोपालकिस्नाचा. कौरव-पांडवांत युध लावून द्यायचं आन आपुन गीता सांगत उबं ऱ्हायाचं.

**गुणा :** अरं, मंग गोपालकिस्ना शेळ्या का पाळतोयस ?

**धर्मा :** मेंढरं ? बकरी ?

**धनगर** : आरं किस्नाच्या काळांतल्या मानसाचं काय झालंया ते सोत्ताकडं बगा. ठरवा. आन मंग मला इच्चारा. शेळ्या का पाळतोयास ? आरं त्या काळच्या मानसाची ही रूपं झाली. माकडं. तुमावानी. मंग त्या काळांतल्या कालवडीच्या शेळ्या झाल्या तर बिगडलं काय ? कामधेनूचीच शेळी झाली. आमी मोहन झालो. कुंजवनांतलं. गोपालकिस्न सांगतोय, पाटील ह्योच. आरं गड्याहो, कसली सत्ता आन कसली पाटिलकी ? सब भूमी गोपालकी. आरं सोत्ताचा भरंवसा न्हाई. आन सत्तेचा धरतां ?

**पाटील** : गावासाठनं.

**धनगर** : तेचा तर का भरंवसा हाये ? माजं माजं म्हून कवटाळून बसला व्हता न्हवं गांव ? ते गांव दुकीन येका धनगरानं घेतलं. एका घोंगडीच्या आकलंत. तेचा तरी काय भरंवसा हाये. आमी सांगतो ते ऐकाया होवं. गांव आमचं हाये. म्या सांगन ते समद्यास्नी ऐकाया होवं. पाटील ह्येच न्हानार. ( कमरेचा कागद काढतो ) ह्यो कागुद जिमिनीचा. टाका तिजोरीत. म्या बक्षिसी दिल्याला गांव हाये, गांवाला, गांवाचाच. समदी भूमीच गोपालाची हाये. कसली सत्तेची भांडनं भांडता.

**दवंडी** : [ प्रवेशून ] पाटील, मास्तरांची अंबू आनली शिरपतीनं. परतून.

**पाटील** : वैऱ्याच्या हातातनं ?

**दवंडी** : व्हयं.

**पाटील** : पर तेनं हत्यार उचलनार न्हाई म्हून सांगितल्यालं व्हतं.

**दवंडी** : तसं मला ऐकल्यागत वाटतं. पर मंजुळाक्का वैऱ्याच्या गांवांत घुसन्याच्या अदुगर शिरपती घिवून आला अंबूला.

**धनगर** : म्हंजी आक्का घुसली वैऱ्याच्या गांवांत ? ए धर्मा, ए गुना. जावा तुमी. आक्कासाहेबास्नी आना जावा परत.

**धर्मा** : आन हत्यारं ?

**गुणा** : कायद्यापरमानं उचलतां येत न्हाईत.

**धनगर** : त्या पाटलाच्च फिरलं डोक्स अन् गावाचं झालं वाटुळं. रागानं

तेना का गोळी घालावी लागती का ? म्हनावं येक डाव शिवाजी महाराजाचं नांव आठवा आन बजरंगाच्या नांवानं येकमुकानं म्हना— हर हर महादेव– तिक्ता दनका पुरा झाला वैऱ्याला.

(अंधार होतो. हर हर महादेवचा प्रचंड घोष ऐकूं येतो. मागच्या आकाशांत विजा होतात. आणि आंतून—

**महापूर मृगजळासी आला ।**
**त्यांत हिमालय वाहून गेला ।**
**सिंहासंगे झोंबे कोल्हा ।**
**ज्ञान देत अज्ञानी ॥**
**वाऱ्यांत मिसळलें पाणी ॥**

संपूर्ण प्रकाशांत पुन्हां एकदां ते दृश्य जेव्हां डोळ्यांपुढं येतें त्या वेळेला पुन्हां एकदां सगळ्याच्या हातांत हत्यारं ! निरांजन घेऊन आलेली मंजुळा बसते पाटलाच्या शेजारी. चोराला आंधळ्या पहारेकऱ्यानं बांधून आणलेला आहे.)

**पाटील** : पहिली गदा द्या मारुतीच्या हातांत. गदा काढून घितल्याधरनं माकड दिसाया लागलंय. (गदा हातांत ठेवतात) नमस्कार करावा वाटंना झालंय. आंधळ्या, त्वां आनलं व्हयं हेला धरून ? माग, बक्षिसी माग.

**धनगर** : माग घोंगडीभर जिमिन.

**पाटील** : बाबा, तुज्या घोंगडीचा धागा आतां गळ्याला येया लागलाय. तोड. (वेडा तान मारतो.) हां तुजं चालूं दे. चेप मारुतीचं पाय. दमला असंल.

**आंधळा** : तेला वाटलं म्या आंधळा हाये. पर पारंकरी आंधळा ठिवाया आमच्या गांवचं पाटील काय गाढाव न्हाई.

**पाटील** : बोल बाबा बोल. गाढाव होतो म्हून हेच्या नादी लागलो. माझं पैकं कुठं हायती ? गांवाचं ?

**चोर** : पैकं मला ठावं न्हाई. (मागं तिजोरीजवळ मामा उभा असतो.)

**धनगर** : आरं किस्नाच्या काळांतल्या मानसाचं काय झालंया ते सोत्ताकडं बगा. ठरवा. आन मंग मला इच्चारा. शेळ्या का पाळतोयास ? आरं त्या काळच्या मानसाची ही रूपं झाली. माकडं. तुमावानी. मंग त्या काळांतल्या कालवडीच्या शेळ्या झाल्या तर बिगडलं काय ? कामधेनूचीच शेळी झाली. आमी मोहन झालो. कुंजवनांतलं. गोपालकिस्न सांगतोय, पाटील ह्योच. आरं गड्याहो, कसली सत्ता आन कसली पाटिलकी ? सब भूमी गोपालकी. आरं सोत्ताचा भरंवसा न्हाई. आन सत्तंचा धरतां ?

**पाटील** : गावासाठनं.

**धनगर** : तेचा तर का भरंवसा हाये ? माजं माजं म्हून कवटाळून बसला व्हता न्हवं गांव ? ते गांव दुकीन येका धनगरानं घेतलं. एका घोंगडीच्या आकलंत. तेचा तरी काय भरंवसा हाये. आमी सांगतो ते ऐकाया होवं. गांव आमचं हाये. म्या सांगन ते समद्यास्नी ऐकाया होवं. पाटील ह्येच व्हानार. ( कमरेचा कागद काढतो ) ह्यो कागुद जिमिनीचा. टाका तिजोरीत. म्या बक्षिसी दिल्याला गांव हाये, गांवाला, गांवाचाच. समदी भूमीच गोपालाची हाये. कसली सत्तंची भांडनं भांडता.

**दवंडी** : [ प्रवेशून ] पाटील, मास्तरांची अंबू आनली शिरपतीनं. परतून.

**पाटील** : वैऱ्याच्या हातातनं ?

**दवंडी** : व्हयं.

**पाटील** : पर तेनं हत्यार उचलनार न्हाई म्हून सांगितल्यालं व्हतं.

**दवंडी** : तसं मला ऐकल्यागत वाटतं. पर मंजुळाक्का वैऱ्याच्या गांवांत घुसन्याच्या अदुगर शिरपती धिवून आला अंबूला.

**धनगर** : म्हंजी आक्का घुसली वैऱ्याच्या गांवांत ? ए धर्मा, ए गुना. जावा तुमी. आक्कासाहेबास्नी आना जावा परत.

**धर्मा** : आन हत्यारं ?

**गुणा** : कायद्यापरमानं उचलतां येत न्हाईत.

**धनगर** : त्या पाटलाच्च फिरलं डोक्स अन् गावाचं झालं वाटुळं. रागानं

तेना का गोळी घालावी लागती का ? म्हनावं येक डाव शिवाजी महाराजाचं नांव आठवा आन बजरंगाच्या नांवानं येकमुकानं म्हना— हर हर महादेव— तिक्ता दनका पुरा झाला वैऱ्याला.

( अंधार होतो. हर हर महादेवचा प्रचंड घोष ऐकूं येतो. मागच्या आकाशांत विजा होतात. आणि आंतून—

**महापूर मृगजळासी आला ।**
**त्यांत हिमालय वाहून गेला ।**
**सिंहासंगे झोंबे कोल्हा ।**
**ज्ञान देत अज्ञानी ॥**
**वाऱ्यांत मिसळलें पाणी ॥**

संपूर्ण प्रकाशांत पुन्हां एकदां ते दृश्य जेव्हां डोळ्यांपुढं येतें त्या वेळेला पुन्हां एकदां सगळ्याच्या हातांत हत्यारं ! निरांजन घेऊन आलेली मंजुळा बसते पाटलाच्या शेजारी. चोराला आंधळ्या पहारेकऱ्यानं बांधून आणलेला आहे. )

**पाटील** : पहिली गदा द्या मारुतीच्या हातांत. गदा काढून घितल्याधरनं माकड दिसाया लागलंय. ( गदा हातांत ठेवतात ) नमस्कार करावा वाटंना झालंय. आंधळ्या, त्वां आनलं व्हयं हेला धरून ? माग, बक्षिसी माग.

**धनगर** : माग घोंगडीभर जिमिन.

**पाटील** : बाबा, तुज्या घोंगडीचा धागा आतां गळ्याला येया लागलाय. तोड. ( वेडा तान मारतो. ) हां तुजं चालूं दे. चेप मारुतीचं पाय. दमला असंल.

**आंधळा** : तेला वाटलं म्या आंधळा हाये. पर पारंकरी आंधळा ठिवाया आमच्या गांवचं पाटील काय गाढाव न्हाई.

**पाटील** : बोल बाबा बोल. गाढाव होतो म्हून हेच्या नादी लागलो. माझं पैकं कुठं हायती ? गांवाचं ?

**चोर** : पैकं मला ठावं न्हाई. ( मागं तिजोरीजवळ मामा उभा असतो. )

**मामा** : अहा, ही चालबाजी लावली व्हयं ? अहो, पाटील ह्येनंच पैकं ठिवल्यालं असनार. भोळीभाबडी मानसं बगितली. आन तेस्नी फसवाया निगाला व्हयं ? कुठं हायेत पैकं.

**चोर** : आईच्यान मला ठावं न्हाई.

**पाटील** : म कुनाला ठावं हाये ?

**बहिणाई** : ( पाटलाच्या घरांतून येते ) तेच्या आईला. पैकं म्या चोरल्यालं व्हतं. ह्ये घे गावाचं गट्ठळं.

**पाटील** : चोरल्यालं म्हंजी ?

**दिवाणजी** : खुलासा विचारूं नका. झाला इतका पुरे झाला.

**पाटील** : अगं पर मने, मला सांगायचं न्हाई व्हयं ?

**बहिणाई** : चोरी करतांना कुनी सांगत्यात व्हयं ? आरं ते चोरी करनं च्यांगलं नसतं हे तुला सांगून कळंना म्हूनं करून दावली. सून घरांत येयाची. ती डाग अंगावं घातल्याशिवाय यील ? ह्ये गांवाचं पैकं. हे गांवाचं धन.

( गाठोडं ओढत आणून पायाशी ठेवते मारुतीच्या )

**धनगर** : सब भूमी गोपालकी—

**मामा** : म्हंजी ? चोरी त्वां केल्याली न्हवती बजरंगा ?

**चोर** : जमंना. खाली बी जमंना वर बी जमंना. म्हून बेकार न्हाईलो. खलित्याचं बी डोक्सं चालिवलं. डोक्सं चाललं पर गांवात आल्याचं कळलं काळीज हललं. जगांत जगन्याची आपली लायकी न्हाई हे मला ह्या जगांत आल्यावं कळलं. अवं पाटील, या गांवांत दुकीन चोरी करनं मला जमत न्हाई न माज्या गावांत म्या बेकार न्हायलो नवल काय ? माजं ऐका. मला गुळी घाला.

**गुणा** : येडा हाये.

**धर्मा** : गुळी घाला म्हनतोय.

**बहिणाई** : आई, भन, बायको कोन न्हाई व्हय तुला ?

**चोर** : हाये ना. ब्येकारी हीच माजी आई, भन, बायको.

बलभीम हिंदुस्थानच्या नकाशांतून मध्यावर उभा असलेला दिसतो. आणि आडगांवाची मंडळी मारुतीची आरती करीत असतांना ह्या नकाशांत बाहेर चोरून बघत असलेला बजरंग आणि मामा मारुतीला नमस्कार करतात आणि पडदा पडल्यानंतर—

**कुठें न घडली, कुणी न ऐकली, असली अजब कहाणी ।**
**वाऱ्यांत मिसळलें पाणी ।।**

ही ओळ कानांवर पडते आणि ही आंडगावाची कहाणी संपते.

( आणि म्हणून पडदा पडतो. तसाच तिसरा अंकही संपतो. )

☘ ☘ ☘